१० सप्टेंबर १९६६
चाळीस पैसे

# माणूस

साप्ताहिक

## मला सत्ताधीश होणे आवडेल

. का. पाटील





“ बघ, म्हणजे अजूनही तुझी लढण्याची खुमखुमी कायम आहे ! ”

पुरुषोत्तम करंडक विजेता प्रयोग – ‘ पांच दिवस ’मध्ये

श्रीनिवास पानवलकर व विद्याधर वाटवे

सादरकर्ते – बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे




**एक समग्र साप्ताहिक**

*वर्ष — सहावे*
*अंक : दहावा*
*किंमत : चाळीस पैसे*
*वार्षिक वर्गणी : वीस रुपये*

**संपादक**

श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**

*अ. मा. साधू*
*दिलीप माजगावकर*
*सौ. निर्मला पुरंदरे*

**व्यवस्था विभाग**

*अ. वा. गंधे*
*अ. वि. गणपत्ये*

*पत्ता — ४१९ नारायण, पुणे २.*

*दूरध्वनी — ५७३५९*

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पत्र-मैत्री

ऑगस्ट २६

स. न.

आपल्या 'माणूस'ने आता बाळसे धरले आहे. 'माणूस'च्या प्रकाशन-काळात जरी बदल झाला असला, ते साप्ताहिक झाले असले तरी त्याचा दर्जा मात्र कायम आहे व यामुळेच आजचा आस्थेवाईकपणे वाचन करणारा माणूस, विकत घेऊनही 'माणूस'ची भूक भागवू लागला आहे. 'ड्रॅगन जागा झाला' ही लेखमाला सुरू करून आपण परंपरा टिकविली आहे, याबद्दल अभिनंदन.

पण 'माणूस'ला एक नम्र सूचना करावीशी वाटते की, मजसारख्या वाचकांना एखाद्या वेळेस एखादा अंक न मिळाल्यास हुरहूर वाटते. तो अंक पैसे भरल्यास आपल्या कार्यालयातून मिळण्याची व्यवस्था केल्यास फार बरे होईल.

**दत्ता कुलकर्णी, सोलापूर.**

ऑगस्ट २९

स. न.

साप्ताहिकाचा पहिला अंक आवडला. एवढ्याच करता की, पहिला अंक म्हणून विशेष डामडौल नाही. अगदी आपल्या पाक्षिकाच्या स्वरूपात. सध्याचा 'ड्रॅगन जागा झाला' ही लेखमाला चांगली आहे. अशाच प्रकारच्या लेखमाला चालू ठेवाव्यात. अर्थात हे नेहमीच शक्य नाही याची जाणीव आहे. आपले साप्ताहिक वाचताना वाचक प्रतिष्ठानचा विचार जरूर करील.

**श्री. आ. बेकनाळकर, सांगली.**



## □ दागिन्यांनी बाई मरत नाही !

'मुंबई-बंद' प्रकरणात गृहमंत्र्यांनी फक्त गुंडांनाच पकडले म्हणून रागावलेले मंत्री होमी तल्यारखान यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. मंत्र्यांना जे मोठमोठे निर्णय घ्यावयाचे असतात, त्यांसाठी सरकारने नेमलेले त्या त्या विषयांतले तज्ज्ञ व विरोधी पक्षांतले जागरूक नेते मदत करतात. यामुळे मंत्र्यांना आपले बुद्धिचातुर्य दाखवायला फारसा वाव राहत नाही; अर्थातच यामुळे मंत्र्यांचा I. Q. म्हणजे बुद्धि निर्देशांक काय आहे याची जनतेला कल्पना येत नाही. सुदैवाने श्री. तल्यारखान यांच्या बाबतीत त्यांनी स्वतंत्र बुद्धीने घेतलेले काही निर्णय उपलब्ध आहेत. अशा निर्णयांत मंत्र्याने स्वत:चे ओळखपत्र छापून घेणे ही बाब येते. न्यूयॉर्क येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'Saturday Review' या पत्राच्या २१ मे १९६६ च्या अंकात एका अमेरिकन साहेबाने खालील हकीकत दिली आहे –


या साहेबाचे नाव होरेस् सटन. हे लिहितात –

"नव्या दिल्लीत श्री. ओबेराय यांनी दिलेल्या खान्याच्या वेळी माझ्यासमोर मुंबईतील एक सरकारी अधिकारी बसले होते. अनेक खात्यांचे ते प्रमुख होते. परस्पर परिचय करून दिल्यावर या महाशयांनी आपले ओळखपत्र माझ्याकडे टेबलावर सरकवले. माझे ओळखपत्र मी विसरलो होतो. मी ते ओळखपत्र उघडताना मला असा संशयदेखील आला नाही, की गेल्या वीस वर्षांत एवढे प्रचंड ओळखपत्र मी प्रथमच उघडणार आहे. सोनेरी चौकटी टाकलेले व गच्च मजकुराचे ते ओळखपत्र होते. पांढऱ्या शुभ्र कागदावर निळ्या अक्षरांत ते छापलेले होते. मध्यभागी मथळा होता –

'होमी जे. एच्. तल्यारखान – गृहनिर्माण, छापखाने, मच्छिमारी, अल्पबचत व पर्यटन या खात्यांचे मंत्री. महाराष्ट्र सरकार.'

मी कार्ड उघडले. आतल्या बाजूला होमी जे. एच्. तल्यारखान यांचे सर्व पूर्वचरित्र व माहिती सांगितलेली होती. ती अशी –

**इतर कार्ये** (Other Activities) उपाध्यक्ष यु. नो. असोसिएशन (महाराष्ट्र), अध्यक्ष–आंतरराष्ट्रीय विद्यार्थी साहाय्यक समिती, अध्यक्ष–सदिच्छा व संस्कृती मंडळ, अध्यक्ष–आंधळ्यांसाठी वर्कशॉप (आशिया खंडात अशा प्रकारचे हे एकच वर्कशॉप आहे), अध्यक्ष वाळकेश्वर महालक्ष्मी सामाजिक उन्नती मंडळ, उपाध्यक्ष क्षयरोग निवारण संस्था, सभासद–मध्यवर्ती सरकारचे गृहनिर्माण मंडळ, सहल मंडळ, मच्छिमार मंडळ, अल्पबचत मंडळ.



आम्ही कोण म्हणूनि काय पुसता !

**पूर्व दिव्य** (Privious Record) शिक्षण–इंग्लंड व भारत देशात (किंग्ज कॉलेज लंडन व लिंकन्स् इन्), मुंबई महानगरपालिकेत निवड-१९४८, १९५२ पर्यंत सभासद, नगरपालिका कॉंग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद, मुंबई विधानसभेत निवडून आले–१९५२, विधानपरिषदेतील कॉंग्रेस पक्षाचे चिटणीस म्हणून निवड १९५२, १९५७ मध्ये विधानसभेवर फेरनिवड, मुख्यमंत्र्यांचे प्रमुख सचीव म्हणून नेमणूक व महाराष्ट्र विधानपरिषदेतील कॉंग्रेस पक्षाचे प्रतोद म्हणून नेमणुका, आरोग्य, अल्पबचत व पर्यटन या खात्यांचे मंत्री १९६०. अन्न पुरवठा, गृहनिर्माण, मच्छिमारी, अल्पबचत, छापखाने व पर्यटन यांचे मंत्री एप्रिल १९६२ पासून. अध्यक्ष ट्रुमन यांचे निमंत्रणावरून १९५१–५२ मध्ये अमेरिकेला भेट, जर्मन सरकारच्या निमंत्रणावरून १९५९–६० साली जर्मनीला भेट, युरोप व जपानमध्ये विस्तृत प्रवास. अर्थशास्त्र, प्रवास व राजकारण या विषयांवरील अनेक पुस्तकांचे लेखक. असंख्य सामाजिक व जनहिताच्या चळवळींशी संबंधित.

**राहण्याचे ठिकाण** (Residence) नारायण दाभोळकर रस्ता, मुंबई (भारत.)

हे ओळखपत्र वाचताना साहेबाला धाप लागली व वाचून झाले तेव्हा तो मूर्च्छित झाला असावा. त्याने असे सांगितलेले नाही, परंतु तर्काने हे सहज लक्षात येईल. अशा तऱ्हेचे महान् कर्तृत्वाचे मंत्री आहेत म्हणून राज्य चालू आहे. यांचा बुद्धि-निर्देशांक पाहून जगातले साहेब लोक चाट पडतात. मराठी माणसांचे हे परमभाग्य होय. अशा तऱ्हेचे कर्तृत्ववान, विद्वान, अमेरिकन अध्यक्षांवरही बुद्धीची छाप पाडणारे ग्रंथकार, मंत्री आपल्याला लाभले. पुनः म्हणून कुणी साहेब कॉंग्रेसी मंत्र्यांचे ओळखपत्र मागणार नाही. ओळखपत्र मागितले की, मंत्री ताडकन् असे ओळखपत्र त्याच्या तोंडावर फेकून विचारतीलच–"आम्ही कोण म्हणून काय पुसतां दाताड वेंगाडुनी ?' या रत्नापुढती जवाहर दिसे भिक्कार फुटका मणी !

## □ गुंडप्रेम !

'मुंबई बंद' हा विरोधी पक्षांचा कार्यक्रम मुंबईत अयशस्वी व्हावा, याकरता महाराष्ट्र सरकारने जे उपाय योजले त्यांत प्रमुख उपाय म्हणून सुमारे २००० गुंडांना दि. २३ ऑगस्टला रात्री पकडले. मुंबईची लोकसंख्या चाळीस लाख आहे. आता एवढ्या माणसांतून दोन हजार गुंड नेमके शोधून काढायचे तर दोन हजार माणसांमागे एक गुंड सापडणार ! एवढी ही कठीण कामगिरी महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांनी केवळ एका रात्रीत उरकली. हे गुंड म्हणजे काय साधेसुधे होते ? वृत्तपत्रांच्या सांगण्याप्रमाणे समाजघातकी, अपप्रवृत्तींचे व अत्याचारी असे हे लोक आहेत. अशा या भयानक माणसांना एका रात्रीत पोलिसांनी कसे काय गिरफ्दार केले, याचे आश्चर्य वाटेल. परन्तु यात आश्चर्य कसले ! महाराष्ट्र सरकारचे पोलीस खाते म्हणजे तुम्ही काय समजलात ? या गुंडांशी पोलीस मुद्दामच घनिष्ट संबंध ठेवतात. त्यांना हवे तेव्हा पकडण्यासाठी पोलिसांना हे करावेच लागते. लोक आपले उगाचच म्हणतात की, पोलीस व गुंड हातांत हात घालून असतात.

विरोधी पक्षांचा कार्यक्रम असला, की त्यांच्या नादाने काही गुंड विरोधी पक्षांत दाखल होण्याची शक्यता असल्याने, काँग्रेस सरकार त्यांना तुरुंगात टाकते. एकही गुंड विरोधी पक्षांत गेलेला काँग्रेस सरकारला खपणार नाही. ज्या वेळी विरोधी पक्षांचा असा काही कार्यक्रम नसतो, तेव्हा तरी या गुंडांना आपापले धंदे करायला सरकार मोकळे ठेवते, यावरून सरकारची क्षमाशीलता व उदारवृत्ती प्रकर्षाने लक्षात यायला हवी.

सामान्य नागरिकांशी सरकार इतके कठोरपणे वागते, की नुसत्या संशयावरून सज्जन नागरिकांना वर्षानुवर्षे तुरुंगात ठेवतात किंवा त्यांना मनःस्ताप दिला जातो. राजकीय गुन्हेगारांना गुन्ह्याची शिक्षा संपल्यावरही सरकार तुरुंगातच ठेवते, याचे मुख्य कारण सामान्य नागरिक व राजकीय गुन्हेगार यांच्यावर देशाची अब्रू अवलंबून असते. गुंडांची गोष्ट निराळी ! ते बिचारे चोऱ्या करतात, दरोडे घालतात, स्त्रियांची अब्रू घेतात, खिसे कापतात, सट्टा-बेटस् घेतात. ज्यांना विलायती महागडी दारू परवडत नाही अशा दलित वर्गासाठी ते अहोरात्र झटतात. पोलिसांच्या अडीअडचणीला ते उभे राहतात व त्यांच्या वळचणीला पोलीस उभे राहतात. त्या बिचाऱ्यांना उगाच तुरुंगात ठेवण्यात काय बरे हशील आहे ?

एखादा गुंड एखाद्या भागात फारच गुंडाई करू लागला तरी मा-बाप सरकार शक्यतो त्याला पकडीत नाही. त्याला सरकारचे पोलीस खाते हद्दपार करते ! म्हणजे गोलपिठ्याचा गुंड वांद्र्याला आणून मोकळा सोडतात व वांद्र्याच्या गुंडांना बोरिवलीला जाण्यास सांगतात.

गुंड हे एकेकाळचे देशभक्त होत. गुंड नसते तर पाकिस्तान होते ना ! अशा या थोर जमातीचे फक्त बिनचूक पत्ते जवळ ठेवून त्यांना सरकार शांतता-काळांत संपूर्ण मोकळे ठेवते, याबद्दल गुंड व जनता सरकारची ऋणी राहील.


## काही व्याख्या


**परिचय** : ज्या व्यक्तिकडून आपण केव्हाही उधार–उसनवार मागू शकतो, परंतु जिला आपण काही मदत करावी इतकी जी व्यक्ती जवळची वाटत नाही, तिला परिचित व्यक्ती म्हणावे.

**आतिथ्य** : ज्यांना खाऊ घातले तर त्यांच्या पोटावर अत्याचार ठरणार आहे व ज्यांना राहायला आपल्या घरापेक्षा अधिक सुखसोयीयुक्त घर आहे. अशा लोकांना आपण जो खाण्या-राहण्याचा आग्रह करतो ते आतिथ्य होय.

– ग्यानबा

## नॉन अलाइन्ड बेगर





# पुढचे पाऊल!

मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीच्या आमदारांच्या राजीनाम्याचे चहाच्या पेल्यातील वादळ आता शमू लागल्याची चिन्हे आहेत. होय, ते मुद्दाम निर्माण केलेले लुटुपुटीचे वादळ होते. आपली ताकद अजमावण्यासाठी मुंबई काँग्रेसने टाकलेला तो डाव होता. मुंबईच्या साऱ्या आमदारांनी विधानसभेचे राजीनामे देऊन महाराष्ट्र सरकारात पहिल्या दर्जाचा अस्सल पेचप्रसंग निर्माण केला होता. केवळ 'घेरा डालो'च्या दिवशी सरकारने अनुसरलेल्या धोरणाचा हा निषेध नव्हता तर मुंबई काँग्रेसच्या ताकदीचे हे जाणूनबुजून केलेले प्रदर्शन होते. मुंबई काँग्रेस व महाराष्ट्र काँग्रेस यांच्यांत सतत चालू असलेल्या कलहाचे हे जाहीर प्रदर्शन होते. महाराष्ट्र काँग्रेस व महाराष्ट्र सरकार यांना दिलेले ते आव्हान होते.

**वाढती ताकद**

वादळ संपत आले, पेचप्रसंग मिटत आला. तरी त्यातून लक्षात राहण्यासारखी एक गोष्ट बाहेर पडली. मुंबई काँग्रेसचे नेते व भारतीय रेल्वेमंत्री श्री. सदाशिव कान्होजी पाटील यांची वाढती ताकद. मुंबईच्या राजकारणातील एक मोठी शक्ती म्हणून आतापर्यंत श्री. पाटील ओळखले जात होते. आता भारताच्या राजकारणातील एक उदयोन्मुख शक्ती म्हणून श्री. पाटील वेगाने पुढे येत आहेत. देशाच्या राजकारणात पहिल्या प्रतीच्या पुढाऱ्यांमध्ये त्यांचा क्रम लागतो. पाटलांशिवाय

# १८२१

मुंबई प्रदेश काँग्रेसच्या आमदारांनी आणि मंत्र्यांनी महाराष्ट्र विधानसभेचे राजीनामे दिल्याचे जाहीर झाले, त्या दिवशी मुंबई काँग्रेसच्या ऑफिसमध्ये श्री. स. का. पाटील यांचे अभिनंदन करणाऱ्या १८२१ तारा आणि असंख्य पत्रे आली!

हे राजीनामा प्रकरण म्हणजे श्री. पाटील यांनी आपल्या वाढल्या ताकदीचे जाणून बुजून केलेले एक प्रदर्शन तर नव्हे?

## —श्री. स. का. पाटील

मुंबई काँग्रेसचे पान हलत नाही. मुंबईच्या बड्या भांडवलदारांना, कारखानदारांना आणि व्यापाऱ्यांना हाताच्या बोटांवर नाचवून कुशलतेने आपले राजकीय हेतू साध्य करून घेणारा पाटलांसारखा दुसरा राजकीय नेता मुंबईत नाही. आपल्या जबरदस्त संघटन–कौशल्यामुळे, सडेतोड मतांमुळे, प्रभावी वक्तृत्वामुळे श्री. पाटील यांनी दिल्लीतही स्वत:साठी मानाचे स्थान निर्माण केले आहे.

पण इतके असूनही महाराष्ट्रात श्री. पाटील हे सर्वांत अप्रिय काँग्रेसजन आहेत. मुंबईच्या राजकारणावर त्यांची एखाद्या प्रचंड वटवृक्षाप्रमाणे छाया पडलेली असते. पण महाराष्ट्रात मात्र त्यांना अद्याप स्थान नाही. आपल्या भांडवलशाही धोरणामुळे, राज्य–भाषा–निरपेक्ष राजकारणामुळे आणि फटकळ बोलण्यामुळे त्यांनी महाराष्ट्राकडून शिव्या व गैरसमजच विकत घेतले. कदाचित, याच गुणांमुळे त्यांनी मुंबईत आणि दिल्लीत आपला प्रभाव पाडला असावा. मुंबईतील मराठी लोकांपेक्षा गुजराती, पारशी, ख्रिश्चन आदी इतर लोकच श्री. पाटलांवर अधिक प्रेम करतात आणि त्यांच्याच साहाय्याने ते मुंबईच्या राजकारणावर आपला प्रभाव पाडून असतात. मुंबईच्या मरीन ड्राईव्ह या धनाढ्यांच्या वस्तीतील त्यांच्या आलिशान फ्लॅटमध्ये ते असले म्हणजे मुंबईतील साऱ्या जाती, धर्म, भाषांचे लोक त्यांच्याकडे खेटे घालीत असतात. याच त्यांच्या 'कॉस्मॉपॉलिटन' वृत्तीचे प्रतिबिंब

त्यांच्याजवळच्या नोकरवर्गातही आहे. सगळ्यांशी गोड बोलून, कधी दम देऊन, प्रसंगी दुसऱ्यांची कामे करून संबंध चांगले राखण्याची 'अमहाराष्ट्रीय' हातोटी श्री. पाटील यांना चांगली साधली आहे. दिल्ली, मुंबईच्या मंत्र्यांनी आपल्या खात्यांची सारी शक्ती पणास लावली तरी जी कामे होणार नाहीत ती कामे पाटलांनी नुसता फोन केला तरी चटकन होतात असे म्हणतात, ते यामुळेच आणि त्यांच्या या सव्यसाचित्वामुळेच ते आता भारतातील प्रमुख शक्तींमध्ये गणले जातात.

## आय वुड लाईक टु बी ए पॉवर

"लोक म्हणतात पाटील ही मुंबईतील मोठी शक्ती आहे," मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीच्या गिरगावातील श्री. स. का. पाटील सभागृहात प्रश्नांचा मारा करण्यासाठी अधीर झालेल्या वार्ताहरांना परवा श्री. पाटील स्वतःच सांगत होते. "तसं असतं तर मला फार आवडलं असतं. पण दुर्दैवानं तसं काही नाही." ( People say I am a power in Bombay. I would be glad to be so. But unfortunatlely I am not.)

त्या राजीनामा प्रकरणात आपला काहीच हात कसा नाही, हे श्री. पाटील वार्ताहरांना पटवून देत असताना हे सांगत होते. महाराष्ट्र सरकार आणि महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष यांच्यात निर्माण झालेल्या या पेचप्रसंगाशी आपला तसा काहीही संबंध नाही. आपण केवळ मुंबई काँग्रेसच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत असे त्यांनी सांगितले.

परंतु हे कुणाला पटणे शक्य नव्हते. तो पेचप्रसंगच इतका अस्सल होता की त्याच्यामागे कुणाचा तरी अदृश्य समर्थ हात असला पाहिजे, हे सर्वांनाच जाणवत होते. राजीनामा दिल्याची रुखरुख सारखी लागून राहिल्याने श्री. होमी तल्यारखान इतके अस्वस्थ झाले होते की त्यांच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. श्री. शांतीलाल शाह यांचा चेहरा पडला होता. मुद्रेत विफलता होती. आणि मागाहून त्यांनी वार्ताहरांना सांगितले, "गेले दोन दिवस मी झोपलो नाही हो." या साऱ्या ढेपाळलेल्या मंत्र्यांना आणि आमदारांना आपल्या निर्णयावर ताठ ठेवणारी एकच शक्ती होती. ती म्हणजे श्री. पाटील.

त्या परिषदेतून उठून घाईघाईने दुसऱ्या कामासाठी निघालेल्या श्री. स. का. पाटलांना 'माणूस'च्या प्रतिनिधीने लिफ्टपाशी गाठले आणि विचारले, "आपली मुलाखत हवी आहे." वेळ सकाळची असली तरी पाटील दमल्यासारखे दिसत होते. पडद्याआडच्या साऱ्या हालचाली त्यांनाच कराव्या लागल्या होत्या. पुढचे पाऊल कसे टाकावे याचा विचार अजून त्यांच्या डोक्यात चालू असावा.

"आप्पा इतक्या सहजासहजी पत्रकारांना खाजगी मुलाखत देत नाहीत", मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे एक मंत्री श्री. महेश्वर ठाकूर यांनी नंतर सांगितले. श्री.

पाटलांना मुंबईच्या काँग्रेस हाऊसचे लोक पाटील, स. का. वगैरे नावांनी क्वचित्‌च संबोधतात. आप्पा हेच पाटलांचे काँग्रेस हाऊसवरचे नाव. पक्के महाराष्ट्रीय.

## धनिक सत्ता

धनिक सत्तेचे पुरस्कर्ते असे एकमेव महाराष्ट्रीय पुढारी म्हणजे श्री. पाटील. आणि भारतातही त्यांच्याएवढ्या आक्रमकपणे आणि रोखठोक धनसत्तेचा पुरस्कार करणारा दुसरा पुढारी नाही. श्री. पाटील हे अतिशय महत्त्वाकांक्षी गृहस्थ आहेत. आपल्या महत्त्वाकांक्षा आणि आपली सत्यप्रियता ते कधी लपवीत नाहीत. तसेच खाजगी व्यापारावरील आणि उद्योगधंद्यांवरील आपले प्रेमही ते लपवीत नाहीत. मुंबईचे ते तीन वर्षे महापौर होते आणि मुंबई काँग्रेस कॉर्पोरेशनचे ते अनेक वर्षे नेते होते.याच काळात मुंबईतील उद्योगधंद्यांच्या केंद्रीकरणाला वेगाची गती मिळाली.मुंबईतील कित्येक उद्योगपतींवर त्यांनी अशी काही मोहिनी टाकली आहे की श्री. पाटील यांचा शब्द झेलायला ते एका पायावर तयार असतात. केंद्रीय मंत्रिमंडळात देशातील उजव्या गटाचे, मोठ्या भांडवलदारांचे हितरक्षण करणारे अनेक मंत्री असतील; पण श्री. पाटलांएवढ्या उघडपणे, प्रामाणिकपणे, हिरीरीने आणि प्रभावीपणे या गटाची बाजू कोणी मांडीत नसावेत. त्यामुळे श्री. पाटील यांना भारतीय राजकारणात विशेष महत्त्वाचे स्थान निर्माण होऊ लागले आहे. धनिक शक्तीचे आज भारतात वर्चस्व वाढत आहे. आणि ज्या प्रमाणात हे वर्चस्व वाढेल त्याच प्रमाणात श्री. पाटील यांच्या स्थानालाही महत्त्व प्राप्त होईल.

## दुर्दम्य आत्मविश्वास

आणि तरीही श्री. पाटील या गटाच्या तालावर कधीच नाचत नाहीत. उलट, तेच या बड्या धनवंतांना आपल्या तालावर नाचवतात. स्वतःच्या कर्तृत्वावर ते आयुष्यात पुढे आले आहेत. आपल्या यशासाठी ज्या ज्या गोष्टी उपयोगी पडतील त्यांचा हुशारीने वापर करण्याचे तंत्र श्री. पाटील यांनी अवगत केले आहे. त्यांचा आत्मविश्वास दांडगा आहे. आत्मविश्वास ही जगातील सर्वांत महत्त्वाची चीज आहे, असे श्री. पाटील यांना वाटते. यशाची, सतत उंच चढत राहण्याची लालसा तरुणांनी धरावी असे ते म्हणतात. ते म्हणतात, " देवाने जर आत्मविश्वासाचा दुर्मिळ गुण मजवर बहाल केला नसता तर मी आजच्यासारखा झालो नसतो. इतर ऐंशी टक्के लोकांप्रमाणेही कुठेतरी शेतकरी बनून अतिसामान्य असे जीवन कंठले असते. "

आणि यशाच्या आत्मविश्वासानेच श्री. पाटील लहानपणापासून लढत आले. बरोबर सहासष्ट वर्षांपूर्वी त्यांचा कोकणात सावंतवाडीला एका सामान्य कुटुंबात जन्म झाला. त्यांचे वडील पोलीसमध्ये होते. घरी अगदीच नावापुरती जमीन होती. पाटील यांच्या वयाच्या दहाव्या वर्षीच त्यांचे वडील व आई दोघेही वारले आणि पाटलांवर दोन भाऊ व तीन बहिणींची जबाबदारी पडली. खस्ता खात, भावंडांना सांभाळीत त्यांनी शिक्षण केले. वयाच्या अठराव्या वर्षी ते मॅट्रिक झाले आणि

मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजमध्ये त्यांना शिष्यवृत्ती मिळाली. आपले वक्तृत्वाचे अंग त्यांनी कॉलेजमध्येच कमावले. शिक्षण पूर्ण होण्याच्या आतच त्यांनी गांधीजींच्या राष्ट्रीय असहकार चळवळीत उडी टाकली. मालवणला एक राष्ट्रीय शाळा चालविली आणि १९२४ साली चळवळीबरोबर शाळाही बंद पडताच त्यांनी वृत्तपत्रीय अभ्यासासाठी ब्रिटनचा रस्ता धरला. वृत्तपत्र व्यवसायाचा ब्रिटिश डिप्लोमा मिळविणारे ते बहुधा पहिलेच भारतीय असावेत.

भारतात तीन वर्षांनी परतल्यावर 'बाँबे क्रॉनिकल' या त्या वेळच्या इंग्रजी वृत्तपत्रात ते वार्ताहर म्हणून काम करू लागले आणि हे काम करीत असतानाच त्यांनी मुंबईच्या राजकारणाचे, जीवनाचे छक्के पंजे अवगत करून घेतले. आणि वेळ येताच १९३१ मध्ये त्यांनी वृत्तपत्राचे काम सोडून सरळ राजकारणात उडी घेतली. १९३७ मध्ये ऑल इंडिया काँग्रेस कमिटीवर त्यांची निवड झाली तोवर मुंबईच्या राजकारणावर त्यांनी आपली पकड घट्ट बसविली होती. आणि १९३० ते १९४५ च्या दरम्यान आठ वेळा एकूण दहा वर्षे तुरुंगात घालवून काँग्रेसमध्ये प्रतिष्ठाही मिळविली होती.

तेव्हापासून त्यांनी काँग्रेसमधील अनेक पदे भूषविली. १९५० ते ५२ अशी तीन वर्षे ते सतत मुंबई महानगरपालिकेचे महापौर म्हणून निवडून आले. १९५२ साली झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून ते सतत लोकसभेचे सदस्य म्हणून निवडून येत आहेत. १९५७ पासून ते काँग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद आहेत.

## सरदार पटेलांचा प्रभाव

श्री. पाटील यांच्या जीवनावर सरदार पटेलांचा मोठा प्रभाव. पटेलांबद्दल त्यांना अत्यंत आदर. राष्ट्रीय असहकाराच्या काळात १९३६ नंतर सरदार पटेलांनी मुंबई आणि गुजरात काँग्रेसवरील आपला प्रभाव बसविण्याचे प्रयत्न सुरू केले तेव्हा त्यांना मुंबईतील कुणीतरी समर्थ माणूस हाताशी हवा होता. श्री. पाटील त्यांच्या नजरेत भरले होते. त्यांनी लगेच त्यांना हाताशी धरले. गुजराती समाजाची श्री. पाटलांवर एवढी श्रद्धा बसण्याचे कारण पटेलांचा त्यांच्यावरील हा विश्वासच. स्वातंत्र्यपूर्व काळात सरदार पटेलांनी काँग्रेसला अनेक भांडवलदारांकडून कोट्यावधी रुपये मिळवून दिले. त्यात त्यांना पाटलांची बरीच मदत झाली. श्री. पाटील अद्यापही ते संबंध टिकवून आहेत.

पटेलांचा माणूस म्हणून पंडित नेहरू श्री. पाटलांना १९५७ पर्यंत दूर ठेवून होते. पण पाटील यांची ताकद वाढत होती. देशातील भांडवलदार, कारखानदार यांच्यांतील त्यांचे वजन वाढत होते. त्याकडे दुर्लक्ष करणे शक्य नव्हते. १९५७ साली नेहरूंनी त्यांच्याकडे जलसिंचन आणि विद्युत या किचकट खात्याचे मंत्रिपद दिले. पुढच्या वर्षी दळणवळण खात्याचे त्यांना मंत्रिपद मिळाले. १९५९ मध्ये त्यांना शेतीखाते मिळाले. ज्या ज्या खात्यात श्री. पाटील जात त्या त्या खात्यांचे काम

चोख करून सर्वत्र आबादीआबाद असल्याचे ते पटवून देत. दोन मंत्र्यांच्या राजकीय आत्मघाताचे कारण ठरलेले शेतकीखाते त्यांच्याकडे देण्यात आल्यावर त्यांनी अनेक लटपटी खटपटी करून अमेरिकेकडून भरमसाट गहू मिळवला. आणि देशात अन्नाची अक्षरशः आबादीआबाद असल्याचे जाहीर केले. शेवटी शेतकी खात्यालाही हा माणूस बधत नाही असे बघून नेहरूंनी त्यांच्यावर कामराज योजनेची कुऱ्हाड चालवून त्यांना मंत्रिमंडळातून १९६३ साली बाद केले. तेव्हापासूनच पाटील आणि कामराज असे दोन गट काँग्रेसमध्ये स्पष्ट होऊ लागले होते. पं. नहरू निधन पावल्यानंतर जून १९६४ मध्ये कै. लालबहादूर शास्त्रींना आपल्या नव्या मंत्रिमंडळात उजव्या गटाचे प्रतिनिधी म्हणून श्री. पाटलांना घ्यावे लागलेच. तेव्हापासून ते अनेक वादळांना चिकाटीने तोंड देत मंत्रिमंडळात टिकून आहेत. त्यांच्या रेल्वे मंत्रिपदाच्या कारकीर्दीत अनेक रेल्वे अपघात झाले. कित्येक वेळा त्यांचे राजीनामे मागण्यात आले. पण पाटील एवढ्या तेवढ्या कारणांवरून राजीनामा देत नाहीत. ते महत्त्वाकांक्षी आहेत.

राजकारणी मुत्सद्दी असूनही जीवनाची रसिकतेने मजा लुटणारा भारतीय पुढारी विरळा. श्री. पाटील असे आहेत. आपल्याला सुखासीन जीवन आवडते असे ते स्वतःहून मनमोकळेपणाने सांगून टाकतात. वातानुकूल घरात राहण्याची, उत्तमोत्तम कपडे वापरण्याची, पत्ते खेळण्याची, उंची हॉटेलातील पार्टचांची त्यांना हौस आहे. पत्ते खेळण्यात त्यांचा हात धरणे कठीण आणि क्लबातील गप्पांमध्ये एखाद–दुसराच मंत्री त्यांना बरोबरी करू शकेल.

## महाराष्ट्राची चाचपणी

महाराष्ट्रात आणि भारताच्या राजकारणात पुन्हा एकदा जोर करण्याचे श्री. पाटील यांनी ठरविलेले दिसते. आतापर्यंत त्यांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्राबाहेर आणि महाराष्ट्रात मुंबईपुरतेच होते. पण आता त्यांनी महाराष्ट्राकडे लक्ष देण्याचे ठरविलेले दिसते. महाराष्ट्रातील जिल्हा काँग्रेसने दिलेली निमंत्रणे ते स्वीकारीत आहेत. सांगलीच्या एका काँग्रेस मेळाव्याला ते जात आहेत. थेट महाराष्ट्रातील काँग्रेसच्या समारंभाला ते क्वचितच गेले आहेत. त्या दृष्टीने त्यांच्या या हालचाली सूचक आहेत.

परवाचे राजीनामा प्रकरण आपणांलाही अनपेक्षित होते, असे श्री. पाटलांनी कितीही सांगितले तरी त्याबद्दल अनेकांना शंका आहे. मुंबईतील आपल्या सामर्थ्याची चुणुक महाराष्ट्र सरकारला आणि केंद्र सरकारला दाखविण्याचा तर हा प्रयत्न नसावा ना ? ज्या दिवशी मंत्र्यांनी आणि आमदारांनी राजीनामे दिल्याचे जाहीर झाले त्या दिवशी मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीच्या ऑफीसमध्ये श्री. पाटील यांचे अभिनंदन करणाऱ्या १८२१तारा आणि असंख्य पत्रे भारतातून ठिकठिकाणांहून आली. महाराष्ट्र सरकारला धडा शिकविल्याबद्दल त्या तारांमध्ये अभिनंदन केले होते.

'माणूस' च्या प्रतिनिधीने श्री. पाटलांना विचारले, "राजीनाम्याच्या प्रसंगामुळे आपण मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटी व महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी यांच्यांतील मूलभूत मतभेदांना वाचा फोडली आहे काय ?" त्यावर पाटील उद्गारले, "आमच्यात तसे मतभेद नाहीतच मुळी. आमचे संबंध अतिशय चांगले आहेत. 'घेरा डालो' प्रकरणात सरकारचे धोरण चुकले हे लक्षात आणून देण्यासाठी हा निषेध आहे."

मांडवलदारांचा बालेकिल्ला म्हणजे मुंबई प्रदेश कॉंग्रेस. मुंबई कॉंग्रेस महाराष्ट्रापासून अलग करण्याचे कर्तृत्व श्री. पाटलांचेच. गेल्या दोन निवडणुकांमध्ये त्यांनी श्री. कृष्ण मेनन यांना मुंबईमधून लोकसभेसाठी उभे राहू दिले. या वेळेस मात्र मुंबई कॉंग्रेसने चक्क मेनन यांना तिकीट द्यायचेच नाही असे जाहीर करून टाकले. आपल्या सामर्थ्याची चुणूक दाखविण्याचा हा दुसरा प्रकार.

## समाजवादाच्या अवगुंठनातून बाहेर

श्री. पाटील यांचे दिल्लीतील वजन वाढते आहे. वर्षानुवर्षांच्या प्रयत्नांनी निर्माण केलेला त्यांचा अमेरिका स्नेहही त्यांना या बाबतीत हात देतो आहे. समाजवादी धोरणांचा बुरखा घेऊन कॉंग्रेस आतापर्यंत वावरत आली. जसजसा हा बुरखा दूर होईल तसतसे श्री. पाटील यांचे व्यक्तिमत्व वाढेल. किंबहुना समाजवादी बुरख्यातून कॉंग्रेसला बाहेर काढण्याचेच श्री. स. का. पाटलांचे प्रयत्न चालू आहेत. परंतु त्यासाठी त्यांना मोठा संघर्ष करावा लागेल. कामराजांच्या नेतृत्वाखाली असलेल्या समाजवादी कॉंग्रेस गटाशी त्यांना लढा द्यावा लागेल.

दिल्लीतील ताज्या गरमागरम अफवांनुसार श्री. पाटील यांची गृहमंत्री पदासाठी वर्णी लागत आहे. परंतु त्यांची महत्त्वाकांक्षी नजर सर्वोच्च पदावर आहे. त्यासाठी श्री. पाटील यांना आपल्या राज्यात मोठा पाठिंबा मिळविणे भाग आहे. महाराष्ट्रातील बहुतेक लोकमत श्री. यशवंतराव चव्हाणांच्या मागे आहे. ते वळवून आणणे हे श्री. पाटलांसारख्या 'महाराष्ट्र द्वेष्टा' म्हणून शिव्या खाणाऱ्या नेत्याला मोठे कठीण काम आहे. परंतु त्यांचे प्रयत्न चालू आहेत हे निश्चित.


भारताचे माजी अर्थमंत्री श्री. चिं. द्वा. देशमुख यांनी मागे एके ठिकाणी म्हटले होते, "श्री. पाटील हे उत्कृष्ट संघटक आणि व्यवस्थापनकुशल आहेत. परंतु मुंबईतील व्यापारी समाज सोडला तर त्यांना इतरत्र लोकप्रिय व्यक्तिमत्त्व नाही. त्यांच्या कोरड्या राजकारणीपणामुळे सर्वसाधारण लोक त्यांच्याकडे अविश्वासानेच पाहतात."

आणि हे खरे आहे. महाराष्ट्रात त्यांच्याबद्दल अनेक गैरसमज आहेत, हे श्री. पाटील स्वतः जाणून आहेत. "माझ्या हाताच्या रेषाच विधात्याने उलटया बसविल्या आहेत," असे श्री. पाटील यांनी महाराष्ट्राचे गृहमंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांच्याजवळ 'उद्वेगाने' उद्गार काढल्याचे श्री. देसाई यांनी नुकतेच एका ठिकाणी लिहिले आहे.


ते काहीही असले तरी महाराष्ट्र काँग्रेसमध्ये निर्माण केलेल्या नव्या पेचप्रसंगाने श्री. पाटील यांनी आपल्याविषयीच्या गैरसमजांत अधिकच भर टाकली आहे. पण त्याचे श्री. पाटील यांना काही वाटत नाही. मुंबई प्रदेश काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनाही त्याबद्दल काही वाटत नाही. उलट आपण केले तेच बरोबर केले असे त्यांना अद्यापही वाटते.

"छापा, वाटेल ते छापा," मुंबई काँग्रेसचे एक जबाबदार पदाधिकारी साऱ्या विरोधी पक्षीय पत्रकारांना उद्देशून माझ्याजवळ कडवटपणे म्हणाले, "तुम्ही आमच्या आप्पांबद्दल वाट्टेल ते वाईट छापा. त्यामुळे आमचं काही बिघडणार नाही. उलट जेवढं वाईट छापाल तेवढी जास्त मतं आम्हांला मिळतील." आप्पांच्या कर्तृत्वावर मुंबई काँग्रेसची किती श्रद्धा आहे याचा हा एक पुरावाच.

पण केवळ एवढ्या भांडवलावर दिल्लीतील सर्वोच्च पद श्री. पाटील आपल्याकडे खेचून आणू शकतीलच, याची शाश्वती देणे कठीण आहे. ●




सर्व प्रकारची वाद्ये मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण



नाविन्यपूर्ण इलेक्ट्रिक गिटार, मेंडोलीन व बुलबुलतरंग इत्यादींचे आद्य प्रवर्तक

**हरिभाऊ विश्वनाथ कं.**

**संगीत वाद्यालय**

**दादर, मुंबई २८.**

# विचारवारे

– समीर

## □ मनोविज्ञानाचे नवे दालन

आजचे युग विज्ञानाचे आहे, असे म्हणण्यापेक्षा विज्ञानांचे आहे, असे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल. कारण प्रत्यही नवनवीन शास्त्रे उदयाला येत आहेत. त्यांत एक अगदी नवीन भर 'सायंटॉलॉजी'ची पडली आहे. डॉ. फिलिस रॉडिन नावाची एक पाश्चिमात्य 'सायंटॉलॉजिस्ट' नुकतीच भारत–भेट देऊन गेली. तिच्या मते सायंटॉलॉजी हे मानसशास्त्राचे एक नवीन अंग असून "आपण जे काही करीत असू ते अधिक चांगले करता येण्यासाठी मानवाच्या मनःसामर्थ्याला वाव देणे" हे त्याचे क्षेत्र आहे. सायंटॉलॉजी हे एक तर्कशुद्ध शास्त्र असून ते सहा महिन्यांत स्थूल मानाने शिकता येते.

डॉ. रॉडिनने कॅन्सरवर सायंटॉलॉजीचा उपचार यशस्वीपणे केला आहे, तर एजिलेप्सीसारखा रोगही थोड्या दिवसांत बरा केला आहे. या अभिनव शास्त्राचा एक नाट्यमय उपयोग डॉ. रॉडिनने केला तो जपानमध्ये. हिरोशिमावर अणुबाँब पडला, तेव्हा हिरोमुशी मोरिशिटा नावाचा एक तेरा वर्षांचा मुलगा स्फोटाच्या धक्क्याने नदीत पडला. पण नदीचे पाणीच जणू पेटले होते. तो कसा तरी बाहेर आला, तेव्हा त्याच्या चेहऱ्याचा अर्धा भाग अक्षरशः मेणाप्रमाणे वितळला होता! स्फोटानंतरच्या अणु–विकिरणामुळे त्याच्या अंगावर माशांनी अंडी घातली व ती झाडून टाकण्याचे त्याला जणू वेडच लागले, पण इतक्या कठीण परिस्थितीतल्या त्या माणसालाही डॉ. रॉडिनने सायंटॉलॉजीने बरे केले. आता तो शिक्षक आणि कवी बनला आहे.

आजच्या जगातली सत्तर टक्के दुखणी मानसिक कारणांतून उद्भवलेली असतात, तर बाकीच्यांचे परिणाम मानसिक स्वरूपाचे असतात. सायंटॉलॉजीने ही मानसिक कारणे दूर करता येतात. एका फ्रेंच स्त्रीने हिंदुस्थानातल्या खेड्यांतली उपासमार पाहिली, तेव्हा तिला दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी फ्रान्समध्ये झालेले स्वतःचे हाल आठवले आणि ती एकदम आजारी पडली. अशा रीतीने पूर्वीची दुःखदायक स्मृती जागृत झाली तर त्यातून आजार उद्भवू शकतो. जगाच्या एखाद्या भागात दीर्घकाळ युद्ध चालत राहिले – उदाहरणार्थ–सध्या व्हिएटनाममध्ये, तर तेथल्या लोकांच्या मनावर परिणाम होऊन त्यांना रोग होतात.

मन हे कॉम्प्यूटर यंत्रासारखे असते. इलेक्ट्रॉनिक कॉम्प्यूटरमध्ये खूपशी कार्डे व बटणे लावलेली असतात, तशीच मनाची मांडणी असते. त्यांतल्या एखाद्या बटणात बिघाड झाला तर मनःस्वास्थ्य ढळते. मनात आजार उत्पन्न व्हायला अवघे दोन सेकंद पुरतात, पण ते बरे करायला दहा वर्षे लागू शकतात.

## ☐ भाषांतराचे यंत्रशास्त्र

सर्वशक्तिमान आणि अक्षरशः कर्तुमकर्तुम सामर्थ्य असणाऱ्या यंत्राच्या आजच्या युगात साहित्य आणि भाषेसारखी सृजनशील मानसिक प्रक्रिया तरी अजून यंत्राच्या कचाट्यात सापडली नाही अशी कल्पना होती; पण ती आता फोल ठरू लागली आहे. उदाहरणार्थ, भाषांतराचे काम फक्त पंडितच करू शकेल, अशी आतापर्यंत सर्व जगात व अजूनही आपल्या देशात समजूत असताना या क्षेत्रातही कॉम्प्यूटर यंत्राने प्रवेश केल्याचे दिसते. अमेरिकेतील टेक्सस् विश्वविद्यालयाचे एक मानसशास्त्रज्ञ प्रा. विन्फ्रेड लेहमान सध्या भारतात आले आहेत. त्यांनी यांत्रिक भाषांतर या अभिनव विषयाची चर्चा करताना असे अभिनव मत मांडले, की भाषा ही निरनिराळ्या पातळ्यांवरच्या खुणांची विशिष्ट पद्धतीने केलेली मांडणी असते; तेव्हा एखाद्या भाषेचे या दिशेने पृथक्करण करण्यात आले तर ती भाषा जाणणारे यंत्र तयार करणे शक्य आहे. आणि एकदा एखाद्या यंत्राला अशा रीतीने एखादी भाषा शिकवली की भाषांतरासाठी दोन भाषांच्या नियमांची सांगड घालणारे यंत्र तयार करणे ही केवळ पुढची पायरी आहे. मानवी मन भाषांतर करताना ते अशाच पद्धतीने करीत असते. प्रा. लेहमान यांच्या विश्वविद्यालयात प्रकाशाची गती असलेले कॉम्प्यूटर आहेत, ते दिवसाला ५०,००० शब्द या वेगाने भाषांतर करू शकतात. "आणि ही केवळ सुरुवात आहे."

लॅटिन, ग्रीक, हिब्रू, संस्कृत, रशियन आणि जर्मन भाषा अवगत असणाऱ्या या बहुभाषी पंडिताच्या मते भाषांतर ही एक कला नसून "मोनो-लिंग्वल इनपुट" आणि "आऊटपुट ट्रॅन्सफर सिलेक्शन" आहे—आणि भाषेबद्दलचा हा दृष्टिकोन तर्कशुद्ध आहे. "पुढेमागे तर एखादी अगदी नवीन भाषा तयार होईल." जाता जाता एक माहिती— "हिंदी भाषेचे असे कॉम्प्यूटर पृथक्करण करायला पाच वर्षे लागतील."

---

### महाराज म्हणजे काय ?

न्यूयॉर्कच्या एका कॉलेजात 'तौलनिक वाङ्मया'चे प्राध्यापक श्री. डेव्हिड रुबिन हे मुन्शी प्रेमचंद या प्रसिद्ध हिंदी लेखकाच्या लघुकथांचे इंग्रजीत भाषांतर करण्यासाठी सध्या भारतात आले आहेत. त्यांचे मते भाषांतराचे काम बहुधा नेहमीच दुर्धर असते. उदाहरणार्थ, खेडेगावांत भटजीला किंवा पुजाऱ्याला 'महाराज' म्हणतात, पण सगळे शब्दकोश पालथे घालूनही 'महाराज' या अर्थाचा प्रतिशब्द इंग्रजीत सापडायचा नाही. महाराज म्हटले की अमेरिकन माणसासमोर खेड्यांतल्या भटा—भिक्षुकाच्या ऐवजी अगदी निराळे चित्र उभे राहते.

---

## आज अनिद्रेची रात

आज अनिद्रेची रात
हट्टी मिटेना पापणी
उभे डोळियांत पाणी
नजरेत साकळल्या
आर्त तुझ्या आठवणी
गळ्यामध्ये दाटलेल्या
नाही हुंदक्यांना अंत
आज अनिद्रेची रात !
काळ्या काजळी घनांची
वाढतीच नभी दाटी
घुमे वाऱ्याची कर्कश
शीळ क्षितिजाच्या ओठी
आणि कासावीस चंद्र
हेलकावे वादळात
आज अनिद्रेची रात !
काळ्यानिळ्या एकांताचे
शिरे काळजात पाते
नुरलेले शब्दांचे ग
आता आशयाशी नाते !
गीत पेटलेले माझे
जागरणाच्या ज्वाळेत !
आज अनिद्रेची रात !!

—उ. रा. गिरी

## भक्ती

द्रौपदीसारखी नव्हती आतंता
तेणे माझ्या हाका व्यर्थ गेल्या
शबरीसारखी नव्हती गा ओढ
वाढला नैवेद्य शिळा झाला
थोर कबिराची कुठे उत्कटता ?
धागा धागा गुंता झाला माझा
सावत्याची नाही केली वेडी भक्ती
शेती, जगजेठी दुरावलो
काळजाला कधी नव्हता गा पीळ
उरी तळमळ जाळणारी
संतांपरि कधी नाही वेडेपण
गंध शब्दांतून यावा कसा ?

— दत्ता हलसगीकर

## सांजवेळ

सावल्या विसावल्या गगन खिन्न जाहले
मिटूनि पंख आपुले तमाम वृक्ष झोपले
काजळी झरे गहन क्षितिज त्यात लोपले
आसमंत मूकमौन स्तब्ध पवन-पाऊले
थकूनि पक्षी पातले नीडांत शांत झोपला
काजवे अता तमात गीत गाऊ लागले
विज खांब पित मंद एकला उभा जळे
जवळ बाजूला इथे गाढ झोपले तळे

—कुसुमानंद

## गलबते

ऐन रात्रीला निघाली वादळाची गलबते
अंध दिशा जाहल्या वाट कोठे सांडते
फाटलेली नजर फाटले काळिज हे
अणूरेणू शोधिला अंतराळी तू कुठे ?
चंद्र पुरता झाकला केशपाशी शामले
काळोखले तारुण्य माझे जाळ वक्षी साहते
आसवे गज उभे बंदिशाळा आगळी
आकाशी जीवनाला गांजिते नि छेदिते
ही तुफानी गलबते वादळी वेदनांची
शोधिती कैफात की देव कोठे भेटते ?

— श्रीकांत पुरोहित

# आस्वाद

प्रियजनांच्या विरहाने रात्र तळमळत जागून काढणे हा अनुभव अनादी आहे आणि अनंतही आहे. या नेहमीच्या विषयाचा सुंदर आलेख श्री. उ. रा. गिरी यांच्या 'आज अनिद्रेची रात' या कवितेत पाहायला मिळतो. प्रतिमा नव्या आहेत आणि ढंगही नवकवितेचा आहे. पण दुर्बोधता कुठेही नाही. काळ्यानिळ्या एकांताचे पाते काळजात घुसते किंवा कासावीस चंद्र वादळात हेलकावे खातो, या कल्पना भावनेच्या ओलाव्यामुळे अंतःकरणाला भिडतात. विशेषतः, शेवटी जागरणाच्या ज्वालेत गीत पेटले ही कल्पना तर फारच समर्पक आहे. कविता निर्माण होण्यास वेदनांची आच आवश्यक असतेच. इतपत सुबोधपणा असेल तर खरे रसिक नवकवितेचे हार्दिक स्वागत करतील.

'गल्वते' ही श्री. श्रीकांत पुरोहितांची कविता नादमधुर पण थोडी अवघड आहे. प्रतिमा गोंधळून एकमेकींचे काहीसे बेरूप करतात. कवितेची सुरुवात जितक्या सफाईने झाली तितका शेवट झाला नाही. वृत्तात अन्य छंदाच्या गणांची भेसळ झाली. पण एक-दोन कल्पना मात्र (वादळाची गल्बते, आसवांचे गज इ० ) विचार करायला लावतात. भावनांच्या प्रक्षोभाला भाषा चांगली आहे.

श्री. दत्ता हलसगीकर यांची 'भक्ती' ही कविता संपूर्णपणे निर्दोष वाटेल. द्रौपदी, कबीर, शबरी इ. प्रसिद्ध भक्तांचा उल्लेख प्रथमदर्शनी ठरीव साचाचा दिसला तरी त्याला कोंदण नवे दिले आहे, यात शंका नाही. खरी कविता काळजाला पीळ पडल्याशिवाय किंवा विलक्षण आर्तता असल्याशिवाय निर्माण होत नाही. आज व्यवहारातही उत्कटतेचा अभाव जाणवतो. कविताच काय, कुठलीही उच्च निर्मिती किंवा कार्य उत्कटतेच्या अभावी होणार नाही. म्हणून ही कविता एका भक्ताने दाखविलेला आपला अपुरेपणा एवढ्याचपुरती मर्यादित वाटत नाही. आजच्या बाजारीपणावरील ते एक सूचक भाष्य वाटते.

एकेक रंगाचा फटकारा मारून स्थूल पण परिणामकारक चित्र उभे करण्याची पद्धत असते. तीच 'सांजवेळ' या कवितेत श्री. कुसुमानंदांनी स्वीकारली आहे. एखाद्या चित्रकाराला यावरून उत्तम चित्र रेखाटता येईल. ही स्वभावोक्ती आहे. 'संगमोत्सुक डोहा'त गुरू कविवर्य माधव जूलियन् यांनी जो विरहातला एकाकीपणा रंगविला आहे तोच या लहानशा कवितेला वर्ण्य रस वाटतो. 'विजेचा दिवा' कवितेचे आधुनिकत्व दाखवितो. बाकी ते फारसे असमर्पकही नाही म्हणा.

— *गोपीनाथ तळवलकर*

# भगिनी

“ माझं म्हातारीचं काय भाऊ, पिकलं पान, गळायचं एक दिवस. पोरगं बीमार आहे, नेऊ म्हणते त्याला डॉक्टरकडे . . . ”

**प्रा. श. दि. चरेगावकर**

बडनेरला मी नुकताच बदलून आलो होतो. बऱ्याच प्रयत्नांनंतर मला एक बऱ्यापैकी घर मिळालं होतं. पण ते गावापासून दूर असल्यानं बाजारपेठ, भाजीबाजार, दवाखाना, शाळा सगळंच आम्हांला दूर पडत असे. आईची मुख्य तक्रार होती, ती म्हणजे तिला स्वत: जाऊन बाजारहाट करता येत नव्हता. मी आणून दिलेल्या वस्तू तिला पसंत पडत नसत. दुसरं म्हणजे दुकानदार मला वस्तू फार महाग देतात, असं तिचं ठाम मत होतं. रोज सकाळ-संध्याकाळ आमची भाजी या प्रकरणावर खूपच चकमक उडत असे. मार्केटभर फिरून, निवडून आणलेली भाजी तिला मात्र शिळी, निबर, सडलेली अशी वाटे. निदान महाग तर वाटायचीच ! मी या कटकटीला फार कंटाळून गेलो होतो. पण नाइलाज होता.

एक दिवस सकाळी पुढच्या खोलीत वर्तमानपत्र चाळीत मी बसलो होतो. तेवढ्यात, ‘ घेता का भाजी! ’ डोक्यावर भरलेली टोपली घेऊन एक बाई विचारीत होती. मी आईला हाक मारली. ‘ हो हो, थांब ग ’ असे म्हणत आई बाहेर आली. भाजी घेत असताना आई तिची माहिती विचारीत होती. प्रथमभेटीतच माणसं जोडण्याचा आईचा स्वभाव! पण त्या भाजीवालीनं मात्र तिच्यावर ताण केली. ‘ नव्यानं आलेल्या दिसता बाई, हा मुलगा का, नोकरीला आहे का इथं, रोज लागत असेल भाजी ’ इत्यादी प्रास्ताविक प्रश्न विचारल्यानंतर शेवटी जाते वेळी आईला, “ तुम्ही काही फिकीर करू नका, मी जमवून देईन सारं, ” असं आश्वासन देऊन गेली. आईपुढे अनेक प्रश्न होते. मोलकरीण पाहणं, दळण आणणं, पोस्ट, दवाखाना, दुकानं कोठे आहेत यांचा शोध करणं, कुठं काय चांगलं नि स्वस्त मिळतं याचा तपास करणं, या सर्व अडचणी ती त्या बाईच्या मदतीनं सोडविणार होती. राधाबाई होतं तिचं नाव ! राधाबाईनं प्रथमभेटीत आईचं मन तर जिंकलंच पण मलाही तिच्याबद्दल सहानुभूती वाटली. आम्ही म्हटलं गरीब आहे, पण



बिचारी चांगली आहे. रोज तिच्याकडूनच भाजी घ्यायची, असं आम्ही ठरवलं.

हळूहळू राधाबाईची आईशी चांगलीच गट्टी जमली. सकाळच्या वेळी मी बाहेरच्या खोलीत लिहीत किंवा वाचत बसलेला असे, त्या वेळी नियमितपणे तिची साद कानांवर यायची. आई तिला राधाच म्हणे, तशी ती वयानं लहान नव्हती. चाळीशी उलटून गेलेली असावी. काळीसावळी, किडकिडीत राधाबाई जन्मभर केलेल्या कष्टांमुळे अकाली वृद्धच दिसत होती. पण चेहरा मात्र हसतमुख असायचा! त्यामुळं तिचं एकंदर व्यक्तिमत्त्व प्रसन्न वाटे. तशी ती प्रकृतीनं काटक होती. केवढी मोठी जड पाटी ती डोक्यावर घेऊन कितीतरी दूरवर फिरत असे. कडक ऊन असो, पाऊस, थंडी, कशाला जुमानायची नाही. राधाबाईचा हिशेब अगदी चोख असायचा. नवा पैसा राहिला तरी मागून घ्यायची. आमचा राहिला तर आणून द्यायची. आमचं घर म्हणजे विश्रांतिस्थान होतं तिचं. अकराच्या सुमारास ती यायची. सुरुवातीला काही दिवस 'घेता का भाजी!' म्हणून विचारीत असे, पुढं पुढं मात्र न विचारता पाटी घेऊन घरात प्रवेशच करायची. पाटी खाली उतरता उतरता "आई, झाला का ग स्वयंपाक," म्हणत बैठक मारायची. पानाची चंची काढून थोडा वेळ गप्पा मारीत बसायची. कधी कधी उशीर झाल्याबद्दल आई तिला रागवायची. मग 'रागावू नको माझी बाय, तो तुझाच मुलगा आहे असं नाही, माझाही लेक आहे तो, घे भाजी. टाक चटकन् फोडणीला! कवळीलस मेथी आहे. तिच्या भडीमारानं मग आईचा राग कुठल्या कुठं पार व्हायचा.

राधाबाईचं एक वैशिष्टच होतं, मनातलं ती फारसं कधी बोलायची नाही. तिची जात कोणती, तिला घरी कोणकोण आहेत, तिची आर्थिक स्थिती कशी आहे यांबद्दल का कोण जाणे मला फार उत्सुकता वाटे. परंतु तिला विचारायचा मात्र धीर होत नसे. ती फार प्रामाणिक होती एवढं ख . बाजारभावानं आम्हांला

ती घरबसल्या भाजी आणून देत होती. तीदेखील ताजी, कोवळी. आई तिला कधी चहा, काही असलं तर खायला द्यायची, पण ते घेताना तिला फार संकोच वाटायचा. ' राहू देत आई, मला कशाला देतेस, बाबू खाईल तुझा. जाताना मग एखादा कोवळा भोपळा किंवा एखादी मेथीची जुडी ठेवून द्यायची. त्याचे पैसे जर देऊ लागलो तर ती आमच्यावर रागवायची. ' मावशीच्या प्रेमाचं मोल करता, ' म्हणून मला दटावायची. असं काही तिनं केलं की मन भरून यायचं. दीड-दोन वर्षांतच तिच्याबद्दल आम्हांला खूप आपुलकी वाटू लागली.

पुढं पुढं राधाबाईची प्रकृती बरी नसायची. त्यामुळं दोन-चार दिवसांनी एखादी फेरी व्हायची तिची. ती आली नाही की चुकल्या चुकल्यासारखं वाटायचं. आईलासुद्धा तिचा लळा लागला होता. ती आली की आई तिच्या प्रकृतीबद्दल विचारपूस करायची. तिला म्हणायची, " राधे, औषध घे बघू चांगलं. एवढे कष्ट करतेस अन् जिवाचे असे हाल का?" ती ' हो ' म्हणायची. परंतु खरं म्हणजे घेत नसावी असं दिसायचं. दिवसेंदिवस ती क्षीण होत असल्याचं आमच्या लक्षात आलं. पिकल्या केसांनी तिच्या मुखावर कसली तरी दुःखाची, उदासीनतेची छाया पसरलेली होती. मला त्याचं गूढच वाटायचं. अवजड पाटी डोक्यावर घेऊन चालणाऱ्या तिच्या त्या कृश आणि थकत चाललेल्या देहाकडे पाहिलं की मन अस्वस्थ व्हायचं! तिचे पाय लटपटायचे. मोठ्या प्रयासानं तोल सावरीत ती नेहमीच्या आवाजात ' घेता का भाजी ' असं पुकारीत सगळ्या घरी फिरायची.

राधाबाईला एक मुलगा, सून आहेत एवढी माहिती इतक्या दिवसांत आम्हांला मिळाली होती. घरी प्रत्यक्ष काय परिस्थिती आहे याचा मात्र पत्ता नव्हता. आम्हीदेखील तिला त्याबद्दल काही विचारलं नव्हतं. कारण तिला ते आवडणार नाही अशी खात्री होती. परंतु दिवसेंदिवस खंगत चाललेल्या तिच्या शरीराकडे आणि अविरत कष्टांकडे पाहून मात्र तिला काही विचारावं असं वाटू लागलं. तिला काही मदत करता आली, तर पाहावी या हेतूनंच ! तशातच एकदा दुपारी दोनच्या सुमारास ती आली. वास्तविक ही तिची ठराविक वेळ नव्हती. मुख्य म्हणजे तिच्या डोक्यावर पाटीही नव्हती. एखादा बिन ड्रेसातील पोलीस किंवा पोस्टमन दिसावा तशी ती वाटली. दारातूनच तिनं मला " आई आहे का घरात " असं विचारलं. आई नसल्याचं सांगताच तडक माघारी वळली. मला राहवेना. तिला काही अडचण असेल व मदत करण्याची संधी अनायासे चालून आल्यानं मला थोडं बरंच वाटलं. या निमित्तानं का होईना, पण तिच्या अंतरंगात प्रवेश करायची वेळ आली याबद्दल मला आनंद वाटला.

" राधाबाई मला सांगा ना काय काम होतं, " चटकन् उठून मी हाक मारली. तिनं वळून पाहिलं आणि खाली मान घालून " जरा पाच रुपये लागत होते, उद्या आणून देते परत. " अतिशय ओशाळल्या स्वरानं मला म्हटलं. कदाचित आई असती

तर तिला मोकळेपणा वाटला असता. मला वाटलं तिला औषधासाठी पैशांची गरज असणार. पैसे देताना मी म्हटलं,

" राधाबाई, कोणाचं औषध घेता सध्या? कशी काय आहे तब्येत!"

" माझं म्हातारीचं काय भाऊ, पिकलं पान, गळायचं एक दिवस. पोरगं बीमार आहे फार दिवसांपासून. त्याला नेऊ म्हणते डॉक्टरकडे, कंटाळून गेले त्याच्या बीमारीनं."

मोठ्या मुष्किलीनं राधाबाईच्या तोंडून वरील शब्द बाहेर पडले. " सरकारी दवाखान्यात न्या आधी." डॉक्टर कदाचित् लुबाडतील म्हणून मी सुचवलं.

" चार महिने झाले सरकारीच औषध आहे. काही गुण नाही. तर आता म्हणते पाटील डॉक्टरकडे न्यावं. पैसे नव्हते म्हणून थांबले इतक्या दिवस! काय सांगू तुम्हांला. या पोरापायी धंदा बसला माझा. हे असं फिरलं की भाजी विकायची राहून जाते. बरं न फिरू तर कोण करणार; वेळ मिळाला तर भाजी घेऊन फिरते. तर तेव्हापर्यंत शिळी होऊन जाते. आजवर सगळ्यांना ताजी भाजी दिली. नावाला बट्टा लागतो. चांगलं वाटत नाही."

राधाबाईच्या बोलण्यात कधी नव्हे ते दुख:, कधी नव्हे ती लाचारी त्या दिवशी मला प्रथम दिसली. तिच्या ओढलेल्या चेहऱ्यावर प्रपंचाचं दु:ख आणि काळजी साठून राहिली होती. आयुष्याच्या अखेरच्या दिवसांत तिला स्वस्थता लाभत नव्हती. स्वत:च्या थकलेल्या शरीराकडे, ढासळलेल्या स्वास्थ्याकडे पाहावयाला तिला फुरसत नव्हती. आतापर्यंत जे केलं तेच पुन्हा करावं लागत होतं. तिचा एकुलता एक तरुण मुलगा पागल झाला होता. त्याच्या तुटपुंज्या मिळकतीत कसा का होईना, पण बसून आयता तुकडा खाल्ला असता; पण दैवाला तेवढंही पाहवलं नाही. नव्हे, तिची त्याला सत्वपरीक्षाच घ्यावयाची होती. उतरत्या वयात आपलं दुर्बल शरीर घेऊन अगतिकतेनं तिला या संसारचक्रात अडकावं लागतं होतं. दोन वर्षांपासून मुलाला वेडाचे झटके येत होते. पुढेपुढे तेवढं जास्तच वाढलेलं होतं. पैशाच्या अभावी ती उपचार करू शकली नव्हती. घरी सून आणि दोन लहान नातवंडे होती. सास्वासुना कष्ट करून सर्वांना सांभाळीत होत्या. राधाबाई करारी स्त्री होती. त्यातूनही मुलाला बरं करण्याची तिची उमेद होती. त्या वेळी माझ्याकडून पैसे घेऊन गेली ती आली आठवड्यानंतर.

या वेळी मात्र ती भाजी घेऊन आली होती. पैसे परत केले आणि भाजी देऊन जास्त न बोलता निघून गेली. मुलाच्या प्रकृतीबद्दल विचारलं असता, साधारण आहे असं मोघम उत्तर देऊन तिनं मला गप्प केलं. जास्त खोलात शिरलं तर कदाचित् तिचं मन दुखावेल म्हणून मी बोललो नाही. परंतु, ज्या अर्थी तिनं पैसे परत केले त्या अर्थी पैशाची विशेष अडचण नसावी असा मी तर्क केला. दुसऱ्या दिवशी मात्र तिच्याऐवजी तिची सून आली भाजी विकायला. आम्ही तिला यापूर्वी फक्त एक-

दोन वेळाच काय ती राधाबाईबरोबर आलेली पाहिली होती. राधाबाई जवळच्या खेड्यावर एका मांत्रिकाकडे मुलाला घेऊन गेल्याचं कळलं. उसनेपासने करून पंचवीस रुपये तिने जमविले होते. पुढंही दोन चार दिवस सूनच येत होती. वयाने फार नव्हती. या बाईच्या चेहऱ्यावर काळजीचा कुठं मागमूसही नव्हता. प्रकृतीनं चांगली होती. आता खरं तर सासूला विश्रांती देऊन तिनं धंदा सांभाळायला हरकत नव्हती. परंतु आठ दिवसांच्या आतच राधाबाई हजर झाली. मंत्रतंत्राचा फारसा उपयोग झाला नाही, असं तिच्याकडून कळलं. ती आता देवावर भरंवसा ठेवून रोजच्या मार्गाला लागली होती. आता खूपच गंभीर बनली होती. कामाव्यतिरिक्त बोलणं तिला रुचत नव्हतं. तेवढी ताकद आणि मनःस्वास्थ्यही नव्हतं तिच्याजवळ. धंद्यात सुनेची मदत का घेत नाहीस, असं आईनं विचारल्यावर ती म्हणाली, " आई, ती तरणीताठी पोर. तूच सांग तिला असं दारोदार फिरवणं बरं दिसतं का, लोकांची नजर किती खराब असते. त्यातून हा धंदा असा, माझं मलाच मी कसा चालवते ते माहीत आहे. आज याचं उसनं घे, उद्या त्याचं परत फेड. उधारी–बिधारीचे व्यवहार काय ते मलाच जमणारे. गिऱ्हाइकाचा माझ्यावर विश्वास आहे म्हणून चाललंय हे, नुसत्या निरोपानं पाच–पंचवीस रुपये मिळू शकतात आज मला. तुला सांगते आई, या पोरापायी इतकं कर्ज झालंय मला? त्या पोरीला कधी नेसायला धड मिळत नाही की, वेळेवर तुकडा खावयाला नसतो कधीकधी. माझं काय मी म्हातारी आहे, कसंही चालवून घेते. तिच्यासाठी मला रात्ररात्र झोप येत नाही. वाटतं, पोरगी दुसऱ्या एखाद्या घरी पडली असती तर सुखानं दोन घास तरी तिनं खाल्ले असते. "

दिवसेंदिवस राधाबाईची प्रकृती आणि परिस्थिती खालावतच होती. आम्ही पुष्कळदा तिला पैसे, जुने कपडे, कधी धान्य तर कधी जेवणखाण, या ना त्या हातानं मदत करायची. तिची बहुतेक गिऱ्हाइकं जुनीच होती. त्यांच्याकडूनही मदत मिळायची. अजूनही मदत घेताना ओशाळून नाइलाजानं ती स्वीकारीत होती. माझ्या मनात बऱ्याच दिवसांपासून एक गोष्ट विचारावयाची होती. विषय निघाला तसं मी तिला म्हटलं,

" राधाबाई, राग मानू नका, पण सुचवतो. मुलाला तुम्ही नागपूरला वेड्याच्या दवाखान्यात ठेवून द्या. मी खटपट करतो. काही खर्च पडणार नाही. जेवणखाण, कपडेलत्ते, मोफत औषधही देतात तिथं. तुम्ही तुमचं भागवू शकाल तेवढी जबाबदारी कमी झाली तर. " त्यावर कधी नव्हे ती राधाबाई रागावली. थोडावेळ काहीच बोलली नाही. नंतर आवेशानं बोलू लागली,

" त्याचीच वाट पाहत आहेत सारे. त्याचा हो काय त्रास आहे कुणाला. तो काही कोणाच्या वाटेला जात नाही. स्वस्थ पडून राहतो. बिचारा दिवसभर! तुम्हांला माहीत आहे कसं वागवितात त्या दवाखान्यात. मारतात, उपाशी ठेवतात.

भेटू देत नाहीत. एकदा कोंडलं की संपलं ! इथं माझ्या डोळ्यांसमोर राहील. तेवढंच सुख! खाईल कोरडी भाकर माझ्याबरोबर. जशी दोन लहान तसा हा एक! देवाला काळजी असेल तर देईल आमच्यापुरतं "

निर्धारानं राधाबाई बोलत होती. मला मात्र मुळीच पटत नव्हतं ते. आईलाही पटलं आही. बोलल्यावाचून तिला राहवेना. ती म्हणाली, " अग, पण तू एकटी कमावणार! तू ही अशी झालीस. तूच उद्या खाटेवर पडलीस तर कोण पाहणार तुमचं ?"

" तुला काय वाटलं मी विचार करीत नाही. सुनेवर पडू देणार नाही माझा भार मी. तिला काडीमोड देणार आहे. तिची जिंदगी काय म्हणून बरबाद करू. हातापायांत बळ आहे तोवर मुलाला नि नातवांना खाऊ घालीन, पुढचं पुढं. "

बोलण्याच्या आवेशासरशी राधाबाई ताडकन उठून उभी राहिली व पाटी उचलून बाहेर पडलीदेखील. आम्ही अवाक् झालो. कुठून हा विषय काढला असं झालं आम्हांला. ती गेलेल्या दिशेने बराच वेळ मी पाहत राहिलो. हा कर्मयोगाचा भार घेऊन ही कुठवर फिरणार, याचा विचार करू लागलो. तिला मात्र याबद्दल मुळीच फिकीर नव्हती. जबर आत्मविश्वासाच्या बळावर संसारातल्या आपत्तींना धीमेपणानं तोंड देत होती. संसाराच्या जाळ्यात ती इच्छा नसतानाही अडकली होती. या जगातल्या नित्य नव्यानं घडणाऱ्या घटनांकडे पाहायला तिला फुरसत नव्हती, इतकंच नव्हे तर स्वत:बद्दल विचार करायलाही तिला सवड नव्हती. तिचं जीवन मुलासाठी, नातवंडांसाठी समर्पित झालं होतं. त्यांच्यांत ती एकरूप झाली होती! त्यानंतर राधाबाई भेटली नाही. कारण, तिथून माझी बदली झाली. परंतु अजूनही कधी आठवण झाली की वाटतं बडनेरला जाऊन भेटून यावं. पण हे राहतं मनातल्या मनातच. प्रत्यक्षात एका भाजीवालीच्या भेटीसाठी आवर्जून जाणं म्हणजे...

● ● ●


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ५१९ नारायण, पुणे २.

# श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## निवडक निरूपणे



## १ : नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग

नामस्मरण हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग होय. देहबुद्धी आहे तोपर्यंत नित्यनैमित्तिक कर्मे केलीच पाहिजेत. ती सोडायची नसतात. योगात योग करीपर्यन्तच समाधान असते. निर्गुण उपासना, स्वतः निर्गुण झाल्याशिवाय होत नाही. तेज दिसणे, नाव ऐकणे, या सर्व गोष्टी गुणातच नाही का आल्या ? निर्गुण होण्यास देहबुद्धी सुटावयास पाहिजे. सर्वव्यापी परमेश्वरास सर्वांभूती पाहणे, ही निर्गुण उपासनाच होय. नामस्मरणाला योग जितका पोषक आहे तितका करावा. त्यालाच प्राधान्य देऊ नये. योग नामस्मरणाला पोषक आहे. नामस्मरण योगाच्या पलीकडे आहे. म्हणून नामस्मरणात योग येतो. योगात नामस्मरण येत नाही. सर्व साधनांचा अंत नामस्मरणात आहे. नामाचे साधन हे फास्ट गाडीप्रमाणे आहे. मधली स्टेशने- उदा. रंग दिसणे, प्रकाश दिसणे, आवाज ऐकू येणे ही सोडून नाम एकदम भगवंतापर्यंत नेऊन पोचवते. इतर साधनांनी लवकर साधल्यासारखे वाटेल पण ते तात्पुरते असते. नामाने थोडा उशीर लागेल पण साधेल, ते कायमचे साधेल. कारण नामाने मुळापासून सुधारणा होते. तुकारामबुवांची वाचा त्यांना अनावर झाली. ती सारखी नाम घेऊ लागली. याचा अर्थ असा की, त्यांच्या कल्पनेच्या बाहेर नाम येऊ लागले. आपल्या शक्तीच्या बाहेर कार्य होणे, ही भगवंताची कृपा होय. गाडी उतरंडीला लागली, की जशी अती वेगात येते व आवरत नाही तसे हे आहे. नामात एका आनंदाशिवाय दुसरे काही नाही. नामाच्या आनंदाचा झटका आला की, मनुष्य स्वतःला विसरेल व जगालासुद्धा विसरेल. काही काळ तो त्या अवस्थेत राहील. त्यातून थोडा खाली आला तर त्याची दृष्टी निराळी दिसेल. पण नाम पचले की मग तो साध्या माणसासारखाच दिसेल. चार माणसे होती. त्या सर्वांना

एकच रोग झाला होता. पण त्यांची सांपत्तिक स्थिती सारखी नव्हती. वैद्याने त्यापैकी अगदी गरीब माणसाला एका औषध तुळशीच्या रसात घ्यावयास सांगितले. त्याच्यापेक्षा पैसेवाल्याला तेच औषध मधात घ्यावयास सांगितले. त्याच्यापेक्षा पैसेवाल्याला तेच औषध केशरामध्ये घ्यायला सांगितले व जो सर्वांत श्रीमंत होता त्याला तेच औषध कस्तुरीमध्ये घ्यायला सांगितले. त्याचप्रमाणे ज्याचा जसा अधिकार तसे त्याने नाम घ्यावे. नाम नुसते तोंडाने घ्यावे, नाम श्रद्धेने घ्यावे, नाम शक्ती सांभाळून घ्यावे, नामाशिवाय दुसरे सत्य नाही, अशा दृढ भावनेने घ्यावे.

सर्वांना फळ सारखेच मिळेल.

## २ : नाम हाच भगवंताचा अवतार

नाम हा भगवंताचा अवतार आहे. सुष्टांचे रक्षण व दुष्टांचा नाश करण्याकरिता मी अवतार घेतो, असे भगवंतांनी गीतेत सांगितले आहे. त्यावरून असे ठरते की, सुष्ट व दुष्ट या दोघांचे अस्तित्व असून त्यांत दुष्टांकडून सुष्टांना त्रास होण्यातच भगवंताच्या अवताराची उत्पत्ती आहे. आजकाल पाहू गेले तर असे दिसते की, सुष्टांचे अस्तित्वच जवळ जवळ दुर्मिळ झाले आहे, म्हणजे ज्यांचा छळ झाला असता भगवंताने अवतार घ्यावा, ते सुष्टच नामशेष झाल्याकारणाने अवतार तरी कसा व्हावा ? याचा अर्थ अवतार होणारच नाही, असे नाही. पण वस्तुस्थिती काय आहे ते यावरून आपल्याला समजेल. आजची परिस्थिती व मागची परिस्थिती यात फार फरक आहे. पूर्वी सद्वासना जिवंत होती पण ती उघडपणे कृतीत आणणे कठीण होते. आता सद्वासनाच नाहीशी झाली आहे. म्हणजे पायाच ढासळला आहे. तेथे कृतीचा प्रश्नच उद्भवत नाही. पूर्वी सद्वासना (सूक्ष्मपणे) जिवंत होती पण कृती (स्थूलपणे) दुर्घट झाली होती. त्या वेळी भगवंताला स्थूलात येऊन कार्य करणे जरूर होते व अशा वेळी अवतार घेऊन (म्हणजे रूप धारण करून) भगवंताने कार्य केलेही. आजचा प्रश्न दुर्वासना जाऊन सद्वासना कशी उत्पन्न होईल, हा आहे. म्हणजेच कार्य सूक्ष्मातले आहे. म्हणून जसा रोग तसे औषध किंवा काट्याने काटा काढावा या न्यायाने, उपाययोजना सूक्ष्मातीलच असली पाहिजे. वासना बदलण्याला वासनेइतकाच जबरदस्त इलाज पाहिजे व तो म्हणजे भगवंताचे नाम. म्हणून चालू परिस्थितीशी झगडून मार्ग काढून देणारा असा जर कोणता अवतार असेल तर तो भगवंताच्या नामाचाच आहे व त्याकरिता सर्वांनी भगवंताच्या नामाचा टाहो फोडणेच जरूर आहे. हे कार्य भगवंताने सगुणरूप धारण करून होणे कठीण आहे. कारण सूक्ष्मातले आहे व त्याला इलाजही सूक्ष्मातीलच पाहिजे. म्हणूनच नामावताराची आज गरज आहे. प्रत्येक नामागणिक त्याचा अवतार आहे व त्याची कास धरणे म्हणजेच नाम घेणे हे आमचे आजचे मुख्य कर्तव्य आहे. तेवढे केले की, नाम आपले अवतारकार्य करून दाखवील. ●

# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखांक पाचवा

**अरुण साधू**




क्रांती...क्रांती...क्रांती...असा एकच आक्रोश करणाऱ्या चीनमधील जहाल क्रांतिवादी तरुणांना आता क्रांतीचा ढोबळ आणि खात्रीचा मार्ग स्पष्ट दिसू लागला होता. आतापर्यंत ते अंधारात धडपडत होते, अडखळत होते. पण आपल्याला हवे ते साध्य करण्याचा नेमका मार्ग त्यांना सापडत नव्हता. १९११ च्या उठावाने जे साधले नाही, १९१९ च्या ' चार मे 'च्या चळवळीत जे मिळाले नाही, ते त्यांना साध्य करायचे होते. साऱ्या समाजात त्यांना अमूलाग्र बदल हवा होता. त्यासाठी समाजाला तळापासून ढवळणारी क्रांतीच आवश्यक होती. केवळ सत्तांतराने ते साध्य झाले नसते. त्यासाठी नेहमीपेक्षा अगदी वेगळा असा मार्ग हवा होता.

कम्युनिस्ट विचारप्रणालीत त्यांना असा खात्रीचा मार्ग दिसू लागला होता आणि मोठ्या श्रद्धेने ते मार्क्सवादाकडे आकृष्ट होऊ लागले होते.

पेकिंग विद्यापीठातील एक प्रोफेसर व विद्यार्थ्यांचे आवडते नेते चेन तु ह्सियू व विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल ली ता चाओ यांनाही चीनमध्ये आमूलाग्र क्रांती घडवून आणण्यासाठी कम्युनिस्टांसारखीच शिस्तबद्ध व खात्रीची विचारप्रणाली असणे आवश्यक आहे, हे पटू लागले होते. त्याबाबत ते चीनमध्ये दूरवर विखुरलेल्या आपल्या विद्यार्थ्यांशी पत्रांद्वारे चर्चा करीत होते व त्यांची मते अजमावून पाहत होते.

प्रो. चेन आणि ली यांची जिद्द विलक्षण होती. क्रांतीवरील निष्ठाही अनन्यसाधारण होती. त्या दोघांनीही विद्यापीठातील आपापल्या नोकऱ्यांचे राजीनामे दिले आणि पेकिंग सोडून एक वर्षभर त्यांनी शांघायमध्येच बस्तान मांडले.



## ऐतिहासिक सभा

मे १९२१ च्या शेवटच्या आठवड्यातील शांघायमधील ती संध्याकाळ होती. शांघायमधल्या एका जुनाट इमारतीत चीनमधून दूरदूरच्या ठिकाणांहून येणाऱ्या व्यक्ती गेल्या दोन दिवसांपासून उतरत होत्या. त्या दिवशीच्या संध्याकाळी त्या इमारतीत एक सभा भरली. चीनमधील प्रत्येक प्रांतातून आलेले प्रतिनिधी त्या सभेला हजर होते.

चिनी कम्युनिस्ट पक्षाची ती ऐतिहासिक स्थापना होती. माओ त्या सभेला हजर होता.

चांगशामध्ये माओला त्या सभेचे निमंत्रण आले, तेव्हा त्याला विशेष आश्चर्य वाटले नाही. कारण, ते निमंत्रण प्रो. चेन आणि ली यांनी पाठविले होते. माओचा त्या दोघांशीही घनिष्ट संबंध होता. अधूनमधून माओच्या पेकिंगला वाऱ्या होत. तेव्हा या दोघांशी झालेल्या चर्चांवरून अशी सभा बोलावली जाणार असल्याची कल्पना होतीच.

प्रो. चेन आणि ली यांनी माओप्रमाणेच आपल्या ठिकठिकाणच्या विद्यार्थ्यांनाही निमंत्रणे धाडली होती. निमंत्रण मिळताच माओ ताबडतोब शांघायला रवाना झाला व त्याने त्या दोघांना सभा आयोजित करण्यास बरीच मदत केली.

ही ऐतिहासिक सभा नक्की कोणत्या तारखेस भरली होती हे कोणालाच आठवत नाही. सभेचे रेकॉर्ड नष्ट झाले असल्याने सभेला किती आणि कोण प्रतिनिधी हजर होते याचाही निश्चित आकडा नाही. पण एवढे मात्र निश्चित, की जेवढे हजर

होते, त्यांपैकी फारच थोडे लोक १९४९ चा कम्युनिस्टांचा विजय पाहण्यास वाचले. ली ता चाओसारखे अनेकजण ठार झाले, चेन तु हसियूची पक्षातून हकालपट्टी झाली. काही कोमिन्टांग पक्षाला जाऊन मिळाले आणि फारच थोडे कम्युनिस्ट म्हणून जिवंत राहिले.

चेन आणि ली सोडले तर या सभेला हजर असणारे सारे प्रतिनिधी तिशीच्या खालचे तरुण होते आणि त्यांच्यापैकी बहुतेकांनी पेकिंगला शिक्षण घेतलेले होते.

या पहिल्या अधिवेशनात चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या प्रांतीय शाखा स्थापन करण्यात आल्या. अनेक ठरावही संमत झाले. पुढील राजकीय कार्यक्रमाचा आराखडा ठरविण्यात आला.

आणखी एक अत्यंत महत्त्वाचा ठराव याच पहिल्या अधिवेशनात झाला. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटनेत (कॉमिन्टर्न, सामील होण्यास चिनी पक्षाने या ठरावान्वये नकार दिला. या नकारामागचे कारण कोणतेही असले तरी भविष्यात चिनी कम्युनिस्ट पक्षाची घडण कोणत्या दिशेने होणार, याची सूचनाच या नकारामागे होती असे म्हणावयास हरकत नाही.

## परदेशांतील हालचाली

चिनी कम्युनिस्ट पक्षाचे हे शांघायमधील पहिले अधिवेशन चालू असतानाच हजारो मैल दूर परदेशांत शिकणारे काही चिनी विद्यार्थी पॅरिस, बर्लिन, टोकिओ, मॉस्को आदी ठिकाणी असाच विचार करीत होते. याच सुमारास चाऊ एन् लाय, ली ली सान आणि ली मान यांनी फ्रान्समध्ये एक चिनी कम्युनिस्ट पक्ष स्थापन केला होता. जर्मनीमध्ये चुह तेहने गुप्तपणे अशीच एक संघटना स्थापन केली होती. या ठिकठिकाणच्या विद्यार्थी गटांना एकमेकांची माहिती नव्हती आणि परस्परांच्या संपर्काशिवायच ते साम्यवादी विचारसरणीकडे आकृष्ट होऊ लागले होते.

शांघाय येथील अधिवेशन संपताच माओ हुनानमध्ये परत आला आणि हुनान प्रांतीय कम्युनिस्ट पक्षाची शाखा संघटित करण्यास त्याने सुरुवात केली. ऑक्टोबर १९२१ पर्यंत त्याने चिनी कम्युनिस्ट पक्षाची पहिलीवहिली शाखा हुनानमध्ये स्थापनही केली होती. १९२२ च्या मेमध्ये त्याने हुनान प्रांतीय कम्युनिस्ट पक्षाला अहवाल पाठवला. त्यात हुनानमध्ये कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी खाण कामगार, रेल्वे कामगार, नागरी कामगार आणि विद्यार्थी यांच्या एकूण बावीस संघटना स्थापन केल्याचा उल्लेख होता

हे काम जेवढे कठीण होते तेवढेच धोक्याचे होते. हुनानमधील सरदारी राजवट अत्यंत कडक होती. क्रांतिकारी चळवळी दडपून टाकण्यासाठी ती वाटेल ते उपाय योजीत होती. त्यामुळे माओ आणि त्याच्या सहकाऱ्यांना अतिशय सावधगिरीने लपत छपत कामे करावी लागत. पोलिसांचा ससेमिरा चुकवावा लागे. तरीही चांगशाच्या पोलिसांनी माओच्या दोन सहकाऱ्यांना पकडून ठार केलेच.

शांघायहून सुरू झालेली ही कम्युनिस्ट चळवळ हळूहळू चीनमध्ये पसरत होती खरी, पण चीनमधील क्रांतिचळवळीची खरी सूत्रे हालत होती ती कॅन्टॉनमधून. डॉ. सन् यत सेनचे कॅन्टॉनमधील कोमिन्टांग सरकार चिनी स्वातंत्र्य चळवळीचे केन्द्र होते. डॉ. सन् यत सेनची खरी सत्ता कॅन्टॉनच्या आसपासच चालत असे. बाकी साऱ्या देशभर ठिकठिकाणी मनाला वाटेल तसा कारभार सरंजामी सरदार हाकीत होते. पण साऱ्या चीनमधील बहुतेक क्रांतिवादी कोमिन्टांगकडेच आशेने पाहत होते. आणि डॉ. सन् यत सेननेही आपल्या प्रयत्नात खंड पडू दिला नव्हता. १९२२ च्या सुरुवातीला त्याने पुन्हा एकदा उत्तरेची मोहीम हाती घेतली. क्रांतिकारक सैन्य संघटित केले आणि उत्तरेच्या दिशेने चाल करून जाण्यास सुरूवात केली.

परंतु दुर्दैव डॉ. सन्च्या पाचवीलाच पुजले होते. दक्षिण चीनमध्ये पिवळचा समुद्राच्या किनारी असलेल्या क्वांगटुंग प्रांतात कॅन्टॉन शहर आहे. आणि क्वांग-टुंग प्रांताच्या वायव्येलाच हुनान प्रांताची सरहद्द आहे. पण डॉ. सन्ची सेना हुना-नच्या सरहद्दीपर्यंतदेखील पोचू शकली नाही. त्याच्या सैन्यातच बंडखोरांनी उठाव केले आणि शेवटी त्याला मोहीम सोडून द्यावी लागली.

### रशियाचा चंचुप्रवेश

डॉ. सन् यत. सेनच्या चीनच्या एकीकरणाच्या मोहिमा अशा एकामागून एक अयशस्वी होत होत्या. पाश्चात्त्य राष्ट्रे सरंजामी सरदारांच्या पाठीशी होती. त्यांना ज्या आर्थिक आणि व्यापारी सवलती चीनमध्ये मिळत होत्या, चीनची जी सहज-पणे त्यांना पिळवणूक करता येत होती, ती तशीच डॉ. सन्च्या हाती सत्ता आल्या-नंतर चालू शकणार नाही, हे त्यांना पक्के ठाऊक होते. म्हणूनच डॉ. सन्‌ला ते एक वेडा क्रांतिकारक ठरवीत होते. डॉ. सन्च्या कार्याला साऱ्या जनतेचा पाठिंबा आहे आणि एकटा डॉ. सन् आणि त्याचा पक्षच चीनला जागे करायला समर्थ आहे, हे फक्त लेनीननेच ओळखले होते.

त्यामुळे चिनी क्रांतिवाद्यांची मने जिंकण्यासाठी पहिले महायुद्ध संपून कम्युनिस्ट पक्षाची रशियात व्यवस्थित घडी बसताच सोव्हिएट रशियाने एक अत्यंत नाट्यमय घोषणा केली. झारच्या रशियन राजवटीने ज्या ज्या अन्यायी सवलती चीनमध्ये मिळविल्या होत्या आणि जे जे भूप्रदेश बळकावले होते, त्या सर्वांवर नवे सोव्हिएट सरकार पाणी सोडणार असल्याची ती घोषणा होती. पहिल्या महायुद्धानंतर पाश्चात्त्य राष्ट्रांनी आपल्या बुभुक्षित नजरा पुन्हा चीनकडे वळविल्या होत्या आणि आपल्या जुन्या सवलती टिकवून ठेवून आणखी कोणते नवे लचके तोडता येतील याचा त्यांचा विचार चालू होता. या पार्श्वभूमीवर रशियन सरकारची ही घोषणा खरोखरच नाट्यमय आणि चिनी जनतेला दिलासा देणारी होती.

या घोषणेच्या पाठोपाठ एक रशियन प्रतिनिधी डॉ. सन्‌ला भेटण्यासाठी चीन-मध्ये आला. त्याचे नाव होते मेरिंग. चिनी क्रांतिसाठी कोमिन्टांग व कम्युनिस्ट

पक्ष यांनी एकत्र यावे, अशी एक सूचना त्याने आपल्याबरोबर मॉस्कोहून आणली होती. त्याच सुमारास चिनी कम्युनिस्ट पक्षानेही आपल्या दुसऱ्या वार्षिक अधिवेशनात कोमिन्टांग पक्षाशी संपूर्ण सहकार्य करण्याचा ठराव केला होता. त्यामुळे डॉ. सन्‌ने मॉस्कोची सूचना मोठ्या खुशीने पत्करली आणि कम्युनिस्ट–कोमिन्टांग या दोन क्रांतिवादी पक्षांची एकी घडवून आणून क्रांतीचा मार्ग अधिक सुलभ करण्याचे ठरवले. सोव्हिएट रशियाच्या सल्लागारांच्या मदतीने त्याने आपला नवा पक्ष पुनर्संघटित करण्याचे ठरवले.

सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाने डॉ. सन्‌च्या मदतीसाठी सोव्हिएट कोमिन्टानचा आणखी एक प्रतिनिधी पाठवला. हा प्रतिनिधी अत्यंत धाडसी आणि चतुर होता. मुरब्बी राजकारण्याला लागणारे सारे गुण त्याच्यापाशी होते. सोव्हिएट कोमिन्टार्नने त्याच्यावर वेळोवेळी अनेक महत्त्वाच्या आणि धोक्याच्या कामगिऱ्या सोपविल्या होत्या. अमेरिका, ग्रेट ब्रिटन, मेक्सिको आणि इतर अनेक देशांत त्याने पक्षाच्या मोठमोठ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या होत्या आणि आता चीनला येताना चिनी परिस्थितीचा तो सखोल अभ्यास करून आला होता. त्याचे नाव होते मायकेल बोरोदीन.

ऑक्टोबर १९२३ मध्ये मायकेल बोरोदीन कॅन्टॉनमध्ये आल्यावर लवकरच डॉ. सन्‌च्या ध्यानात आले की, आपला नवा सल्लागार क्रांतिकार्याच्या व्यावहारिक ज्ञानाचा चालता बोलता ज्ञानकोश आहे. तो चीनमध्ये आला होता, तो आपल्या साऱ्या योजना आधी पक्क्या करूनच. आल्याबरोबर एका आठवड्याच्या आत त्याने सादर केलेल्या कोमिन्टांग पक्षाची पुनर्घटना करण्याच्या त्याच्या योजनेला पक्षाच्या नेत्यांनी मान्यता दिली. या योजनेनुसार पक्षाची सारी सत्ता अध्यक्षाच्या म्हणजे डॉ. सन् यत सेनच्या हाती केन्द्रित होणार होती. सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाच्या धर्तीवर पक्ष अत्यंत शिस्तबद्ध होणार होता.

एकदा पक्ष संघटना पूर्ण झाल्यावर बोरोदीन आणि त्याच्या सहकाऱ्यांनी कोमिन्टांगची शासनव्यवस्था आणि सैन्य सुसंघटित करण्यास सुरुवात केली. बोरोदीन आणि सोव्हिएट जनरल गॅलेन यांनी क्रांति-सैन्याचे अधिकारी तयार करण्यासाठी व्हाम्पोआ येथील सुप्रसिद्ध मिलिटरी अॅकॅडमी स्थापन केली. या अॅकेडमीत कम्युनिस्ट आणि कोमिन्टांग यांचा सारखाच भाग होता. कम्युनिस्ट-कोमिन्टांग सहकार्याच्या चांगल्या दिवसांपैकी ते दिवस होते.

### चँग–कै–शेकचा उदय

क्रांतिकारकांच्या या नव्या मिलिटरी अॅकॅडमीचा पहिला कमांडर म्हणून चँग–कै–शेक या एका तरुण लष्करी अधिकाऱ्याला नेमण्यात आले.

चीनमध्ये जिचा उदोउदो झाला आहे व तेवढ्याच प्रमाणावर जिचा आत्यंतिक द्वेष करण्यात आला आहे अशी चिनी इतिहासातील व्यक्ती म्हणजे चँग–कै–शेक.

व्हाम्पोआ मिलिटरी अॅकॅडमीचा हा तरुण, देखणा कमांडर अतिशय कडक शिस्तीचा तेवढाच महत्त्वाकांक्षी आणि कट्टर कम्युनिस्ट विरोधी होता. डॉ. सन् यत सेनच्या मृत्यूनंतर कोमिन्टांगची सारी सत्ता आपल्या हाती केंद्रित करून कम्युनिस्टांना चीनमधून नेस्तनाबूद करण्याचा त्याने सारे सामर्थ्य पणास लावून आटोकाट प्रयत्न केला. पण पुढे कम्युनिस्टांपुढेच हार खाऊन चीनची भूमी सोडून त्याला पळ काढावा लागला.

आजही तो फॉर्मोसामधील कोमिन्टांग सरकारच्या चिनी प्रजासत्ताकाच्या अध्यक्ष-पदी आहे. व कम्युनिस्ट चीन जिंकून घेण्याच्या घोषणा तो अजूनही करतो आहे, पराभूत होऊन चिनी रंगमंचावरून जरी तो बाजूला फेकला गेला असला तरी आधुनिक चिनी इतिहासावर त्याने आणि त्याच्या कोमिन्टांग सरकारने निश्चितच प्रभाव पाडला आहे.

चेकियांग प्रांतात शेती व व्यापार करणाऱ्या एका सुखवस्तू कुटुंबात ३१ ऑक्टोबर १८८७ रोजी चँगचा जन्म झाला. सुरुवातीपासूनच त्याला लष्करी पेशाची आवड होती. त्यामुळे वयात येताच १९०६ साली त्यानें उत्तर चीनमधील पाओतिंग येथील लष्करी शाळेत नाव दाखल केले. तेथे एक वर्ष शिक्षण घेतल्यावर त्याने जपानमधील एका लष्करी शाळेचा शिक्षणक्रम पूर्ण केला.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर चँग-कै-शेकने जपानी सैन्यातच नोकरी पत्करली. जपानमध्ये तेव्हा लष्करी मनोवृत्तीचे जोरदार वारे वाहत होते. त्या वातावरणातच चँग वाढला.

चँग कदाचित जपानी सैन्यातच शेवटपर्यंत राहिला असता. परंतु १९११ साली डॉ. सन् यत सेन जीव वाचविण्यासाठी पुन्हा एकदा जपानला पळून आला होता. त्याची चँगशी गाठ पडली. चँगचे व्यक्तिमत्त्व, त्याचा महत्त्वाकांक्षी स्वभाव डॉ. सन्च्या मनात भरला. असा समर्थ तरुण वाया जाता कामा नये. चिनी क्रांतीमध्ये त्याचा चांगला उपयोग होईल या हेतूने डॉ. सन्नेच त्याला आपल्या बाजूने क्रांति-कार्यात ओढले.

डॉ. सन्बरोबर चँग १९१२ साली चीनमध्ये परतला. कोमिन्टांग पक्षात त्याने प्रवेश मिळविला आणि १९१३ साली डॉ. सन्ने जनरल युआनविरुद्ध उभारलेल्या 'चलो पेकिंग'च्या लष्करी मोहिमेत सक्रीय भाग घेतला. परंतु सन्चा याही वेळेस पराभव झाल्याने चँगला जपानमध्ये पळून जावे लागले.

त्यानंतरची पाच वर्षे चँग-कै-शेकने अत्यंत रहस्यमय जीवनात घालविली. १९१३ ते १५ पर्यंत तो जपानमध्येच कोठेतरी होता. त्यानंतर एकदम तो शांघाय या शहरी उगवला.

आता शांघाय हे चीनमधील एकेकाळचे अत्यंत कुप्रसिद्ध शहर म्हणून गाजलेले आहे. चीनच्या पॅसिफिक किनाऱ्यावर मध्यभागी यांगत्से नदीच्या मुखाशी वसलेले

हे अवाढव्य शहर प्राचीन काळापासून परदेशी व्यापाऱ्यांचे केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. देशोदेशींचे व्यापारी, खलाशी येथे मुक्काम ठोकून असत. त्यामुळे वेश्याव्यवसायाचा, जुगारी क्लबांचा, भिकाऱ्यांचा, घोड्यांच्या, कुत्र्यांच्या शर्यतीचा आणि लहानमोठ्या कुमार्गी टोळ्यांचा शांघाय मोठा अड्डाच झाला होता.

१९१५ मध्ये चँग–कै–शैक शांघायमध्ये आला, तेव्हा हिरवी टोळी नावाची एक गुप्त संघटना शहरात गाजत होती. वेगवेगळ्या अवैध मार्गांनी ही टोळी अमाप संपत्ती जमा करीत होती. या संघटनेशी चँगचा त्या काळात अत्यंत घनिष्ट संबंध होता. याच काळात त्याने भरमसाट संपत्तीही जमा केली.

१९१८ मध्ये चँगचे पुन्हा हृदयपरिवर्तन झाले आणि त्याने राजकारणात प्रवेश केला. डॉ. सन् यत सेन त्या वेळी आपले क्रांतिकारी सैन्य नव्याने संघटित करीत होता. त्यामध्ये त्याला मेजर जनरलची जागा मिळाली. लवकरच तो डॉ. सन्च्या अत्यंत विश्वासू सहकाऱ्यांपैकी गणला जाऊ लागला. १९२३ साली डॉ. सन्ने रशियातील कम्युनिस्टांच्या पक्ष संघटनेचा व सैन्य संघटनेचा अभ्यास करण्यासाठी कॉमिन्टांग पक्षातर्फे चँगलाच रशियात पाठवले होते व त्याच्या या रशियन दौऱ्या-नंतरच त्याला व्हाम्पोआ अॅकॅडमीचा कमांडर केले होते.

पुढे कम्युनिस्टांशी भांडण करून चँगने कम्युनिस्ट क्रांती थोपवून धरण्याचा निष्फळ प्रयत्न केला. क्रांती थोपवून धरण्याचा त्याने कितीही लष्करी प्रयत्न केला तरी उलट त्याच्या भ्रष्टाचारी आणि जुलुमी शासनाने कम्युनिस्टांचा मार्ग अधिकच सुकर करून ठेवला.


चँग–कै–शेक एक कडक हुकूमशहा होता. तसाच मुरब्बी राजकारणीही होता, क्रांतिकारकही होता व परंपराप्रियही होता; ख्रिश्चन धर्माचा तो अनुयायी होता पण कॉन्फ्यूशस तत्त्वज्ञानावरही त्याची श्रद्धा होती. तो कट्टर कम्युनिस्ट-विरोधी असला तरी लेनीनच्या विचारांची त्याच्यावर मोठीच छाप होती. थोडक्यात म्हणजे आधुनिक चिनी इतिहासातील परस्परविरोधी प्रवाह आणि गोंधळ यांचे चँग–कै–शेक हा पुरेपूर प्रतीक होता.


चँग–कै–शेकच्या रोमरोमांत कम्युनिस्ट द्वेष भरलेला आहे. वयाची सत्तर वर्षे पूर्ण झाल्यावर त्याने आपल्या राजकीय जीवनाचा आढावा घेणारे एक पुस्तक लिहिले. त्या पुस्तकाचे नावच होते. "चीनमध्ये सोव्हिएट रशिया" ( सोव्हिएट रशिया इन चायना ).

केवळ कोमिन्टांगला फसविणे आणि चीनला रशियाच्या घशात लोटणे याच उद्दिष्टाने कम्युनिस्ट कसे सतत प्रयत्न करीत होते हे त्याने या पुस्तकात विस्ताराने वर्णन केलेले आहे.

पुस्तकाची सुरुवातच तो अशी करतो : "चिनी कम्युनिस्ट पक्ष हा चिनी पक्ष नव्हेच. सोव्हिएट रशियाची आणि कम्युनिस्ट साम्राज्याची ती केवळ चीनमधील







नमोस्तु शारदेदेवी ।
काश्मीरपुरवासिनी ॥

देवी शारदेच्या विहाराने पुनित झालेली
ही आपली प्राचीनतम भूमी....
निसर्गसौंदर्याने नटलेली
परंतु त्याबरोबरच कालपुरुषाने शाप दिलेली....
केवळ इतिहासकालातच नव्हे, तर आजही
शापित, अवमानित, खंडित—



## शेर-ए-कश्मीर शेख महंमद अब्दुल्ला

कश्मिरी राजकारणाने निर्माण केलेले
गूढ कोंडे–पं. नेहरूंनाही न उकललेले


–लोकशाही आणि समाजवाद यांचा हा
तडफदार पुरस्कर्ता
फुटीर आणि जातीयवादी राजकारण खेळू लागला

**याला जबाबदार कोण ?**

आपल्या या जिवलग मित्राला
अखेर पंडितजींनी कारागृहाच्या
चार भिंतींआड ढकलले.

**का ? एवढे घडले तरी काय ?**





सादिक

स्वातंत्र्यप्राप्तीबरोबरच
आक्रमणाची शिकार झालेले कश्मीर
—त्याच्या फाळणीची पहिली योजना कोणी मांडली ?

**पं. नेहरूंनी की आणखी कोणी तरी ?**

बारामुल्लावर विजयपताका रोवणाऱ्या
आपल्या हिंमतबहाद्दर जवानांची
विजयी आगेकूच कोणी रोखली ?
पाकिस्तानने ? सुरक्षा समितीने ? की ?....

श्यामाप्रसाद मुकर्जींच्या रहस्यमय
मृत्यूला जबाबदार कोण ?

शेख गेले आणि बक्षी आले
बक्षींनाही जावे लागले
आणि आता आले आहेत
गुलाम महंमद सादिक

सादिक कोणती स्वप्ने पाहत आहेत ?

करणसिंगांच्या मनात तरी काय आहे ?





**कश्मीरवर निराळ्याच छाया पडू लागल्या आहेत..**

## कश्मीरवर निराळ्याच छाया पडू लागल्या आहेत..



या स्वप्नांचा आणि छायांचा मागोवा घेणारी
समग्र आणि साधार
जितकी प्रक्षोभक तितकीच रंजक दीर्घकथा–

# कश्मीर

## हिरवी स्वप्ने : लाल छाया

'माणूस' दिवाळी अंकात
वाचकांना सादर केली जात आहे.

आणि यासाठीच
'माणूस'चे विशेष प्रतिनिधी
या आठवड्यातच श्रीनगरकडे–दिल्लीकडे
खास मुलाखतींसाठी आणि चर्चेसाठी
रवाना होत आहेत.





आगंतुक वाढ आहे. कम्युनिस्ट तत्त्वज्ञान मानवी जीवनाला पोषक नाही, चिनी समाजाला तर नाहीच नाही. त्यामुळेच सोव्हिएट कम्युनिस्टांच्या या पित्याला सुरुवातीच्या काळात लपत छपत किंवा कोमिन्टांगच्या अंगावर एखाद्या बांडगुळाप्रमाणे दिवस काढावे लागले. त्याशिवाय त्याची वाढ होऊन चीनमध्ये वर्गकलह पेटवणे चिनी कम्युनिस्टांना शक्य नव्हते. चीनमध्ये चालू असलेल्या स्वातंत्र्ययुद्धात आपली पोळी भाजून सोव्हिएट रशियाच्या तालावर नाचणारे नेभळे सरकार चीनमध्ये निर्माण करणे व अशा रीतीने कम्युनिस्ट रशियाला आशियातील पहिला उपग्रह मिळवून देणे हाच केवळ त्यांचा उद्देश होता. "

## विचित्र सहकार्याचा काळ

जनरल चँग हा एवढा कट्टर कम्युनिस्ट विरोधी असला तरी सुरुवातीला त्यालासुद्धा कम्युनिस्टांशी पूर्ण सहकार्य करावे लागत होते. व्हाम्पोआ अ‍ॅकॅडमीचा तो कमांडर असतानाच पॅरिसहून शिक्षण घेऊन नुकताच परत आलेला चिनी कम्युनिस्ट चाऊ–एन्–लाय हा त्या अ‍ॅकॅडमीतील राजकीय शिक्षणाचा संचालक होता.

१९२२ ते १९२५ चा तो काळच असा विचित्र सहकार्याचा होता. डॉ. सन्च्या व्यक्तिमत्त्वामुळे व प्रभावामुळे ते सहकार्य टिकून राहत होते. डॉ. सन्ला त्या वेळेला चीनमध्ये कम्युनिझम नको होता; पण कम्युनिस्ट पक्षासारखा शिस्तबद्ध व सुसंघटित पक्ष आपल्या क्रांतिकार्यासाठी असणे जरूर आहे, असे त्याला वाटत होते. म्हणूनच कोमिन्टांग पक्ष पुनःसंघटित करीत असताना त्याने सोव्हिएट कॉमिन्टार्नच्या मदतीने कम्युनिस्ट पक्षाची रचना नजरेसमोर ठेवून पक्षाची बांधणी केली होती. त्याच्या मृत्यूनंतर पक्षाची केवळ हुकूमशाही बांधणी उरली. त्यामागचा डॉ. सन्चा उद्देश विसरला गेला आणि तोच पक्ष पुढे कट्टर कम्युनिस्टविरोधी झाला.

माओलाही आपल्या पक्षाबरोबर या विचित्र सहकार्यात भाग घ्यावा लागला होता. आणि या सहकार्यामध्ये तारेवरच्या कसरतीसारखे अत्यंत अवघड काम त्याच्याकडे होते.

१९२३ पर्यंत माओ हुनान लेबर सिंडिकेटचा सेक्रेटरी जनरल झाला होता व तोपर्यंत त्याने हुनानमधील कामगारांचा एक फार मोठा सार्वत्रिक संप अत्यंत यशस्वी रीतीने घडवून आणला होता. त्यामुळे कम्युनिस्ट पक्षातील त्याचे स्थान खूपच उच्च दर्जाचे झाले होते. पक्षाच्या तिसऱ्या अधिवेशनात त्याला कम्युनिस्ट मध्यवर्ती समितीवर नेमण्यात आले.

१९२४ मध्ये कोमिन्टांग व कम्युनिस्ट पक्षाच्या संयुक्त आघाडीचे पहिले राष्ट्रीय अधिवेशन कॅन्टॉन येथे झाले, त्याला माओ–त्से–तुंग हजर होता. तेथेच त्याची डॉ. सन् यत सेन व चँग-कै-शेक यांच्याशी पहिली ओळख झाली. कम्युनिस्टांचा एक तरी प्रतिनिधी संयुक्त कोमिन्टांगच्या मध्यवर्ती समितीवर असावा

असा आग्रह जेव्हा कम्युनिस्टांनी धरला, तेव्हा माओलाच त्या कमिटीवर निवडण्यात आले.

अशा रीतीने संयुक्त कोमिन्टांग व कम्युनिस्ट या दोन्ही पक्षांच्या मध्यवर्ती समित्यांवर जबाबदारीचे काम करण्याची माओवर पाळी आली. कोमिन्टांग सरकारचा एक जबाबदार मंत्री हू हान मिन याचा चिटणीस म्हणून काम करण्याची संधी माओला मिळाली. हू हान मिन हा त्या काळात कोमिन्टांगमध्ये अतिशय प्रभावी समजला जात होता. डॉ. सन्नंतर पक्षात त्याचेच मानाचे स्थान होते. माओ–त्से–तुंगवर त्याचा पूर्ण विश्वास होता.

या साऱ्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे सांभाळणे मोठे कठीण काम होते. तारेवरची ती अवघड कसरत होती. एक शिस्तबद्ध कम्युनिस्ट म्हणून त्याला आपल्या पक्षाच्या साऱ्या आज्ञा निमूटपणे पाळण्याचे बंधन होते. त्याचबरोबर कोमिन्टांग पक्षाच्या मध्यवर्ती समितीवरील एक जबाबदार सदस्य आणि सरकारी मंत्र्यांचा चिटणीस म्हणून कोमिन्टांगशीही त्याला प्रामाणिक निष्ठा ठेवावी लागत होती. कामाचा ताण प्रचंड होता. या गडबडीतच माओ आजारी पडला आणि प्रकृती सावरण्यासाठी म्हणून तो हुनानमधील आपल्या जन्मगावी शाओ–शान येथे परत गेला.

**विश्रांतीसाठी . . .**

परत जायला माओला आणखीही सबळ कारणे होती.

सोव्हिएट कॉमिन्टार्न व कोमिन्टांग म्हणजेच चिनी कम्युनिस्ट व कोमिन्टांग यांचा संयुक्त आघाडीच्या स्वरूपातील मधुचंद्र ऐन रंगात आला होता. सोव्हिएट कोमिन्टार्नचे प्रतिनिधी जो सल्ला देतील, त्यावर कोमिन्टांगचे धोरण ठरत असे. कोमिन्टांगची मुख्य कचेरी कॅन्टॉन येथे या कोमिन्टार्न प्रतिनिधींचा एक अड्डाच निर्माण झाला होता. चीनच्या प्रत्यक्ष परिस्थितीच्या तुटपुंज्या माहितीच्या आधारे ते परस्पर चर्चा करीत आणि आपापसात कोमिन्टांगची धोरणे ठरवीत. त्यांची आपापसांत भांडणेही होत.

माओला परकीय भाषा येत नसल्याने अगोदरच त्याला परकीयांविषयी थोडा तिरस्कारच वाटे. त्यामुळे कोमिन्टार्न प्रतिनिधींच्या हालचालींकडे तो प्रथमपासून संशयाने पाहत होता.

शिवाय कोमिन्टार्नचा चिनी कम्युनिस्टांमागे एकच लकडा होता. शहरी कामगारांना संघटित करा– कामगारांना संघटित करा– कोमिन्टांग पक्षामध्येच योग्य ते परिवर्तन घडवून आणून त्याच पक्षातर्फे चीनमध्ये क्रांती साधता येईल, असा कम्युनिस्ट पक्षाचा आणि कोमिन्टार्नचा विश्वास होता.

परंतु माओला मात्र या साऱ्याच प्रकारांबद्दल दाट शंका होती. अशातच कम्युनिस्टांच्या कोमिन्टांग नेत्यांच्या आणि कोमिन्टार्नच्याही आपापसांत

दुह्या माजू लागल्या होत्या. त्याच वेळी माओ विश्रान्तिसाठी म्हणून शाओ–शानला परत आला.

हा विश्रान्तीचा काळ माओला चांगलाच हिताचा आणि त्याच्या आयुष्यात व चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या इतिहासात अत्यंत क्रांतिकारी ठरला.

आपल्या विश्रांतीच्या काळात माओ–त्से–तुंग कम्युनिस्ट क्रांतिपद्धतीचा, कम्युनिस्ट-कोमिन्टांग ऐक्याचा खोलवर विचार करू लागला. अशा तऱ्हेने कोमिन्टांग पक्षातर्फेच शहरी जीवनातील कामगारांना हाताशी धरून चीनला पोषक अशी क्रांती घडू शकेल हे त्याच्या वस्तुनिष्ठ बुद्धीला काही केल्या पटेना. चीनची खरी सुप्त शक्ती शहरांमध्ये किंवा शहरी मजुरांमध्ये नसून ती खेड्यांमध्ये, खेडूत शेतकऱ्यांमध्ये आहे; चिनी क्रांतीचे बीज शांघाय, कॅन्टॉन, पेकिंगसारख्या शहरांत नसून ते शाओ -शानसारख्या लक्षावधी चिनी खेड्यांमध्ये आहे, असे शाओ–शानमध्ये विचार करता करता त्याला तीव्रतेने वाटू लागले.

आणि यानंतरच माओचा खरा झगडा सुरू झाला. याच मुद्यावर त्याचे आणि चेन तू हसियूचे मतभेद झाले. याच मुद्यावर त्याचा बोरोदीनशी आणि पर्यायाने स्टालीनशी विरोध सुरू झाला.

आणि याच गोष्टीमुळे चिनी कम्युनिस्ट पक्षाला पुढे एक स्वतंत्र व्यक्तिमत्व प्राप्त झाले आणि सोव्हिएट रशियापेक्षा कितीतरी निराळ्या पद्धतीने कम्युनिस्ट चीनचा इतिहास लिहिला गेला. [अपूर्ण]


"डायमंड"
टॅक्सी व रिक्षा मीटर्स
भारतात सर्वप्रथम
डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,
११८० बुधवार पेठ, पुणे २.
डायमंड वॉच कंपनी
११७९ बुधवार पेठ, पुणे २.
महाराष्ट्रातील ख्यातनाम घड्याळजी. सर्व प्रकारची
घड्याळे व इन्स्ट्रूमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.

## पुस्तके

# श्री. ना. पेंडश्यांचा ‘ जुम्मन ’

# सरिता पदकींचे ‘ बारा रामांचं देऊळ ’

ही दोन पुस्तकांची तुलना नाही. अशी तुलना मला आवडत नाही; किंबहुना खऱ्या अर्थाने अशी तुलना होऊच शकत नाही, असे माझे मत आहे. प्रत्येक कलाकृतीही स्वयंपूर्ण असते. स्वत:पुरती असते. तिचा आकार, डौल, तिचे व्यक्तिमत्त्व तिच्यापुरतेच असते. परंतु ‘मौज’ने प्रकाशित केलेले हे दोन्ही कथासंग्रह मी एकदमच वाचले. एकदमच त्यांची प्रतिक्रिया मनावर झाली. म्हणून हे एकत्र समालोचन.

‘ जुम्मन’मधल्या पेंडश्यांच्या कथा जुन्याच आहेत. ‘ जुम्मन ’ ही कथा तर १९५१ च्या ‘ सत्यकथे ’त प्रसिद्ध झालेली. ‘ धर्मशाळा ’ हीच त्यातल्या त्यात नवीन. तीही १९६४ ची. सरिता पदकींच्या साऱ्या कथा ५८ ते ६६ च्या अंतरातल्या आहेत. ( फक्त एक ५५ ची आहे. ) दोन्ही कथासंग्रहांच्या आकृती आणि प्रकृती समजावून घेताना ही गोष्ट विसरून चालणार नाही.

पेंडश्यांच्या लेखणीमागे तपस्या आहे. त्यांच्या लिखाणाला आत्मविश्वासाचा डौल आहे. ( ‘ हिरोकोसान ’ या कथेत हा डौल फारच मोहक वाटतो. ) त्यांची कथा ‘ फुलत ’ नाही. पेंडसे ती ‘ खुलवतात. ’ अगदी रसाळपणाने खुलवतात. ते ‘ जुम्मन ’-च्या खोडचा आणि गावाने त्याच्यावर टाकलेला जीव यांचे रंगदार वर्णन करतात; ‘ रामशरण ’सारख्या विक्षिप्त पण हळूहळू विस्तारत जाणाऱ्या व्यक्तिरेखेची जोपासना करतात; ‘ हिरोकोसान ’च्या विलक्षण व्यक्तिमत्त्वाभोवती काव्यात्म व्याकुळ वर्तुळे निर्माण करतात. त्यांचे ‘ ओडुलकाका ’ बोलू लागले म्हणजे जाणीवेच्या केवढ्यातरी विशाल समुद्रात अगदी खोलखोल नेतात. गुदमरून टाकतात.

पेंडश्यांची कथा ही खरोखरीची ‘ कथा ’ आहे, कथासूत्राला तिच्यात एकमेव नसले तरी महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या व्यक्तिजीवनाचे सारे प्रवास कथेच्या मार्गावरूनच होतात. ( ‘ धर्मशाळा ’सुद्धा अपवाद म्हणायला मन घेत नाही. ) बहुधा हा मार्ग वळणेवळणे घेत, पण सातत्याने वरवर जात राहतो. अनेक घटना, निरनिराळे प्रसंग यांची वळणे त्यांमध्ये सांधली जातात.

इथेच हेही कबूल करायला पाहिजे, की कित्येकदा ही वळणे वाचकांची दमछाक करू पाहतात. ‘ जुम्मन ’चीच गोष्ट घ्या. घरादाराला मारहाण करणारा निबर

स्वभावाचा 'जोत्या.' पटकीची साथ येऊन जोत्याच्या बायकापोरांचा त्यांमध्ये नाश, जोत्याच्या वाट्याला आलेले भकास एकाकी आयुष्य, त्याला वेड लागण्याची आलेली वेळ–कथा चाललीच आहे–जोत्याला जुम्मन भेटतो; त्याच्या एकाकी जीवनात कोवळा कवडसा पडतो; सारा गाव जुम्मनचे लाड करतो–आणखी एक वळण–जुम्मन वयात येतो आणि वाटेत येईल त्याला ठोकर देत देत सरळ काळ्या मेंढ्याकळपात जाऊन राहतो. जोत्याचे प्रेम, लाड, जिव्हाळा सारे भिरकावून देऊन पुन्हा जोत्याची वेडावलेली अवस्था, (अजून कथा संपलेली नाही) जुम्मन खाटकाकडे जाणे, लोकांनी वर्गणी काढून त्याला सोडवून आणणे,–यानंतर जे वळण येते ते तर वाचकाला भलतेच गरगर फिरवते–लोक जुम्मनला देवाचा अवतार समजतात. त्याची पूजा बांधतात. नवस करतात. त्याच्या बारीकसारीक हालचालींचे शुभ–अशुभ संकेत ठरवतात. जोत्याला सारे असह्य होते. गावकऱ्यांचे न ऐकता तो जुम्मनला घेऊन पळून जायचे ठरवितो. त्याच वेळी नेमकी टोळधाड येते. (दैवी कोप ?) गाव उद्ध्वस्त होते. त्यातून वर उठण्यासाठी गावकरी भयंकर नवस बोलतात. जुम्मनच्या बळीचा. जोत्याला त्यात अर्थ वाटत नाही. आणखी बरेच दिवस जातात. पुन्हा पाऊस पडतो. नवीन पीक भरून येते. नवस पुरा करायची वेळ येते. पुन्हा जोत्या जुम्मनसह पळू पाहतो. गावकरी त्याला पकडतात. जुम्मनच्या बळीने शेवटचा टप्पा पुरा होतो. एकदाचा वाचक थांबतो.

...हे कादंबरीचे कथानक नाही. 'कथे'चे आहे. परंतु मी येथे एकेका वाक्यात सांगितलेले प्रसंग पेंडश्यांनी खुलासेवार रंगविले आहेत. चांगले रंगविले आहेत. कोणताही एक प्रसंग घेतला तर त्याचे चित्र अगदी परिणामकारकतेने उभे राहते. भावना मनाला भिडतात हे खरे. (पण कथा वाचून होईपर्यंत दम लागतो हेही खरे. पेंडश्यांनी अनेक यशस्वी कादंबऱ्या लिहिल्या आहेत याची उगीचच आठवण होत राहते.)

जुम्मनची गोष्ट उदाहरणादाखल दिली. सगळ्या गोष्टी अशाच आहेत. 'रामशरणची गोष्ट' तर ५१ पानांचा प्रवास करते. त्यातून रामशरणची व्यक्तिरेखा सर्वांगाने विकासशीलतेने, परिणामकारकतेने अलिखित होते, हे खरे. पण एकंदरीत प्रवास फारच मोठा. 'हिरोकोसान'सारखी नाजूक कथा लिहितानाही पेंडश्यांना आटोपशीर होता येत नाही. मग 'डोह'सारख्या खोल आणि खळबळीने भरलेल्या कथेची कल्पनाच करावी.

'गणू आणि गणूची बायको' आणि 'धर्मशाळा' या कथा मात्र काहीशा वेगळ्या. जिवंत व्यक्तिरेखा, नाट्यमय प्रसंग आणि सुखावणारी निवेदनशैली ही पेंडश्यांची वैशिष्ट्ये त्यांतून दिसतातच; पण शिवाय या कथा आपले उद्दिष्ट अगदी योग्य प्रवासात गाठतात. अगदी वाचकांना नकळत. (या कथा त्यातल्या त्यात नंतरच्या काळातल्या आहेत, हेही वैशिष्ट्य).

या पार्श्वभूमीवर जेव्हा मी 'बारा रामांचं देऊळ' पाहिलं तेव्हा त्याचा आकार विशेषच कोरून उठला. १४९ पानांच्या या पुस्तकात अठरा कथा आहेत. अर्थात कथांच्या पानांची संख्या हे कथेचे कोणत्याही दृष्टीने मूल्यमापन नाही. त्या दृष्टीने त्याचा विचार केलेला नाही. पण अत्यंत थोडचा प्रवासात यातली एकएक कथा परिणामकारकतेचा कळस गाठण्याची जी कामगिरी करते ती फार फार विलोभनीय आहे. यात 'पाठवणी', 'अर्वा दिवस सुट्टी', 'असंबद्ध', 'पुनर्जन्म', 'सूड', 'बळी' यांसारख्या कथानकांद्वारे वाटचाल करणाऱ्या कथा आहेत, तर 'घटस्फोटाची गोष्ट', 'फुगे', 'दंश' यांसारख्या कथा म्हणजे मोजक्या प्रसंगांची मोहक गुंफण आहे. 'बारा रामांचं देऊळ', 'आटापिटा' यांसारख्या कथा तर केवळ स्वगत भाषण, संभाषण यांतूनच आकार घेतात.

या साऱ्या प्रकारच्या विविध कथांतून एक धागा सातत्याने दिसून येतो. तो धागा आहे, मानवी मनाच्या अनिवार आकर्षणाचा. कथानक असणाऱ्या आणि नसणाऱ्या,संवादांतून सांधलेल्या आणि विचारतरंगांतून उमललेल्या अशा सर्व कथांना मानवी मनाच्या गूढरम्य आकर्षणानें भुलविले आहे. कथांतून प्रसंग घडतात, पण त्या प्रसंगांपेक्षा त्यांच्यामुळे संवेदनाशील मनात उठणारे पडसाद अतिशय कोमलतेने पण सुस्पष्टपणे येथे टिपले आहेत. हे पडसाद कित्येक ठिकाणी इतके नाजुक आहेत, इतके हळुवार आहेत, की अत्यंत सहृदय अंतःकरणाने भावनेचे कान करून त्यांचा आस्वाद घेतला पाहिजे. इथे त्यांचे वर्णन करण्यानेही त्यांच्यांतील सौंदर्याला धक्का लागेल, अशी मला भीती वाटते. 'रात्र' ही छोटीशी कथा पाहा. मुलंबाळं करतीसवरती झालेल्या पोक्त जोडप्याचं हे रात्रीतलं संभाषण. बाई दिवसभराच्या श्रमानं थकली आहे. गळून गेली आहे. आपल्याकडं कुणाचं लक्ष नाही, आपली कुणाला जरूर नाही असं तिला वाटतं आहे. सारं आयुष्य असंच गेल्याची जाणीव होते आहे. कसल्या कसल्या कल्पना डोक्यात भणभणताहेत. तिचा आयुष्याचा जोडीदार तिची समजूत घालतो आहे. प्रेमळपणाने, आपुलकीनं दिलासा देतो आहे. साधा प्रसंग. पण त्याचं रेखाटन इतक्या हळुवारपणे, सहृदयतेनं केलं आहे की भावनांचे कितीतरी रंग भराभर खुलून येतात. त्यांचं लोभस चित्र तयार होतं.

सरिता पदकींनी कुठेही मानसशास्त्रज्ञाचा आव आणलेला नाही, की विरोधी गडद रंग वापरलेले नाहीत. साध्या प्रसन्न शैलीनं, पण सुजाण सहृदयतेनं त्यांनी मनातल्या घडामोडी शब्दांनी गोंजारल्या आहेत. 'कोंडी' या कथेतलं ते प्रणयी युगुल. "आता–गेल्या सबंध वर्षभरात–सारं बोलून, सांगून संपलं होतं. पर्यवेक्षिकेची परवानगी काढून–वेळी तिची नजर चुकवून–चांदण्या रात्री, भल्या पहाटे, भर दुपारी, साऱ्या वेळा साधून साऱ्या ठिकाणी भटकून झालं होतं. मनमुराद खाऊनपिऊन झालं होतं. आता उरलं होतं केवळ रोज संध्याकाळी फिरणं. परीक्षा झाल्यावर लग्न करायचं ठरलं होतं. सारे त्यांचा उल्लेख 'लव्ह–बर्ड' म्हणून करीत.

पण त्यांना हळूहळू कंटाळा येत होता. एखादा दिवस चुकला तर बरं असं वाटत होतं. जवळच्या मित्रमैत्रिणींची नाजुक गुपितं अचानक उघडी होतात आणि त्यांच्या चर्चा करण्यात, दुसऱ्याबद्दल बोलण्यात पुन्हा यांचे तासचे तास नकळत जाऊ लागतात." या साऱ्या घडामोडींतला मानसिक संघर्ष सरिता पदकींनी प्रसंगांच्या वर्णनातून इतका सुरेख उभा केला आहे, की वाचकाला नकळतच त्याचा साक्षात्कार होतो.

'ट्रिप', 'वाटचाल', 'दंश' अशा आणखी कितीतरी कथा सांगता येतील. ह्या सगळ्यांतून मानवी विविध रूपे मोहकपणे प्रगट होतात. खुजी, उदात्त, भाबडी, बेरकी, दुष्ट, सरळ अनेक प्रकारची मनाची अंग, सरिता पदकींच्या कथा विशाल जीवनाचा साक्षात्कार घडवीत नाहीत. पण मानस विश्वातल्या अंगोपांगांशी त्या इतक्या समरसतेने तद्रूप होतात, की त्यांचा आविष्कार अगदी जिवंत, वास्तव आणि तरीही कलापूर्ण बनतो. वास्तवाच्या हव्यासाने त्यातली कलात्मकता नाहीशी होत नाही. उलट खुलून येते.

या प्रत्येक कथेचा शेवट हा तिच्या कलात्मकतेचा सर्वोच्च बिंदू आहे. शेवटचं वाक्य अशा काही गतीनं येतं आणि चपखल बसतं, की तिथून कथेच्या पूर्वांगाकडे आपोआप तरंग उठत जातात. "हा वेळपर्यंत सुखी, समाधानी असलेला तिचा चेहरा व्यथेत न्हाऊ लागला. आणि माझ्या मनात आर्त कुठेतरी असलेला कृष्णसर्प ते कोवळं रक्त पिऊन सुखावू लागला, सुस्तावू लागला!" (दंश). "केर काढीत असले म्हणजे कचरा जाऊनही डोळ्यांत पाणी तरारू शकतं, ही किती उपकारक गोष्ट आहे हे तेव्हा मला कळलं!" (फुगे),–"अन त्या वाटेच्या दुसऱ्या तोंडाशी काळोख आहे. रक्ताळलेले डोळे फाडफाडूनही त्या पलीकडचं काही म्हणता काही बघता येत नाही. नुसतं आपलं फरशीला धरून पडून राहायचं!" (वाटचाल).

मला तुलना करायची नाही, असं मी सुरुवातीला म्हटलं खरं, पण शेवटी एक वाक्य लिहिल्याशिवाय राहवत नाही. 'बारा रामांचं देऊळ' हातात घेतलं की संपूर्ण वाचून होईपर्यंत खाली ठेववत नाही आणि नंतरही ते गुणगुणत राहतं. 'जुम्मन' वाचताना मन तृप्त होते, भारावून जाते, पण एका बैठकीत दोन कथा काही होत नाहीत.

**–निशिकांत मिरजकर.**

**'जुम्मन'** –श्री. ना. पेंडसे. किंमत सहा रुपये. मौज प्रकाशन. पृष्ठे १८४.

**'बारा रामांचं देऊळ'**–सरिता पदकी. किंमत पाच रुपये. मौज प्रकाशन. पृष्ठे १४९.

● ● ●

# जे नव्हते ध्यानी मनी

## *We never meant to go so far*

## या माविस रॉन्सनकृत पुस्तकाचा परिचय

### लेखांक अकरावा

**तुरुंगातून सुटल्यावर दोघी चिनी बोटीवर चढल्या आणि बोट बोर्नियोला निघाली**

चिनी मालवाहू बोटीवर अधिकाऱ्यांमध्ये काही कम्युनिस्ट होते. त्यांच्याशी माविसने इंडोनेशियाबद्दल बोलणे काढले. त्या अधिकाऱ्याने सांगितले,

" इंडोनेशियन लोक इतके आळशी आणि महामूर्ख आहेत की, त्यांना कम्युनिस्ट होणे जमणारच नाही. त्यांना वाटते की, फक्त रशिया व चीनची भरपूर मदत घेतली की आला कम्युनिझम. "

माविसला त्या वेळी ते बोलणे अर्थातच पटले नाही.

बोर्निओला दोघी पोचल्या, तेव्हा तेथे इंग्लिश व अमेरिकन तेल कंपन्यांचे व इंडोनेशियन सरकारचे भांडण जुंपले होते. इंडोनेशियन सरकारची अडवणूक करण्यासाठी शेल, कॅल्टेक्स आदी पेट्रोल कंपन्यांनी आपले भाव मुद्दाम वाढवले, असे सरकारचे म्हणणे होते.

याचा परिणाम म्हणून सर्वच तेल गडप झाले. जिकडे तिकडे तेलासाठी रांगा लागल्या. तिथल्या ब्रिटिश वसाहतीत काही दिवस राहिल्यानंतर दोघी पुनः जकार्ताला परतल्या.

जकार्ताला पोहोचताक्षणीच तेथील ब्रिटिश वकिलातीत त्यांच्या नावाने बराच गोंधळ उडाल्याचे आढळून आले. त्याचे कारण आधीच्या तीन महिन्यांत माविस व बार्बारांनी घरी पत्रेच पाठवली नव्हती. दोघींच्या आई–वडिलांनी तारांवर तारा पाठवून ब्रिटिश-अमेरिकन वकिलातींना हैराण करून टाकले होते. दोघींना काही कुठे अपघात झाला की काय, या शंकेने दोघींच्या घरची माणसे व्याकूळ होती. त्याचबरोबर माविसच्या आईला भीती वाटत होती, की पोरगी तिकडेच कुणाशी तरी लग्न करून कदाचित् परत यणारच नाही. माविसची आई तिला पत्रातून बजावीत असे,

" बाई ग, कुणी नवरा शोधलासच तर तो निदान गोरा व आपला ज्यू जातीतला बघ ! "

दोघींचा परदेशीय पत्रकार म्हणून आता चांगलाच गाजावाजा झाला होता. लंडनहून वृत्तएजन्सीकडून पैसेही चांगले मिळत होते. दोघी जपानला व कोरियाला जाऊन आल्या.चित्तथरारक असे काही तिथे आढळले नाही.उत्तर व दक्षिण कोरियाच्या शस्त्रसंधी झालेल्या रेषेवर दोघी बागडून आल्या. तिथल्या आंतरराष्ट्रीय सीमारक्षकांशी दोस्ती करून झोपायला दक्षिण कोरियात, तर जेवायला उत्तर कोरियात असे काही दिवस त्यांनी काढले. तिथून दोघींनी फॉर्मोसा बेटावर जाण्याचा परवाना हस्तगत केला. फॉर्मोसा बेटावरील राष्ट्रीय चीन सरकारचे प्रेस अॅटॅची यांनी त्यांची तिथे राहण्याची व जेवण्याची व्यवस्था केली.

त्या वेळी फॉर्मोसाजवळच्या क्वेमॉय (Quemoy) बेटावर लाल चीनमधून तोफांचा भडिमार होत होता. दोघींनी लगेच क्वेमॉय बेटावर जायला मिळेल का, याचा तपास सुरू केला. एका लष्करी विमानातून एक अमेरिकन जनरल व चार राष्ट्रीय चीन सरकारचे सेनानी क्वेमॉयला जाणार होते. त्यांच्याशी गप्पा मारून दोघींनी वशिला लावला.

क्वेमॉय बेटावरून दोघींनी दुर्बिणीतून लाल चीनची भूमी पाहिली. परतण्यासाठी विमान वर उडाले मात्र आणि चार रशियन मिग विमानांनी त्यांच्या विमानाला घेरायला सुरुवात केली. वैमानिकाने अगदी समुद्रसपाटीपर्यंत विमान खाली उतरवले. मुठीत जीव धरून दोघी सुखरूपपणे फॉर्मोसाला परतल्या. या चार मिग विमानांशी इतर लढाऊ अमेरिकन विमानांची फॉर्मोसावर गाठ पडली. नंतर मिग विमाने पसार झाली. ही चारही विमाने पाडली, असे दुसऱ्या दिवशी दोघींनी वृत्तपत्रांत वाचले. खरे–खोटे देव जाणे !

आता घरी जाण्याचा विचार दोघींनी पक्का केला. घरी कसे परतावे ! अमेरिकामार्गाने खर्च फार येणार होता. तेव्हा आल्या मार्गानेच परतण्याचा बेत दोघींनी नक्की केला.

बँकॉकमार्गे दोघी लाओसमध्ये गेल्या. लाओसमध्ये रस्ते जवळजवळ नाहीत. एका लष्करी वैमानिकाने दोघींना मॉंगसिंग या डोंगराळ भागातील एका खेड्यात उतरवण्याचे मान्य केले. तिथे डॉ. थॉमस डूली नावाच्या अमेरिकन डॉक्टरने मोठे काम चालवले आहे ते पाहण्यासाठी दोघी निघाल्या.

लाओस व लाल चीन यांच्या सरहद्दींवर त्याने दोन रुग्णालये स्थापन केली होती. अमेरिकन आरमारावर तो अधिकारी असताना तो या भागात आला होता. तेथील लोकांना वैद्यकीय मदतीची काहीच सोय नाही असे पाहून नोकरी सोडून त्याने हे काम अंगावर घेतले.

व्हिएटनाममधून पळून आलेल्या निर्वासितांची सेवा करताना तो स्वतःच आजारी



**गिरिजनांचे देवदूत : डॉ. डूली**

पडला. आजारपणातून बरा होऊन विश्रांती घेत असताना त्याने या निर्वासितांच्या जीवनावर पुस्तक लिहिले. अमेरिकेत या पुस्तकाचा प्रचंड खप झाला. यातून जो फायदा प्रकाशकांनी त्याला दिला त्या पैशांतून त्याने व्हिएन्टाईन येथे एक व मॉंगसिंग येथे एक अशी दोन रुग्णालये उभी केली. प्रथम प्रथम लाओशियन सरकार व अमेरिकन सरकार दोघेही त्यांच्याकडे संशयाने पाहत असत. परंतु त्याचे काम मानवतेच्या सेवेसाठी चालले आहे, अशी त्यांची नंतर खात्री पटताच डॉ. थॉमस डूलीची तुलना डॉ. श्वाइट्झ्रसारख्यांशी दोन्ही सरकारे करू लागली.

मॉंगसिगच्या आसपास २४,०००गिरिजन राहत होते.त्यांना चांगले पिण्याचे पाणी किंवा घरे यांचीही सोय नसल्याने सतत आजारपण चालू असे. मॉंगसिंग येथील रुग्णालयात, आपल्या दोन अमेरिकन साहाय्यकांसह डॉ. डूली या गिरिजनांची अखंड सेवा करीत असे.

## डॉ. डूली भेट

अशा दूर ठिकाणी होणारे औषधोपचार हे १९ व्या शतकातल्यासारखेच तेथे होत असत. परंतु रुग्णाला अजिबात उपचारच न होण्यापेक्षा उपचार होत असत, हे काय थोडे होते ? दोन–तीन मैलांवर लाल चीनची हद्द असल्याने हे रुग्णालय म्हणजे अमेरिकन हेरांचे पोळे आहे, डॉ. डूली हा अमेरिकन हेर असून तो लाओशियन स्त्रियांची अब्रू घेतो, असा प्रचार लाल चीनचा पेकिंग रेडिओ त्या वेळी सतत करीत असे. परंतु डॉक्टरच्या रुग्णालयात शेकडो रुग्णांची रीघ सतत लागलेली व त्या सर्व गिरिजनांना तो देवदूतच वाटे.

माविस डॉ. डूलीकडे राहत असताना त्यालाच तपासण्यासाठी अमेरिकेहून विमानाने एक मोठा डॉक्टर आला. डॉ. डूली याच्या छातीत एका बाजूला कळ येत असे. निदान केले गेले की, 'डॉ. डूलीला कॅन्सर झाला आहे.'

डॉ. डूलीचा निरोप घेताना हा परोपकारी माणूस आता काही दिवसच जगणार आहे ही गोष्ट माविस–बार्बारांना माहीत होती. ही गोष्ट डॉ. डूलीलाही माहीत होती. हॉस्पिटलची पुढची व्यवस्था करण्याचा विचार त्यानी सुरू केला होता.

माविस-बार्बारांनी लाओस सोडल्यानंतर काही महिन्यांतच डॉ. डूली निधन पावला: मृत्युसमयी त्याचे वय होते अवघे बावीस ! !

याच वेळी हो-चि-मिन्हच्या सहकार्याने लाओसमध्ये प्रिन्स सुहातोवाँग याच्या नेतृत्वाखाली पॅथेट लाओ नावाने कम्युनिस्टांची राष्ट्रवादी चळवळ उभी केली होती. प्रिन्स सुवानो फुमा याला अमेरिकेचा पाठिंबा होता व यादवीला तोंड लागले होते.

माविस-बार्बारांनी पॅथेट-लाओ नेता प्रिन्स सुहातोवाँग यांची मुलाखत धाडसाने मिळविली. हा पॅथेट-लाओ चळवळीचा तरुण नेता आपल्या मुलाखतीत म्हणाला,

"आम्ही कम्युनिस्ट नाहीत. आम्ही फक्त राष्ट्रवादी आहोत. आम्हांला खरेखुरे तटस्थ सरकार लाओसमध्ये हवे आहे. अमेरिकन वर्चस्वाखालचे सरकार आम्हांला नको."

लवकरच याला प्रिन्स सुवानो फुमाने अटक केली. लाओसची बातमीपत्रे लंडनला पाठवून दोघी लाओसबाहेर पडल्या. आता ब्रह्मदेशात जन. ने-विनचे सरकार आले होते. ब्रह्मदेश टाळून दोघी विमानाने कराचीला आल्या.

जन. आयूबखानाची राजवट पाकिस्तानात येऊन एक वर्ष झाले होते. कराचीत सुमारे पन्नास लाख निर्वासित अत्यंत गलिच्छ पद्धतीने राहत होते. पाच महिन्यांत प्रत्येकी २००० रु. किंमतीत दोन खोल्यांची पंचराशे घरे जन. आयुबखानाने बांधवून घेतली होती. या गलिच्छ वस्त्या उठवण्यास सुरुवात झाली होती.

कायदाबाद येथे ७०,००० निर्वासितांची वसती होती. तिथे दोघी गेल्या. त्या दोघी तिथे पोचताच अर्धपोटी पोरासोरांनी त्यांच्याभोवती गराडा घातला. त्यांच्याशी धक्काबुक्की सुरू केली. कुणी त्यांच्याकडे पैसे मागत होते, कुणी त्यांचे कॅमेरे हिसकून पाहत होते. कुणी त्यांना जवळ ओढण्याचा प्रयत्न करीत होते. या मवाली वस्तीतून त्या कशाबशा निसटल्या.

कराचीहून परस्पर लंडनला जाण्याऐवजी माविस-बार्बारांनी पुन: काही दिवस भारतात घालवण्याचे ठरवले व दोघी कलकत्त्यात आल्या. कलकत्ता नेहमीप्रमाणे त्या वेळी अशांतत्र होते. भाववाढीविरुद्ध डाव्या पक्षांची दंगल सुरू होती. रस्त्यात हुल्लडबाजी माजली होती. विद्यार्थीवर्ग जोरात दगडफेक करीत होता. अश्रुधुराच्या फैरी सुटत होत्या. डोळ्यांतून पाण्याची धार लागलेली असतानाही माविस-बार्बारा भराभर फोटो घेत होत्या. इतक्यात जमावातील कुणीतरी ओरडला—

" या अमेरिकन फोटोग्राफर आहेत. फोडा, कॅमेरा फोडा !" एका पोलिसाची पगडी लाथेने इकडे तिकडे उडवणारे विद्यार्थी व लूटमारीसाठी जमलेल्या जमावाने दोघींना घेरले. कॅमेऱ्यासाठी हिसकाहिसकी सुरू झाली. एका हिंदी पत्रकाराने हा प्रकार पाहिला. तोही बंगाली होता. त्याने जमावाला खडसावले,

" या मुली अमेरिकन नाहीत. आणि असल्या तरी वृत्तपत्रप्रतिनिधीवर हात टाकण्यात काय अर्थ आहे ? "

पोलिसांनी जमाव पांगवला. वृत्तपत्रांत दुसऱ्या दिवशी ही घटना प्रसिद्ध झाली. ४६ माणसे गोळीबारात ठार झाली. दिल्लीतून हायकमिशनर कचेरीतून दोघींना तार आली, " खुशाली कळवा. "

आपल्या देशच्या दोन स्त्री-नागरिकांच्या संरक्षणासाठी दक्ष असलेले ब्रिटिश सरकार पाहून सरहद्दीवर खेड्यापाड्यांतून हिंदू स्त्रिया व गुरे-ढोरे पळवणाऱ्या पाकिस्तान्यांशी लाडात येणारे आपले सरकार काही शिकेल काय ?

कलकत्त्याहून दोघी भिलाईला गेल्या. भिलाई येथील रशियाच्या सहकार्याने सुरू झालेला पोलादाचा कारखाना दोघींनी पाहिला. तेथे कामगार कटकटी नव्हत्या. कारण मालकाविरुद्ध असंतोष भडकवणारी कम्युनिस्ट संघटना तिथे मुद्दामच जन्माला घातली गेली नव्हती. जवळजळ ५०० हिंदी इंजिनियर्स रशियनांकडून कारखान्याची सूत्रे हाती घेण्यासाठी तयार केले जात होते.

तिथल्या रशियन इंजिनियरांशी दोस्ती करून त्यांना बोलके करण्याचा यत्न माविस-बार्बारा यांनी करून पाहिला. परंतु त्यांचा घुमेपणा वरचढ ठरला. त्यांनी फारसे तोंड उघडले नाही.

भिलाईच्या समाजवादी वातावरणातून त्या दोघी भारताला सर्वांत मोठा ऐतखाऊ मांडवलदार जो निजाम त्याला भेटण्यासाठी हैदराबादला गेल्या. त्या वेळी निजामाची सर्व अनौरस संतती आपला अनौरस बाप खर्चाला पुरेसे पैसे देत नाही, म्हणून संपावर होती. आता ऐदी माणसे, जी रिकामटेकडीच असतात, ती संपावर जाणार म्हणजे काय करणार, हे कुणालाच कळलेले नव्हते ! जनतेला शे-दीडशे वर्षे पिळून गबर झालेल्या निजामाच्या राजवाड्यात ८०० माणसे दोन वेळा अन्नाला त्या वेळी होती. मोत्याचा चुरा निजाम औषध म्हणून पोटात घेतो, अशी माहिती माविसला मिळाली. या शहेनशाहाला भेटण्यासाठी दोघींनी फार प्रयत्न केले. परंतु यश आले नाही. निजामाचे आर्थिक सल्लागार श्री. तारापोरवाला यांनी निजामाच्या एका अक्षरशत्रू आडदांड मुलाबरोबर दोघींना सहलीला जाण्याचा घाट मात्र जमवून आणला. दिवसभर हे खुशालचेंडू राजपुत्र व्हिस्की पीत होते. निजाम स्वतः दारू पीत नसे, याचा फायदा त्यापेक्षा त्याच्या मुलांना होत होता.

१९५९ साल या वेळी संपत आले होते. दिल्ली भेटीत नेहरू सरकारातील जादा महत्त्व इच्छिणारे दोन मंत्री कृष्णमेनन व मोरारजी देशाई यांच्या मुलाखती

दोघींनी मिळविल्या. " मेननचा पगडा ' जवाहर गृही ' " अशी त्या वेळी परिस्थिती होती व मोरारजी देसाई हे नेहरूंनंतर प्रधानमंत्री होणार असे धरूनच त्या वेळी वागत होते.

## इंदिराजींबरोबर खाना

पंडित नेहरूंना भेटण्यासाठी दोघी गेल्या तेव्हा पंडितजी चाऊ-एन-लायचे पत्र वाचीत होते. पत्र वाचताना नेहरूंचा एक फोटो त्यांनी घेतला व नेहरू सकाळी न्याहरी घेतात तेव्हा भेटण्याची संधी द्या, अशी इंदिराजींकडे दोघींनी हट्ट धरला. इंदिराजींनी दोघींना सकाळचे निमंत्रण दिले. दोघी आल्या, दोघींसाठीही दुसऱ्या खोलीत टेबलावर पदार्थ ठेवलेले होते. दोघी म्हणाल्या, "आम्हांला फक्त पंडितजी खात असताना फोटो हवे आहेत." परंतु फोटो न मिळता फक्त पंडितजींबरोबर न्याहरी करूनच दोघींना जावे लागले दोघी. काहीशा ओशाळल्या, कारण निमंत्रण मागून ब्राह्मण गेल्यासारखे दोघींना झाले. नेहरू एका खोलीत न्याहरी घेत होते आणि या दोघी इंदिराजींबरोबर पलीकडल्या खोलीत.


त्याच दिवशी सायंकाळी पंडितजींना बंगल्याच्या आवारात दोघींना भेटता आले. नेहरूंना पूर्वी दोघी भेटल्याचे स्मरण होतेच.

जानेवारी १९६० मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष आयसेनहॉवर यांनी भारताला भेट दिली. दिल्ली भेटीतील त्यांच्या स्वागताची छायाचित्रे घेऊन होतात न होतात तोच सिलोनमध्ये पंतप्रधान बंदारनायके यांचा थेरो नावाच्या बुद्ध धर्मगुरूने गोळ्या घालून खून केला.

सिलोनमध्ये खुनाचा खटला उभा राहण्याच्या सुमारास दोघी सिलोनला गेल्या. या खटल्यात थेरो हा प्रमुख खुनी आरोपी होताच. परंतु या खुनात स्थानिक स्वराज्य खात्याच्या मंत्री सौ. विमल विजवर्धिने यांचे नाव घेण्यात येत होते. कारण या मंत्रिणबाई या थेरोच्या प्रेयसी आहेत, असा पुरावा कोर्टापुढे येत होता. या बाईंनी तत्काळ मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. पाठोपाठ सिलोनच्या अर्थ-मंत्र्यांचे नावही खुनाच्या कटात गोवले जाऊ लागले होते. सौ. विजवर्धिने या बाईचा फोटो माविसने ती बाई लिफ्टमध्ये चढता-चढता घेतला व दुसरे दिवशी वृत्तपत्रांत हा फोटो सर्वत्र झळकला. बंदारनायके खुनाच्या संबंधातील वृत्तपत्रीय स्वारस्य संपताच दोघींनी भारतात मोर्चा फिरवला व पुनः एकदा नेपाळला चक्कर मारून भारताचा निरोप घेतला.

[ अपूर्ण ]

**रा. म. शास्त्री**



# शब्दसंगीत आणि स्वरसंगीत ह्यांचा सुंदर मिलाफ
# ययाति आणि देवयानी

'मडगाव साहित्य संमेलना'च्या वेळी अर्धे गोवेकर झालेले आणि 'ययाति आणि देवयानी' ह्या नाटकाच्या निमित्ताने संपूर्ण गोवेकर झालेल्या 'शिरवाडकरां'चं देवयानीच्या आयुष्याच्या उत्तरार्धातील संघर्षावर आधारलेलं प्रस्तुत नाटक हे त्यांच्या 'कौंतेय'नंतरचं दुसरं पौराणिक नाटक.

ह्या नाटकाचं प्रमुख सामर्थ्य म्हणजे सुंदर व प्रसन्न भाषाशैली. नुसत्या शब्दांतून दिव्य नि भव्य आशय आणि समर्थ व्यक्तिरेखा साकार झालेल्या आहेत. काव्यमय व नादवती भाषा मनावर विलक्षण परिणाम करून जाते. कुसुमाग्रजांच्या गद्यकाव्य नि भावकाव्य ह्यांची मनोरम जुगलबंदी विलोभनीय आहे. त्यांचं अर्थवाही, दिलचस्प भावसंगीत हृदयस्पर्शी व मनोवेधक स्वरावलीने उजळून निघालेलं आहे. कुसुमाग्रजांचं नितांतसुंदर भावकाव्य हा वादी स्वर आणि जितेन्द्र अभिषेकींचा सुमधुर, लालित्यपूर्ण व प्रसन्न स्वरझंकार हा ह्या नाटचकृतीचा संवादी स्वर असं वाटण्याइतपत ह्यातील काव्य नि संगीत परिणामकारकपणे एकजीव झालेले आहे. शब्द नि सूर ह्यांनी आपापलं योग्य 'बेअरिंग' सांभाळून, परस्परांना पूरक, पोषक अशा 'भूमिका' घेऊन सादर करण्यात आलेली अलीकडच्या काळातील ही एक वैशिष्टचपूर्ण संगीत नाटचकृती.

## अभिषेकींचे यश

जितेन्द्र अभिषेकींनी ह्या नाटकाला संगीताचा दर्जेदार साज उत्तम चढविला आहे. सामान्य माणसाला रिझवणारं पण अभिजात संगीतानं नटलेलं संगीत त्यांनी नियोजिलेलं आहे. जणू सारी प्रतिष्ठाच पणाला लावून प्रसंगानुरूप भावमधुर बिनतोड रागांची निवड केलेली आहे. विशेषत:, दुसऱ्या अंकातील कान्होपात्रा हिने गायिलेल्या ललत आणि मारवा या रागांतील व रामदास कामतांच्या 'तिलककामोद', 'बिहागडा' व 'भीम' रागांतील गीतांचा विशेष उल्लेख करावयास हवा. "प्रेम वरदान, स्मर स्मर सदा" हे 'भीम' रागातील पद भीम पराक्रम गाजवील एवढा भरंवसा देते. कान्होपात्रा व रामदास कामतांच्या गायनगुणांचे भरपूर दर्शन घडते. "देवयानीच्या गाण्यात स्वर आहे तर शर्मिष्ठेच्या गाण्यात रस आहे," असं जरी नाटकात कचाच्या तोंडचं म्हणून उल्लेखिलेलं वाक्य असलं तरी प्रत्यक्षात कान्होपात्रेच्या (शर्मिष्ठा) गाण्यात स्वर व रस असल्याची प्रचिती आली. तिने अभिषेकींच्या स्वरावलींना योग्य न्याय देण्याचा कसून प्रयत्न केलेला दिसला. नव्या दमाच्या गायक नटांमध्ये आशास्थान असलेल्या रामदास कामतांच्या गायनाने

रसिकांचे कान तृप्त होतात. संगीत-दिग्दर्शक ह्या नात्याने 'मत्स्यगन्धे 'तल्या 'अस्ताई 'नंतर जितेन्द्र अभिषेकींनी ह्या नाटकात सादर केलेला दमदार आणि जोमदार 'अंतरा ' पाहून रसिकांच्या त्यांच्याबद्दलच्या अपेक्षा उंचावल्यास नवल नाही !

गोपीनाथ सावकार हे एका पायाने अपंग असतानासुद्धा, त्यांनी अत्यंत परिश्रमाने, कसोशीने व विलक्षण जिद्दीने प्रस्तुत नाटक भरभक्कम पायांवर उभे करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसला. त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच !

**वेदना जाणवत नाहीत**

परंतु एवढं मान्य करूनही हे नाटक एखाद्या पौराणिक नाटकासारखं ठोकळेबाज ढोबळपणानं बसवल्यासारखं वाटलं. ह्या नाटकाला पौराणिक पार्श्वभूमी आहे म्हणून त्याकडे इतर पौराणिक नाटकांच्या दृष्टीने पाहणं रास्त ठरणार नाही. ह्या नाटकात दाखविलेला मनोविश्लेषणात्मक संघर्ष हा कुठल्याही सामाजिक नाटकात चपखल बसणारा आहे. हे नाटक बसविताना प्रथम ओळख पटली पाहिजे, ती ह्या गोष्टीची की, त्यातील वेदना प्रेक्षकांपर्यंत पोचविण्याची ! नाटकाची ही जात लक्षात न घेतल्यामुळे एका सुंदर व संपन्न नाटचवस्तूवर अन्याय झाल्यासारखे वाटले. पात्रांनी शब्द न् शब्द (पाठांतरामुळे) प्रेक्षकांपर्यंत पोचवला; पण त्यातील वेदना तीव्रपणे जाणवली नाही. एका जिवंत व सकस नाटचवस्तूच्या रंगमंचावरील आविष्काराला, एका समर्थ आशयाच्या अभिव्यक्तीला, गोपीनाथ सावकारांचं कसब अपुरं पडलं ! नाटकाच्या अखेरीस देवयानीला तिच्या शोकान्तिकेची जाणीव करून देऊन, " आपलं फक्त तुझ्यावरच पवित्र, निरपेक्ष प्रेम आहे, " असं कच देवयानीला सांगतो तो नाजूक व हळुवार प्रसंग किंवा दुसऱ्या अंकात कच देवयानीला, " तू खरोखरीच सुखी आहेस का ? " असा प्रश्न विचारतो. त्यानंतरचा नाटचपूर्ण संघर्षाचा प्रसंग पुरेशा जाणीवेनं प्रेक्षकांपर्यंत पोचलाच नाही. हीच गोष्ट ययातीच्या लोकविलक्षण–आत्म्याचा उद्धार दुर्लक्षून शारीरिक भोगलालसेच्या मागे धावणाऱ्या शोकान्तिकेची ! त्यातील भावुकता, उत्कटता सूक्ष्म नि तीव्र बारकाव्यांच्या अभावी गुदमरून जाते. विदूषकाच्या भूमिकेला असलेली गांभीर्याची किनारही अशीच प्रेक्षकांच्या नजरेतून निसटते. ते न्याहाळतात ती फक्त विनोदाची वीण व प्रसन्नतेचा पोत !

असं असलं तरी कुसुमाग्रजांनी केलेला कथानकाचा नेटका विकास, पात्रांच्या स्वभावांच्या रेखीव छटा, कल्पकतापूर्ण संवादांतून उधळलेली मुक्त शब्दसुमने मनावर इतका परिणाम करून जातात की, ह्या नाटकातील इतर उणीवा ध्यानात यायला अवधीच सापडू नये. त्यामुळे सबंध प्रयोग चांगला झाला, अशी सामान्य प्रेक्षकांची समजूत होते; किंबहुना बऱ्याच दिवसांनी एक चांगलं नाटक पाहिलं हा

बहुसंख्य प्रेक्षकांनी दिलेला कौल हीच ह्या नाटकाच्या यशाची पावती. ' साहेबां'च्या समस्या दत्तक घेतलेल्या नाटकांनी (ह्यातील काहींची भाषाही धड मराठी नसते ! ), न–नटयाच्या वेगडी ' अनर्थि'कांनी, आणि हलक्या फुलक्या ' इनोदी ' नाटकांनी उबग आलेल्या रसिक मनाला सावकारांचा समृद्ध नि संपन्न भाषेचं लेणं लाभलेला हा परंपरागत विशुद्ध रंजनप्रधानबाज विलक्षण भुरळ घालतो खास ! ' सावकारां 'चं हे ' ऋण ' रसिकांना विनातक्रार मान्य व्हावं.

अभिनयाच्या दृष्टीने लक्षात राहिले ते मा. दत्ताराम (ययाति) व लता काळे (देवयानी). दत्तारामांनी नेहमीची राणा भीमदेवी पठडी कटाक्षाने बाजूला टाकून शिरवाडकरांनी रेखाटलेला ' ययाति ' बऱ्याच अंशी यशस्वीपणे उभा केला. पण इथं-सुद्धा स्वभावचित्रणांतील हृद्य बारकाव्यांपेक्षा त्यांच्या अकृत्रिम शब्दोच्चारांनी व आवाजांच्या चढउतारांच्या सराईत कसबानेच त्यांना जास्त मदत केली. मोडेन पण वाकणार नाही, असा कणखर व ताठ कणा असलेली अहंकारी देवयानीची भूमिका लता काळेंनी मनस्वी ताठरपणे व विलक्षण आत्मविश्वासपूर्वक सादर केली. अखेर-पर्यंत आपलं ' बेअरिंग ' अत्यंत तन्मयतेनं सांभाळलं, ही कौतुकाची बाब. शरीराचा त्याग करून आत्म्याच्या उद्धारार्थ वणवण भटकणारा, उग्र व हुकमी बोलणारा ययातीचा भाऊ यति (परशुराम सामंत)ही एक छोटीशी पण प्रत्ययकारी भूमिका. रामदास कामत (कच), कान्होपात्रा (शर्मिष्ठा) व छोटू सावंत (विदूषक) ह्यांची कामंही ठाकठीक.

दिवकरांचं कलात्मक नेपथ्य व चन्दर होनावर, बापू आंगणे ह्यांची कल्पक व प्रसंगोचित प्रकाशयोजना ह्यांनी प्रस्तुत नाटक नटलं आहे. नेपथ्याने निव्वळ तांत्रिक करामतीकडे लक्ष न दिल्यामुळे (नेपथ्याचे पथ्य काटेकोरपणे पाळल्यामुळे ) नेप-थ्याची कथावस्तूवर, अभिनयावर उघड उघड झालेली मात पाहावी लागली नाही, हेही समाधान नसे थोडके !

—मनोहर

• • •


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

**शर्मा स्वीट मार्ट**

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

# पुरुषोत्तम करंडक

पुण्याच्या महाविद्यालयीन रंगभूमी क्षेत्रामध्ये 'पुरुषोत्तम करंडक' स्पर्धांना विशेष महत्त्वाचे स्थान आहे. विशेषतः, युवक महोत्सव स्पर्धेतील चुरस नाहीशी झाल्यापासून या स्पर्धेला प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले आहे. या वर्षी या स्पर्धेमध्ये झालेल्या तेरा एकांकिकांमधून ८२ कलावंतांनी भाग घेतला. या स्पर्धेचा दर्जा प्रतिवर्षी उंचावत असून या वर्षी आधुनिक तंत्राने दोन एकांकिका सादर करण्यात आल्या. त्यांपैकी बी. जे. मेडिकल कॉलेजने सादर केलेली 'पाच दिवस' या एकांकिकेने पहिल्या क्रमांकाचे यश मिळवले.

सदानंद रेगे यांनी या एकांकिकेमध्ये वेगळ्या विषयाला हात घातला आहे. सैनिक हा माणूस असतो. परंतु सैनिक म्हणून उभा राहिल्यावर त्यास आपले कर्तव्य कठोरपणे पार पाडावे लागते. या दोन्ही गोष्टी त्यांनी एकांकिकेत गुंफलेल्या कथेद्वारा सांगितल्या आहेत. एक सैनिक व त्याचा कैदी यांचा पाच दिवसांचा प्रवास व या प्रवासकाळात त्या दोघांच्या मनःस्थितीतील बदल यांची नोंद लेखकाने घेतली आहे. माणूस आणि शत्रू यांच्यामध्ये त्यांनी केलेला भेदही मोठा मार्मिक आहे. निवेदकाच्याद्वारा लेखकाने युद्धासंबंधीच्या व्यक्तिगत कल्पना साकार केल्या आहेत. मुंबईच्या रंगायन या संस्थेने ही एकांकिका मोठ्या प्रभावीपणे सादर केली होती. बी. जे. मेडिकलच्या विद्यार्थ्यांनीही अत्यंत परिश्रमपूर्वक या एकांकिकेचा प्रयोग स्पर्धेत सादर केला. विद्याधर वाटवे व श्रीनिवास पानवलकर या दोन कलावंतांनी आपल्या भूमिकांना न्याय दिल्याने एकांकिकेचे यश सुलभ झाले. शेतकरी व त्याची बायको, दोन्ही बाजूंचे सेनाधिकारी या भूमिका साकार करणाऱ्या कलावंतांकडे अधिक लक्ष देणे आवश्यक होते. निवेदकाच्या निवेदनामुळे कथा-प्रवाहात व्यत्यय आल्याचे जाणवत होते. प्रकाशयोजना, स्थिर अभिनय-पद्धती, सूचक रंगमंच यांचा वापर करून एकांकिका यशस्वी करण्यात आली. तंत्राची जाणीव सर्व कलावंतांना असणे अगत्याचे होते. श्रीनिवास पानवलकर यांचा गोळी लागल्यानंतरचा भावाविष्कार व विद्याधर वाटवे यांनी आकाशातून विमान जात असताना केलेला अभिनय हे प्रेक्षकांच्या दीर्घकाळ लक्षात राहतील. अनेक दृष्टिकोनांतून वैशिष्ट्यपूर्ण असणारी ही एकांकिका निर्विवादपणे 'पुरुषोत्तम करंडका'ची मानकरी होण्यास पात्र होती.

### तीस मिनिटे

'तीस मिनिटे' ही स. प. च्या कलावंतांनी सादर केलेली एकांकिका स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे यश मिळवून गेली. छोट्या स्टेशनवरील प्रतीक्षागृह, त्यात काही

काळासाठी आलेले दोन प्रवासी व त्यांच्या या अल्पकालीन वास्तव्यातून निर्माण होणारे नाट्य श्री. सुरेश बसाळे व गौरी जोशी या दोन्ही कलावंतांनी प्रेक्षकांपर्यंत पोहोचवले. दिग्दर्शक श्रीराम खरे यांनी वातावरणनिर्मिती व ध्वनिपरिणामांचा ( Sound Effects ) वापर यांवर भरपूर मेहनत घेतलेली दिसली. दिग्दर्शनाचे पारितोषिक त्यांना मिळाल्याने त्यांच्या श्रमाचे चीजही झाले.

दिग्दर्शनाच्याच दृष्टिकोनातून ज्यांचा गौरवपूर्ण उल्लेख करावा लागेल, अशा 'थीफ्-पोलिस' व 'मोठे मासे, छोटे मासे' या दोन एकांकिका स्पर्धेत सादर करण्यात आल्या. पहिल्या एकांकिकेचे दिग्दर्शन कल्याण वर्दे यांनी केले होते, तर दुसऱ्या एकांकिकेच्या दिग्दर्शनाची जबाबदारी धनंजय गोळे यांनी पार पाडली होती.

अचूक पात्रयोजना, कलावंतांना भूमिका समजावून देणे, भरपूर मेहनत घेऊन प्रयोग बसवणे, तंत्राचा सुयोग्य वापर करणे, ही दिग्दर्शनाची वैशिष्ट्ये मानली तर वरील दोन्ही दिग्दर्शकांनी या सर्व वैशिष्ट्यांचा जाणीवपूर्वक वापर केल्याचे जाणवत होते. मात्र धनंजय गोळे यांनी कलावंतांना नाट्य समजावून देण्यावर भर दिला असता तर ते अधिक लाभदायक ठरले असते.

एम. इ. एस. च्या 'थीफ्-पोलीस' मध्ये सोसायटी लेडी (निलिमा चिटणीस), प्रॉडक्शन मॅनेजर ( प्रकाश इनामदार ) व पेन्शनर ( शाम साठे ) या कलावंतांनी वैयक्तिक अभिनय गुणांमुळे विशेष छाप पाडली. स. प. च्या 'मोठे मासे, छोटे मासे' मधील केळेवाली ( मंगला गुमास्ते ) व चंद्रा ( रोहिणी ओक ) यांच्या अभिनयांतील वास्तवता उल्लेखनीय होती.

## अबोल झाली सतार

मराठीमध्ये चांगल्या एकांकिका फार थोड्या. त्यामुळे त्याच त्याच लेखकांच्या त्याच त्याच एकांकिका स्पर्धेमध्ये वारंवार आढळतात. पुरुषोत्तम दारव्हेकरांच्या 'अबोल झाली सतार' या भावपूर्ण एकांकिकेचे दोन प्रयोग स्पर्धेत झाले. फर्ग्युसन व कॉमर्स या एकाच संस्थेच्या दोन महाविद्यालयांनी या एकांकिका सादर केल्या. कॉमर्सची एकांकिका अतिसामान्य दर्जाची झाली. त्यामानाने फर्ग्युसनचा प्रयोग पुष्कळच नेटका वाटला. रेखा किर्लोस्करची सविता व दिलीप कोल्हटकरचा दामू दिघे, असा रंगला की रमेशची कलकत्त्याची मैफल प्रेक्षकांच्या मनःश्चक्षूंसमोर तरळून गेली. दामू दिघेची प्रभावी संवादफेक व सविताचे अत्यंत बोलके भावदर्शन यांची जुगलबंदी प्रेक्षकांची टाळी घेऊन गेली. रेखा किर्लोस्कर यांच्याकडे थोडे अधिक संवादफेकीचे कौशल्य असते तर त्या प्रशस्तिपत्राच्या मानकरी जरूर ठरल्या असत्या.

या एकांकिकेत नैतिकेची सावली दाखवण्याचा प्रयत्न स्तुत्य वाटला तरी त्यावर अधिक मेहनत घेणे जरूर होते. दिग्दर्शक श्री. मधुकर जोशी यांनी काही विशिष्ट कलावंतांवर विशेष मेहनत घेतली असावी असे वाटले. दुय्यम भूमिकांकडे त्यांनी लक्ष पुरवणे अगत्याचे होते.

## 'ऐतिहासिक' धाडस

स्पर्धेमध्ये ऐतिहासिक एकांकिका सादर करणे जरा धाष्टर्याचेच. परंतु गेल्या वर्षीचे यश लक्षात ठेवून एम. इ. एस. महाविद्यालयाने या वर्षीही ऐतिहासिक एकांकिका स्पर्धेत उतरवली. अपुरी तयारी, बेताच्या कुवतीचे कलावंत व आयत्या वेळी माईकने दिलेला दगा, यांमुळे 'पानिपतची पहाट' कमालीची निष्प्रभ ठरली. बऱ्यापैकी कलावंत रंगभूमीवर असताना एखादा डावा कलावंत रंगभूमीवर आल्यावर यशाचा समतोल सांभाळणे किती कठीण असते, याचा प्रत्यय या एकांकिकेमध्ये 'विश्वासरावा'मुळे (अजित आगाशे) दिसून आला.

पुणे विद्यापीठातर्फे विद्यार्थी-लेखक श्री. जयंतकुमार त्रिभुवन यांची 'ज्वाला' ही अहिल्याबाई होळकर यांची मनोव्यथा सांगणारी एकांकिका सादर करण्यात आली. कुलकर्णी यांच्यासारख्या प्रथमश्रेणीच्या कलावंताची साथसुद्धा या एकांकिकेस सावरू शकली नाही. घाईगर्दीत स्पर्धेच्या आगीत उडी घेतली म्हणजे निघणाऱ्या 'ज्वाला' किती चटके देणाऱ्या असतात, याची कल्पना या प्रयोगाच्या सादरकर्त्यांना आली.

विद्यापीठाच्या दुसऱ्या संघाने सुभाष जोशी या विद्यार्थ्यानेच लिहिलेली 'येरे येरे पावसा'चा प्रयोग केला. नाटिकेचा आशय, समजावून घेण्याची इच्छा असलेल्या जाणकारांच्याही कुवतीपलीकडे होता तर सामान्यांची काय कथा! सुभाष जोशी व सुरेश गरसोळे या दोघांच्या अभिनयनैपुण्यामुळे काही काळ एकांकिका ऐकली गेली. परंतु त्यानंतर मात्र प्रेक्षकांची सहनशीलता संपली. एकाच वाक्याची व एकाच प्रसंगाची पुनरुक्ती विद्यार्थी समजू शकले नाहीत. (ती सहेतुक केली होती म्हणे) लेखकाने प्रयोगापूर्वी स्पष्टीकरणात्मक पुस्तिका वाटली असती तर प्रेक्षकांवर फार उपकार झाले असते.

टिळक प्रशिक्षण महाविद्यालयाने 'सफाई' ही एकांकिका चांगल्या प्रकारे सादर केली. सौ. सरोज वीरकर यांनी व्यक्तिगत अभिनयामुळे प्रेक्षकांवर पकड बसवली. त्यांना एकांकिकेतील तिन्ही चोरांनी प्रामाणिकपणे साथ दिली.

या निमित्ताने स्पर्धेच्या संयोजकांना दोन सूचना कराव्याशा वाटतात. स्पर्धा पाहण्यास येणाऱ्या व्यक्तींना लहान मुले आणण्यास बंदी करण्यात यावी. नको तिथे गडबड करून हे बालगोपाळ रसहानी करतात. छोटी छोकरी असलेला शेजारी लाभल्यामुळे एक एकांकिका पाहणे अशक्य झाले.

या स्पर्धा सर्वार्थाने महाविद्यालयीन करण्याकडे संयोजकांचा कल आहेच; परंतु राज्य पातळीवर विशेष यश संपादन करणाऱ्या श्री. कल्याण वर्दे, श्री. श्रीराम खरे, श्री. अनंत ओक, श्री. दीनानाथ टाकळकर यांसारख्या मंडळींना स्पर्धेत क्रियाशील भाग घेण्यास बंदी करण्यात यावी. अर्थात त्यांचे मार्गदर्शन लाभले तर ते हवे.

— शरद गोखले

# निकालापूर्वी — प्रेक्षागारातून

★ बऱ्याच जणांना नको असलेला स्पर्धा—उद्‌घाटनाचा मान यंदा फर्ग्युसन महाविद्यालयाला मिळाला. त्यांनी श्री. पुरुषोत्तम दारव्हेकरलिखित 'अबोल झाली सतार' ही एकांकिका सादर केली. पं. रविशंकर यांच्या वसंत बहारने ही एकांकिका बरीच श्रवणीय केली..

★ त्या दिवशीची दुसरी एकांकिका रत्नाकर मतकरी यांची. या लेखकाच्या वैशिष्ट्यांप्रमाणे एकांकिकेचे नाव आवी नीट समजले नाहीच, पण अखेर 'ते घन तमी शुक्र' असल्याचे आढळून आले. असे मत पडले की, रंगमंचावर आटयापाटयांचा खेळ सादर केला गेला.

★ 'काळ वेळ' ही त्यांचीच एकांकिका लॉ—कॉलेजतर्फे श्री. प्रसन्नकुमार काकडे यांनी डॉक्टरच्या भूमिकेत उभी केली व विश्वनाथ पळशीकर यांनी त्याला हातभारही लावला. परंतु ही उभी राहिलेली एकांकिका 'इन्स्पेक्टर' या पात्राने सपशेल आडवी पाडली.

★ स. प. महाविद्यालयाने मात्र अगदी 'बाऊन्ड्री' मारली. पु. ल. देशपांडे यांच्या 'मोठे मासे, छोटे मासे' या एकांकिकेच्या निवडीवरच त्यांचे निम्मे यश आहे. एकूण सोळा पात्रे असूनही एकही पात्र फिके पडले नाही व त्यांची एकमेकांना उत्तम साथ मिळालेली होती.

★ तिसऱ्या दिवशी इंजिनिअरिंग व कॉमर्सने आपापल्या एकांकिका सादर केल्या. इंजिनिअरिंगने मतकरी यांची 'मंत्र' सादर केली. मंत्राच्या मुलांनी अगर दिग्दर्शकांनी समजूतदारपणाची अपेक्षा कॉलेजच्या विद्यार्थी-प्रेक्षकांकडून करणे योग्य नव्हते.

★ सर्वांत विनोदी प्रयोग तोही गंभीर एकांकिकेचा, कॉमर्स कॉलेजने केला. त्यांनीही 'अबोल झाली सतार' ही एकांकिका मोठ्या प्रेमाने सादर केली. यातील 'बापूसाहेब' या पात्राचे आपल्या 'प्रिय' कन्येला उद्देशून एक असे वाक्य आहे की 'मी तुला अजूनही श्रीमुखात देऊ शकतो.' तसे खरोखरच झाले असते तर प्रेक्षकवर्गाने समाधान मानले असते. मग तिनेही त्यांना एक ठेवून द्यायची; कारण ते 'बापूसाहेब' शोभतच नव्हते.

★ बुधवारी प्रेक्षक मोठ्या अपेक्षेने व अधिक प्रमाणांत उपस्थित होते.— कारण अर्थातच बी. जे. मेडिकल कॉलेजची एकांकिका ! त्यांनी सदानंद रेगेलिखित 'पाच दिवस' या एकांकिकेचा प्रयोग केला. अभिनयदृष्ट्या उत्तम प्रयोग झाला.

★ यानंतर स. प. महाविद्यालयाने आपली दुसरी एकांकिका सादर केली. यात दिग्दर्शक श्रीराम खरे यांची कमाल. 'तो'च्या भूमिकेत श्री. सुरेश बसाळे व 'ती'च्या भूमिकेत गौरी जोशी या दोघांनी प्रेक्षकांना गुंग करून सोडले.

—रवींद्र गुर्जर

# राशी भविष्य : श्री. बी. डी. घाणेकर : भृगुसंहितातज्ज्ञ

दिनांक ११ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर १९६६

**मेष** : या सप्ताहात आपल्या राशीस्वामीचे परिभ्रमण अनुकूल जाईल. आरोग्य-विषयक त्रास दूर होऊन स्वास्थ्य लाभेल. दि. १३ व १४ मनाजोगत्या गोष्टी घडून येतील. दि. १६ पासून विरोधकांचे काही चालणार नाही. शत्रूनाश होईल. आर्थिक अडचण सोडल्यास संतती व पत्नी मनाजोगते वागतील. विद्यार्थ्यांना सप्ताह अनुकूल आहे. लीनतेने व मधुर बोलण्याने आपले बरेचसे काम सुखप्रद होईल. कारण आपल्या राशीस ग्रहांचे जितक्या प्रमाणात पाठबळ पाहिजे, तसे नाही. दि. १७ अनुकूल. प्रवासाचा योग. स्त्रियांचे बाबतीत पतिराज अडचणीत आहेत.

**वृषभ** : आपला राश्याधिपती सुखस्थानात आहे. रवि-गुरुचेही शुभयोग आहेत. दि. १६पासून आपल्या इच्छित कार्यास यशप्राप्तीची सुरुवात होईल. विद्यार्थ्यांना विद्याभ्यासात उत्तम यश. स्त्रियांचे बाबतीत पतिराजांच्या तब्येतीस किरकोळ त्रास. ज्यांचे कृत्तिका नक्षत्र द्वितीय चरण असेल, त्यांना १५ ते १८ या तारखा शुभ आहेत. कोर्टकामे व स्थावरासंबंधीची कामे लांबणीवर टाकावीत. व्ययस्थानात राहू असल्यामुळे चतुष्पाद जनावर किंवा वाहनांपासून जपावे.

**मिथुन** : दि. १६ पर्यंत आपल्याला ग्रहमान पुष्कळसे बरे आहे. तोपर्यंतच आपले विशिष्ट कार्य साधून घ्या. कारण, पुढे ग्रहमान प्रतिकूल येत आहे. धनस्थानातील मंगळ कुटुंबियांकरिता द्रव्य खर्च करावयास लावील. पत्नी मनाप्रमाणे वागून तिचे सहकार्य चांगले मिळेल. तिच्या नावे काही व्यवहार केल्यास आर्थिक फायदा होईल. दि. १६-१७ अचानक प्रवास. संततीच्या बाबतीत अधून मधून त्रास व अकारण द्रव्य खर्च. स्त्रियांचे बाबतीत पती मनाप्रमाणे वागतील. मनोकामना पूर्ण होतील. विद्यार्थ्यांस मात्र हा सप्ताह प्रतिकूल असल्यामुळे त्यांनीही दक्षता घ्यावी. नवीन आर्थिक व्यवहार जपून करावेत. दि. १३ व १४ प्रतिकूल तारखा आहेत. शब्द हे दुधारी शस्त्र आहे. बोलण्यात संयम ठेवा. त्यायोगे अडीअडचणी टळतील.

**कर्क** : सध्या आपल्याला गुरुमहाराज अनुकूल आहेत व त्यातच सोळा तारखेपासून रवीची अनुकूलता आहे. म्हणजे 'अधिकस्य अधिकं फलं।' आपण जितका नेटाने प्रयत्न कराल, तितका पुढे येण्यास वाव आहे. जे लोक आपली निंदा करीत होते, तेच आता आपली स्तुती करतील. कलावंतांना कलेत प्रसिद्धी मिळून अकस्मात कामे मिळतील. आर्थिक स्थितीत चांगली सुधारणा होऊन प्रसन्न वातावरण राहील. विद्यार्थ्यांना विद्याभ्यासात उत्तम प्रगती व यशप्राप्ती मिळेल. पतिराजांना होणाऱ्या द्रव्यप्राप्ती व प्रतिष्ठेमुळे महिलांचे मन प्रफुल्लित होईल. शुभकार्याबद्दल वाटाघाटी

होतील. ता. १३–१४ शुभ. १६ तारखेनंतरचा काळ आपणांस निश्चित अनुकूल आहे व्यावसायिकांना उत्तम यश. व्यापाऱ्यांना फायदा. बेकारांसही नोकरी मिळेल.

सिंह : आपल्या राशीस ग्रहांची बरीचशी प्रतिकूलता आहे. तरीपण रवि-बुधाच्या अनुकूल परिभ्रमणामुळे अडचणी थोड्या प्रमाणात दूर होतील.

प्रारब्धेची पावे दुःख प्रारब्धेची पावे सुख । तुका ना करी बोभाट ।।

वरील वचनाप्रमाणे आपला सध्याचा काळ असल्यामुळे कितीही प्रतिकूल घटना घडल्या तरी आपणांस त्या सहन कराव्या लागतील. थोडा अवधी जरा. हा काळही संपून जाईल. गणेशाची उपासना केल्याने दुःखे सुसह्य होतील. मानसिक समाधान लाभेल. निदान १ ऑक्टोबरपर्यंत तरी आपणांस हा त्रास सहन करावा लागेल. कोर्ट-कामे लांबणीवर टाकावीत. कोणतेही नवीन आर्थिक व्यवहार करू नयेत. दि. ११-१२ हे दिवस प्रतिकूल.

कन्या : लाभस्थानात गुरु-मंगळ व लग्नी रवी. १६ तारखेपासून आपणांस हा काळ विशेष अनुकूल आहे. येणे असलेले पैसे वसूल होतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. दिनांक १३ पासून आपला राशीस्वामी स्वस्थानात प्रवेश करत आहे. त्यामुळे अडचणी दूर होऊन व्यवसायात उत्तम प्रगती होईल. कलावंतांना हा आठवडा शुभ आहे. कोर्ट-कार्यात यश. स्त्रियांपासून सहकार्य व मित्रांपासूनही फायदा. या सप्ताहात ग्रहांची पुष्कळशी अनुकूलता असल्यामुळे दि. १३ पासून विद्यार्थ्यांना उत्तम काल. १५-१६ तारखा विशेष अनुकूल. आकस्मिक लाभाचा योग. दि. १६ ते १८ घरातील थोर स्त्री व्यक्तींस आकस्मिक त्रास. बाकी एकंदरीत हा सप्ताह सर्व दृष्टीने अनुकूल आहे.

तूळ : सावधान ! आपणांस रविमहाराज १२ वे येत आहेत. दि. १५–१६ प्रतिकूल येत आहेत. मन शांत ठेवा. व्यवहारात अडीअडचणी उत्पन्न होतील. कोणत्याही मोठ्या योजना हाती घेताना पूर्ण विचार करा. शनि–रवी प्रतियोगामुळे अकारण द्रव्यखर्च व मनस्ताप होईल. गुरू, शुक्र आणि मंगळ या ग्रहांच्या अनुकूलतेमुळे तसे घाबरण्याचे कारण नाही. पत्नीशी वादविवाद व मनात नसतानाही नाहक द्रव्यखर्च होईल. मुले मनाविरुद्ध वागतील. तथापि, दि. १७–१८ अनुकूल आहेत. विद्यार्थ्यांना विद्येत अडचणी निर्माण होऊन लक्ष लागणार नाही. द्रव्यप्राप्ती निश्चित होणार असे वाटून त्यांत संकटे निर्माण होतील. दि. १६ पूर्वीच जे काही करायचे असेल, ते करून घ्या, नाही तर पस्तावाल.

वृश्चिक : आपल्या राशीस जवळ जवळ सर्व ग्रहांची अनुकूलता आहे. म्हणजे ही ईश्वरी कृपा होय. आपली मनाची मूळ ठेवण निराशात्मक आहे; कारण कोणत्याही कार्यात अडचणी. म्हणजे मग मनुष्य निराश. आता मात्र असे नाही बरे का ! मनुष्याच्या जीवनात काही सप्ताह किंवा काही काळ असा येतो, त्यातलाच हा आहे. आता आपल्या प्रगतीला चांगलाच वाव आहे. अविवाहितांचे विवाह, निपुत्रिकांना

पुत्रप्राप्ती, आर्थिक अडचणी दूर होतील. आपला भविष्यकाळ निश्चित उज्ज्वल आहे. कलावंतांच्या कलेला प्रसिद्धी मिळून समाजात मानमान्यता मिळेल. विद्यार्थ्यांनो, निराश होऊ नका. पुन्हा कंबर कसून अभ्यासाला लागा. आपणांस निश्चित यश मिळेल.

**धनू :** अष्टमात मंगळ आणि गुरू व दशमात रवी अशी स्थिती आहे. रवि-गुरू योगामुळे काही शुभ घटना घडून येतील. अर्थात दि. १६ पासून थोड्या अडचणी सहन कराव्या लागतील. फसगत होण्याचा योग आहे. नेटाने प्रयत्न करा. यश निश्चित मिळेल. दि. १७-१८ विशेष अनुकूल. विद्यार्थ्यांना १०० टक्के यशप्राप्ती न मिळाली तरी वर्ष पदरात पडेल. महिलांच्या बाबतीत पतीच्या तब्येतीस किरकोळ त्रास. संततीच्या तब्येतीस जपा. शुभकार्यात द्रव्यखर्च. एकंदरीत प्रयत्नांची शिकस्त केल्यास पुष्कळशा गोष्टी सुधारतील.

**मकर :** गुरुमहाराजांची अनुकूलता. त्यात रवीची जोड म्हणजे रथीला सारथ्याची जोड. मग युद्धात जय का मिळणार नाही? दि. १६ पासून चांगली प्रगती दिसून येईल. आता आपणांस कोणत्याही कार्यात निश्चित यशप्राप्ती आहे. व्यवसायात उत्तम प्रगती. नोकरी करणारांस वरिष्ठांची मर्जी व उत्तम अर्थप्राप्ती. दि. १३-१४ मात्र जपून. १५ ते १७ तारखा अनुकूल आहेत. कोणत्याही कार्यात यश. रवीसारखा प्रकाशमान ग्रह दिनांक १६ पासून आपल्या भाग्य-चक्रातून फिरणार आहे. त्यामुळे नैराश्य व जीवनातील अंधःकार नाहीसा होईल. सर्व गोष्टी मार्गाला लागतील.

**कुंभ :** दिनांक १६ पासून ग्रहमानाची बरीचशी प्रतिकूलता आहे. कोणत्याही व्यवहारात आपणांस दक्षता घेतली पाहिजे. आपली सत्य व न्याय्य बाजू असली तरी इतरांना ती पटणार नाही. नवीन व्यवसाय-आर्थिक व्यवहार बिलकूल करू नयेत. दि. १५, १६ जपावे. 'असंगाशी संग प्राणाशी गाठ'.

अशी ग्रहस्थिती आहे. म्हणून कोणत्याही मोहास बळी पडू नये. मित्रांपासून धोका. प्रवास शक्यतो टाळावा. मन शांत राहण्याकरिता या सप्ताहात ईश्वरी उपासना जोरकस करणे जरूर आहे. आपला हा अंधःकारमय काल लवकरच संपून भाग्योदयाची पहाट उजाडेल. कारण, "मनुष्य हा आशेवरच जगतो ना ?"

**मीन :** गुरू-मंगळाची जोडी आपणांस अनुकूल आहे. परंतु दि. १६ पासून शनि-रवी प्रतियोगामुळे आपल्या आनंदावर थोडे विरजण पडणार आहे. कौटुंबिक अडीअडचणी. पत्नीच्या तब्येतीस त्रास. दि. १५–१६ अकस्मात मानसिक त्रास अशा घटना घडतील. प्रवास करू नये. वरिष्ठांशी मतभेद निर्माण होतील. दूरच्या नातेवाइकांत अशुभ घटना; त्यामुळे द्रव्यखर्च करावा लागेल. स्वतःची प्रकृती मात्र ठणठणीत राहील. सर्व दिवस सारखे नसतात, याप्रमाणे हा सप्ताह आपणांस अधून मधून त्रासदायक जाईल. पण निराश होऊ नका. कारण प्रतिकूल ग्रहमानाचा हा काळ थोडा आहे. मंगलमूर्तीचे स्मरण करा. तो सर्व संकटांचा संहार करील. ●

# भिंतीच्या तुंबड्या — सुधाकर राजे

## पावशेर उंदराची भाजी

आतापर्यंत मला उंदराचे दोन-चार ढोबळ उपयोगच माहीत होते — सरकारी कार्यालयांत फायलींची गर्दी झाली की त्यांची वासलात लावण्याची कामगिरी बजावणे, मांजरांना शारीरिक व नवकवींना वैचारिक खाद्य पुरविणे, इसापपासून मर्ढेकरांपर्यंत प्राचीन-अर्वाचीन कथा-कवितांतून हीरोचा रोल करणे, नवऱ्यावर दादागिरी गाजविणाऱ्या झाशीवालीसमोर ही " मूर्तिमंत भीति उभी " करणे इत्यादी. त्यात आता एका महत्त्वाच्या उपयोगाची भर पडण्याचा रंग दिसतो. परवा उत्तर प्रदेशात एका विधानसभा सदस्याने सरकारला विचारले, " आपल्या राज्यात उंदरांची लोकसंख्या बेसुमार वाढत आहे, त्यावर सरकार काय उपाययोजना करणार आहे ?" संबंधित मंत्र्यांनी उत्तर दिले — " उंदराच्या मांसात प्रोटीन पुष्कळ असते. तेव्हा उंदीर खायला हरकत नाही !"

म्हणजे आता नवकवीच्या कवितेलाच नव्हे तर प्रत्यक्ष नवकवीलाच पोसण्याचे पुण्यकर्म भारतीय उंदीर करणार म्हणायचा. शिवाय भारताचा अन्न-प्रश्न सोडविण्याची किरकोळ गोष्ट उंदराच्या हातून जाता जाता घडणार ती वेगळीच. खरे म्हणजे आतापर्यंत आपण अन्न-समस्या सोडविण्याचे अनेक डोकेबाज उपाय करून पाहिले. पहिला उपाय म्हणजे आपल्याला लागणारे अन्न-धान्य अमेरिकेत उगवून पाहिले. ( — " आम्हांला भात आवडतो, तेव्हा अधिक तांदूळ पिकवा. " असेदेखील आपण अमेरिकन शेतकऱ्यांना बजावले ! ) दुसरा उपाय म्हणजे हिंदुस्थानातल्या माणसांना जगविणे जगातल्या प्रत्येक देशाचे परमकर्तव्य आहे हे त्रिकालाबाधित सत्य जगाच्या गळी उतरवून अमेरिका-रशियापासून थायलंड-एथिओपियापर्यंत तमाम देशांकडून अन्न-धान्याची खंडणी हक्काने वसूल केली. तिसरा कमालीचा उपाय म्हणजे प्रत्यक्ष हिंदुस्थानातही अधिक धान्य पिकविण्याच्या (फक्त) गोष्टी केल्या. — पण गणपति-गजाननाच्या कृपेने आपोआप भरपूर पिकणारे उंदीर आपली पोटापाण्याची काळजी चुटकीसरशी दूर करतील हे बेटे आतापर्यंत लक्षातच आले नाही बघा !

असो, झाले ते झाले. आता तरी दुपारची भ्रांत पडायला नको — अन् रात्रीची तर नकोच नको. एक लहानशी शंका म्हणजे सरकार उंदीर खायला लागल्यावर सरकारी अहिंसेचे काय ? मला वाटते एखादा वटहुकूम काढून या परमधर्माची दीक्षा मांजरांना द्यावी लागेल. कारण नाहीतर पूर्वी ज्याप्रमाणे गाईवरून राजांच्या लढाया व्हायच्या त्याप्रमाणे उंदरांवरून माणसा-मांजरांत बेबनाव व्हायच्या

## ☐ बुडत्याला माओ–नामाचा आधार

थकलो बुवा आपण ! माओ-महिमा वर्णावा तेवढा थोडाच. लॉरी चांगली चालवायला शिकायचे असेल तर माओ हाच मार्गदर्शक ! अन् फळे ताजी ठेवायची असतील तर माओ हाच रामबाण उपाय; एवढे सगळे वाचल्यावर वाटले होते –खरंच माओला अशक्य असे काय आहे ? काही नाही. सत्तरी उलटलेला माओ म्हणे परवा यांगत्से नदीत पोहायला गेला अन् ऑलिंपिक चँपियनने वेगाचा जो उच्चांक प्रस्थापित केला आहे, त्याच्या दुप्पट वेगाने पोहला ! आता सांगा, भवसागर तरून जाण्यासाठी हरिनामाचा गजर लागो अथवा न लागो, भवनदी तरण्यासाठी माओ-नामाशिवाय तरणोपाय आहे काय ?

माओच्या या विक्रमाचे वृत्त वाचून इंग्लंडातल्या एका संस्थेने त्याला पोहण्याच्या शर्यतीत भाग घेण्यासाठी इंग्लंडला बोलावले आहे. माझ्या मते हा चक्क खुळेपणा आहे. आता जगातला कुठला जलतरणपटू माओशी सामना करायला धजेल ? आणि माओने जेथे ऑलिंपिक चँपियनचा फज्जा उडवला तेथे इंग्लंडातल्या यःकश्चित् स्थानिक शर्यतीचे काय महत्त्व ? उलट हे आमंत्रण देऊन पक्षपती माओचा इंग्लंडने जो अप्रत्यक्षरीत्या अपमान केला आहेत त्याबद्दल लाल चीन राणीकडे लवकरच तीव्र निषेधाचा खरमरीत खलिता पाठवील, याची मला खात्री आहे.

## ☐ संगीत आखाडा

संगीताच्या अनेक व्याख्या आहेत. पण संगीत म्हणजे काय या प्रश्नाचे एकतरी उत्तर आहे काय ? मला नाही वाटत असेलसे. आता मी काही त्यातला दर्दी नाही; पण गाणारा किंवा वाजवणारा माणूस जो काही गोड आवाज काढतो, त्याला संगीत म्हणावे, अशी माझी आपली सरळसोट भूमिका – आणि आश्चर्य म्हणजे थेट युरोपातल्या दर्दी मंडळींना ती पटलेली दिसते. म्युनिच शहरात कुठल्याही संगीत कार्यक्रमाला कर माफ असतो – पण बीटल्सच्या कार्यक्रमावर त्यांनी कर ठेवला आहे. त्यांच्या मते बीटल्सचा कार्यक्रम संगीताचा कार्यक्रम नसतो. तो मुख्यतः श्रोत्यांच्या आरडाओरडयाचा, किंकाळण्याचा व हातपाय आपटण्याचा कार्यक्रम असतो नि बीटल्सचे गाणे–बजावणे हा त्या गोंधळाचाच एक दुय्यम भाग असतो.

केवढी ही अरसिकता ! श्रोता गायकावर शिरा ताणण्यात वरताण करील तेच खरं संगीत, अन् किंचाळणारा श्रोता हातपायदेखील झाडू लागला तर ते संगीत अक्षरशः आपादमस्तक त्याच्या अंगात भिनले आहे, असाच त्याचा अर्थ व्हायला पाहिजे. संगीताने श्रोत्याचे मन उचंबळून आले याला पुरावा काय ? एकच – त्याचे शरीर खुर्चीवरून उचंबळून आले पाहिजे. इतकेच काय, मी तर म्हणेन हिंदी सिनेमातले प्रेम हा ज्याप्रमाणे धावण्या-पळण्याच्या व्यायामाचा एक प्रकार आहे, त्याचप्रमाणे बीटल-संगीत हा उठाबशांचा अन् घशाचा व्यायाम आहे. आजच्या फॅशनेबल तरुण मंडळींना अंग-मेहनतीचा, घाम गाळायला लावायचा एकच उपाय आहे – बीटल् संगीताचे आखाडे उघडणे.

● ● ●

चित्रपट

# शेवटचा मालुसरा

## 'लगीन 'ही नाही, 'कोंडाणा 'ही नाही

पुरुषोत्तम बावकर

देशप्रेम जागृत करणेसाठी सिनेमासारखे दुसरे माध्यम सापडणार नाही. आपल्याकडे युद्धचित्रपट (सामाजिक) सहसा काढले जात नाहीत. तेवढी भारतीय निर्मात्यांची कुवत नाही. आणि युद्धचित्रपटाच्या नावाखाली भारतीय समाचार चित्र किंवा अनुबोधपटांतले काही शॉटस् टाकून चित्रपटात एन. सी. सी. ची परेड किंवा अधिकच काही वाटलं तर, नायक जवान म्हणून गेलेला दाखवायचा; की संपलं काम. नाही म्हणायला गेल्या वर्षी 'हकीकत'-सारखा एक बऱ्यापैकी चित्रपट निघाला. मराठीत राम गबाले यांनी 'छोटा जवान' काढला, आणि मराठी चित्रपट शौकिनांची युद्धचित्रपट पाहण्याची हौस भागवली. आणि श्री. सदानंद देसाई यांची चित्रपट काढायची हौस फिटली. पण हे सारं झालं चीनच्या आक्रमणाच्या वेळी.

भारत-पाक संघर्ष चालू झाला, या पार्श्वभूमीवर चित्रपट काढायला अनेक निर्माते सरसावले. वसंत जोगळेकरांना वाटलं, खूप वर्षांनी वाटलं,एक मराठी चित्रपट काढावा. कथानकाला तोटा नाही. सौभाग्यवती सुमतीबाई—घरातीलच कथालेखिका. मराठी इतिहासात शूर पुरुषांचा तोटा नाही. बिचारा तानाजी मालुसरे बळी पडला. तानाजी मालुसरे, या शूर मराठा

वीराच्या वंशातले सुभानराव मालुसरे, इंग्रजांच्या अमदानीत, मराठा लाईट इन्फंट्रीत मेजरच्या हुद्यावर. त्यांना एक मुलगा आणि मुलगी. दोघं लहान वयाची. मलानं मोठेपणी स्वतंत्र भारताच्या फौजेत अधिकारी व्हावं ही सुभानरावांची इच्छा. (मुलगाही बापाप्रमाणेच शूर असतो हे दाखविण्यासाठी, बापाच्या पिस्तुलाने खेळण्याचा चित्रपटातील एक प्रसंग.) सुभानराव दुसऱ्या महायुद्धात कामी येतात. एकदा पोळलेल्या सावित्रीबाईंची आपला मुलगा सैन्यात जाऊ नये, ही इच्छा. हा कथानकाचा मूळ धागा.

सुमतीबाईंना कथा लिहिण्याची कोण हौस! बाईंनी मागे वसंतरावांच्या 'आँचल' या चित्रपटाची कथा लिहिली होती. त्या बोलपटाने वसंतरावांना जरा हात दिला होता. म्हणून बाईंचा हा पुन: प्रयत्न असावा.

**मद्रासी फॉर्म्युला**

चित्रपटाची सुरुवात दुसऱ्या महायुद्धातील अनेक प्रसंगांचा 'मॉन्टाज' वापरून होते. हे प्रसंग जुन्या वार्तापटांवरून घेतलेले. त्यामुळे साहजिकच त्यांचा दर्जा कमी प्रतीचा. आणि ह्या 'मॉन्टाज' वर चित्रपटाचे श्रेयफलक छापलेले. त्यामुळे डोळ्यांना खूप त्रास होतो. चित्रपटाची सुरुवात मनाची पकड घेत नाही. त्यानंतर ताबडतोब सुभानराव युद्धात कामाला येतात. आणि सावित्रीबाई आपल्या दोन मुलांना (राया, सचिन आणि सुशिला-मधुश्री) यांना घेऊन मालुसऱ्यांच्या जन्मग्रामी येतात. गावी सुभानरावांचा दोस्त विष्णुशास्त्री (चंद्रकांत गोखले) त्यांची काळजी घेतात. इतर गावांप्रमाणे याही गावात सावकार असतो (परशुराम). त्याच्याकडून सुभानरावांनी घरबांधणीसाठी कर्ज काढलेले असते. दसऱ्यातील पूजेचा मान न मिळाल्याने चिडून तो जप्ती आणायची भाषा बोलतो. सावित्रीबाई आपले दागिने विकून, मुलाबाळांसाठी बंगला वाचवतात, मळा वाचवतात.

सावित्रीबाईंना सुभानरावांची सारखी आठवण येते. त्या त्यांच्या आठवणीने रडतात. रडताना गातात. (हिंदी चित्रपटांतला पेटंट फॉर्म्युला आता मराठीत घुसला) आपल्या आईला रडताना पाहून दोन्ही मुले रडतात. छोटचा रायाच्या भूमिकेत सचिन खूपच ओव्हर ॲक्टिंग करतो. त्याचे हावभाव नैसर्गिक वाटत नाहीत. विष्णुशास्त्र्यांचा मुलगा राम, त्याला आई नसल्याने सावित्रीबाईंनाच आई मानून, त्यांच्या राया आणि सुशीलाबरोबरच वाढतो.

मुले मोठी होतात. पण, आश्चर्य! सावित्रीबाईंत काहीच फरक पडत नाही. त्या तेवढ्याच तरुण वाटतात. (मेकअप्‌मन् रजेवर असेल किंवा खेड्यातील हवेमुळे तारुण्य टिकून राहिले असावे!) त्या मळ्यात स्वत: खपतात. ग्रामपंचायतीच्या सरपंच निवडल्या जातात. राया आणि राम कॉलेजात जाण्यासाठी पुण्याला राहतात. दोघेही एन. सी. सी.त (की होमगार्ड?) सामील होतात. रायाला चिनी भाषा शिकायची इच्छा होते. तो एका चिनी व्यापाऱ्याच्या घरी जातो. त्याची मुलगी त्याला चिनी

भाषा शिकवते. राया चिनी भाषा शिकत असताना राम त्याला वाकुल्या दाखवतो. चिनी मुलीच्या वाढदिवसाचा प्रसंग. राया (रमेश देव) आणि राम (श्रीकांत मोघे) तिच्या घरी भेट घेऊन जातात. चिनी मुलगी चिनी ठेक्यात मराठी गाणे म्हणते.

राया आणि राम गावी येतात. शिकारीला गेले असताना, नऊवारी काचा मारलेल्या, तारुण्याने मुसमुसलेल्या एका तरुण मुलीची (उमा) शिकार राया करतो. ती मुलगी रायाची बहीण सुशिला हिची मैत्रिण असते. मातुकलीच्या खेळात रायाचे आणि तिचे लग्नही झालेले असते. सुशीला रायावर मनातल्या मनात प्रेम करते.

सावित्रीबाई स्वतः मळ्यात ट्रॅक्टर चालवतात. मुलांच्या साहाय्याने श्रमदानाने रस्ता तयार करतात. मध्येच कथानकात सावकाराचा मुलगा चक्रपाणी (मधू आपटे) विनोद निर्मितीसाठी येतो.

मध्येच रायाचे उमाचे प्रियाराधन. नदीवर उमा पोहायला जाते. चित्रपटात 'सेक्स अपील' दाखविणारा एकुलता एक प्रसंग. दिग्दर्शकांची कोण केविलवाणी धडपड! पण तेही धड जमले नाही. मराठी प्रेक्षकांचे दुर्दैव.

उमा आंघोळ करीत असते त्याच वेळी रायाचे दर्दभरे गाणे चालू असते. त्यानंतर भारत-पाक संघर्षाचा प्रसंग. बापाची इच्छा मोडून राम भारतमातेच्या रक्षणासाठी धावतो. राया मात्र आईला वचन दिल्यामुळे सैन्यात जात नाही. तो पुण्याला येतो. उमाचे आणि त्याचे प्रेमप्रकरण चालू असते. उमाला घेऊन तो चिनी मुलीच्या घरी जातो. तिथे त्याला चिनी भाषा अवगत असल्याने, तो व्यापारी आणि त्याची मुलगी हेर असल्याचे उघडकीला आणतो. चित्रपटात उमाची आणि त्या चिनी मुलीची कुस्ती वसंतरावांनी मजेत दाखवली आहे. मला वाटते मराठी चित्रपटात बायकांच्या कुस्तीचा हा पहिलाच प्रसंग असावा.

राया कॉलेजात, भारतमातेच्या वीरांचे स्फूर्तीगान मोठ्या दर्दभऱ्या आवाजात गातो. उमा त्याला साथ देते. पण रायाला बाकीची मुले चिडवतात. मालुसऱ्यांचे रक्त स्फूर्तिगान गाण्यासाठी नसून सैन्यात जाऊन लढण्यासाठी असल्याची जाणीव देतात. राया ताबडतोब सैन्य भरतीसाठी अर्ज करतो.

भारत-पाक संघर्ष जोरात चालू असतो. सावित्रीबाई रायाचे लग्न ठरवतात. तीन दिवस सोहळा चालू असतो. रायाला सैन्यात भरती होण्यासाठी आज्ञा होते. पण सावित्रीबाई पाठवीत नाहीत. लग्नाच्या आधी अचानक राम मृत्यू पावल्याची बातमी येते. राया म्हणतो, 'आधि लगीन कोंढण्याचे आणि मग लगीन रायबाचे'. सावित्रीबाईंना दुःखावेग होतो. त्या रायाला सैन्यात जायला परवानगी देतात. त्या म्हणतात – "मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी 'शेवटचा मालुसरा' कामास आला तरी हरकत नाही." राया सैन्यात जातो की नाही कळत नाही, कारण ताश्कंद करार होतो, नंतर शास्त्रींचा मृत्यू, आणि चित्रपटाचा शेवट. प्रेक्षक चित्रपटगृहाबाहेर पडला की त्याला, शास्त्रींच्या मृत्यूची दृश्ये ध्यानात राहतात. (फिल्म्स डिव्हिजनला धन्यवाद !)

## सदोष तंत्र

हे झाले चित्रपटाचे संपूर्ण कथानक. कथेत अनेक प्रकारांची खिचडी. ताश्कंद करारानंतर कथानक बदलावे लागले म्हणतात. पण मुळातच जिथे काही नाही, तिथे कथानक बदलले नसते तरी काही फरक वाटला नसता. कथानकात अनेक प्रसंग वांडगुळासारखे चिकटतात. ह्या साऱ्या प्रसंगांची निर्मिती बॉक्स ऑफिससाठी. पण हा मद्रासी फॉर्मुला मराठीत चालत नाही. मुळातल्या एका चांगल्या कल्पनेची मात्र वाट लागली. वसंतरावांचे दिग्दर्शन शून्य. सबंध चित्रपटात दिग्दर्शक नावाची कोणी व्यक्ती असते, असे वाटत नाही. छायाचित्रकाराचीही तीच वाट. ह्या चित्रपटाचे छायाचित्रण इतके आहे की, चित्रपट मुंबईत निर्माण झाला हे खरेसुद्धा वाटत नाही किंवा नवशिका छायाचित्रकार करणार नाही अशा अनेक चुका यात आहेत. क्लोज-अपमध्ये नाकाजवळ दोन दोन शॅडोज दिसतात. भिंतीवरही अशाच अनेक सावल्या पडतात. काही काही क्लोज-अप्स् चक्क् आऊट फोकस आहेत. चित्ररेखा (सुशीला) ही नवी नटी पहिल्या काही दृश्यात चांगली वाटते. पण पुढे पुढे काही ठिकाणी अगदीच सामान्य वाटते. सुमतीबाईंचा (सावित्री) चेहरा पण असाच सामान्य वाटतो. आणि झूमलेन्स (Zoom-lens) वापरण्याची कोण हौस. पण तीसुद्धा नीट वापरलेली नाही. कॅमेरा ऑपरेशन पण चांगले नाही. बाळ जोगळेकरांनी यापूर्वी 'आँचल', 'आज और कल' या चित्रपटांची बऱ्यापैकी फोटोग्राफी केली होती. पण मराठी चित्रपटांचे चित्रण कसेही असले तरी चालते अशीच त्यांची समजूत झालेली दिसते. तीच समजूत ध्वनी-लेखकाची पण झालेली आहे. संवाद व्यवस्थित, स्पष्ट ऐकूच येत नाहीत. संकलन अतिसामान्य आहे लक्षात ठेवा. चित्रपटाचा हा पहिला प्रिंट. मॅजेस्टिक सिनेमागृहात दाखवण्यात येत असलेला. त्याची ही तऱ्हा. मग इतर चित्रपटगृहांतील प्रिन्टस्‌ची काय परिस्थिती असेल देव जाणे.

कालेलकरांनी संवाद लिहिले आहेत. काही ठिकाणी चांगले आहेत. गाणी तीन-चारच आहेत. त्यांचे शब्द सामान्य आणि चाली अतिसामान्य आहेत. एकसुद्धा गाणं कानाला गोड वाटत नाही.

भूमिकांत चंद्रकात गोखले आणि सुमतिबाई वरचढ वाटतात. श्रीकांत मोघे नाटकात काम केल्यासारखे संवाद बोलतो. उमाचा चेहराही आकर्षक आहे. तिचा स्थूलपणा हा दोष.

तंत्र मंत्राच्या दृष्टीने अतिसामान्य असलेला हा चित्रपट. आंतरराष्ट्रीय चित्रपट-स्पर्धेत न धाडणे हेच उत्तम. उगाच मराठी चित्रपटांची परदेशी बदनामी नको. ●

# कांच काटा हीरे

## रेखीव चित्रपट

दोन पातळ्या, दोन मूल्ये यांतील संघर्ष प्रभावीपणे दाखविणारा 'कांच काटा हीरे' हा बंगाली चित्रपट अतिशय रेखीव, नीटनेटका व बांधेसूद आहे. कथेचा तोंडावळा जुनाच असला तरी तो लेचापेचा नाही, कथेच्या बीजातच सामर्थ्य आहे आणि दिग्दर्शन अजय कार (AJOY KAR) त्यांनी ते त्याहून समर्थपणे साकार केले आहे. कथा आणि दिग्दर्शन यांतील या समृद्धतेमुळेच नृत्ये, मारामारी, गाणी आणि प्रेमाचे मुबलक सीन हा नेहमीचा मालमसाला नसतानाही चित्रपट प्रभावी बनला आहे, कायम लक्षात राहावा असा झाला आहे.

**कथानक**

'कांच काटा हीरे'ची कथा आहे एक बाप आणि त्याचा मुलगा यांच्यांतील संघर्षाची. अप्रत्यक्षपणे त्यामागील दोन मूल्यांची. अंबिका गुप्ता हे घनाढ्य उद्योगपती. त्यांचा मुलगा 'शुब्राता' (Subrata चा बंगाली) सहा वर्षांचे आपले परदेशातील इंजिनियरिंगचे शिक्षण संपवून परत येतो. चित्रपटाची सुरुवात त्यांच्या डमडम विमानतळावरील आगमनाने होते. खरे म्हटले तर आगमनाचा हा प्रसंग अगदी साधा; परंतु दिग्दर्शक कार यांनी तो कलात्मकतेने चित्रित केला आहे. शुब्राताला भेटावयास उत्सुक असलेल्यांच्या–आई, बहीण, वडील–मनांतील भावनांचा कल्लोळ, श्री. अंबिका गुप्ता यांची उद्योगपती म्हणून प्रतिष्ठा, या साऱ्या गोष्टी दिग्दर्शकाने टिपल्या आहेत, मोठ्या कौशल्याने त्याने त्या सूचित केल्या आहेत. मुलाला भेटल्यावर आनंदाने पुलकित होणारे अंबिका गुप्ता अशा वेळीही व्यवहार विसरू शकत नाहीत. मुलाला भेटत असतानाच छायाचित्रकारालाच फुकट, फिल्म दवडू नकोस असे ते जेव्हा सांगतात, तेव्हाच बाप आणि मुलगा यांच्यांतील विचारभिन्नता स्पष्ट होते. एक व्यवहारी तर दुसरा ध्येयवादी. दोघांतील हा विचारभेद फोफावतो, प्रसंगा-प्रसंगांतून आकारत जातो.

अंबिका गुप्तांना दुसऱ्या महायुद्धाचे काळात नशिबाने हात दिला आणि ते एक उद्योगपती बनले. त्यासाठी सत्य-असत्याचा त्यांनी फारसा विचार केला नाही. आपल्या मुलाने आपण सांगू त्याप्रमाणे व्यवसाय चालवावा, अशी त्यांची इच्छा.

परंतु ' शुभ्राता 'ला आपल्या वडिलांनी पैसे मिळविण्यासाठी वाममार्गाचाही अवलंब केला, याचा सुगावा लागतो. त्याला चीड येते, मनात साचून राहिलेला विरोध उफाळून येतो आणि तो दिल्लीला निघून जातो, सरकारी नोकरी धरतो. ' गुप्ता कन्स्ट्रक्शन कं. 'ने बांधलेल्या एका पुलाच्या प्रकरणात चौकशी करण्याचे सरकार ठरवते आणि योगायोग असा की, शुभ्राताचीच त्यासाठी नेमणूक केली जाते. त्याची अवस्था केविलवाणी होते. काही झाले तरी अंबिका गुप्तांशी त्याचे रक्तामांसाचे नाते होते. असहाय्य असलेला शुभ्राता चौकशी करण्यासाठी काम चाललेले असते तेथे जातो. अंबिका गुप्तांशी–वडिलांशी–त्याची तेथे गांठ पडते–एक वडील म्हणून नव्हे तर गुप्ता कंपनीचे मालक म्हणून. अंबिका गुप्तांच्या मनातील तेढ पेटून निघते, मुलाविषयीच्या आपल्या आशाआकांक्षा पार चिरडून गेल्या या जाणीवेने त्यांचे काळीज गलबलून जाते. आपला हा एक प्रकारचा पराभवच त्यांना सहन होत नाही– ' कॅरी ऑन माय सन '– असे म्हणून ते प्राण सोडतात.

कथा अशी ही एवढीच. परंतु त्यातील प्रत्येक व्यक्तीरेखा सुस्पष्ट आहे. उमा नावाच्या एका टायपिस्ट मुलीवर शुभ्राताचे प्रेम असते. या कथेत हे सुद्धा गोवले आहे. परंतु त्याला महत्त्व दिलेले नाही. सारे लक्ष, सारे कौशल्य केंद्रित केले आहे ते या संघर्षावर. या चित्रपटाचे वैशिष्टच असे की, कोणत्याही पात्राबद्दल आपल्या मनात आकस निर्माण होत नाही. अंबिका गुप्ता व्यवहारी असले, त्यांनी वाममार्गाने पैसा मिळविला असला तरी एक वाईट माणूस म्हणून त्यांची व्यक्तिरेखा आलेली नाही; किंबहुना गुप्तांबद्दल सहानुभूतीच वाटते. मुलगा भेटणार म्हणून नसानसांतून आनंदाने फुललेला हा माणूस आपल्या पुत्राच्या वागण्याने अगदी खचून जातो. अंबिका गुप्ता आपले विचार, मूल्य यांच्याशी प्रामाणिक आहेत, त्यामुळेच मुला-विषयीची त्यांची तडफड पाहवत नाही, बापाच्या मनातील विचारांचा कल्लोळ चक्रावून टाकतो.

बिकाश रॉय यांनी अत्यंत कौशल्याने अंबिका गुप्ता उभे केले आहेत. 'शुभ्राता'च्या भूमिकेत सौमित्र चटर्जीने हळुवारपणे काम केले आहे. हा चित्रपट वास्तव-तेच्या अधिक नजीक (काही ' नाटकी ' अथवा ' फिल्मी ' प्रसंग सोडले तर) आहे. यातील पात्रे खरी वाटतात, अकृत्रिम वाटतात. दिग्दर्शकाचे यश आहे ते यातच.

चित्रपटात गाणे नाही तरीदेखील अवश्य पाहावा असा हा चित्रपट. हेमंत मुकर्जीचे संगीत भडक, उत्तान नाही काही काही प्रसंगांना त्यांनी स्वरांची साथ दिली आहे.

अजय कार यांचा ' सात पाके बांवा ' हा चित्रपट खूपच गाजला. आता ते एक बंगाली ' क्लासिक ' कादंबरी हिंदीत दिग्दर्शित करणार आहेत. ' कांच काटा हीरे'ने त्यांच्यासंबंधीच्या अपेक्षा खूपच उंचावल्या आहेत.

● ● ●

श्रीराम प्रसन्न

येत्या विजया दशमीच्या सुमुहूर्तावर ( दि. २३ ऑक्टोबर १९६६ रोजी ) प्रसिद्ध होत आहे ! !

# श्री गोंदवलेकर महाराज यांची प्रवचने

संग्राहक : गो. सी. गोखले प्रस्तावना : प्रा. के. व्ही. बेलसरे

★ गेल्या ३०–३५ वर्षांत श्री महाराजांनी केलेल्या निवडक ३७० प्रवचनांचा संग्रह. साधकांना वर्षभर रोज एक नवीन प्रवचन वाचावयास मिळावे या उद्देशाने हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. नाम, प्रपंच, संतसत्पुरुष, साधन, परमार्थ, सद्गुरु, आनंद, समाधान, अखंड नामस्मरण, संपूर्ण शरणागती आणि भगवंत यांवरील श्री महाराजांची उत्कृष्ट प्रवचने.

★ रॉयल साईजची (७" × १०") सुमारे ४०० पृष्ठे. उत्कृष्ट छपाई व बांधणी व टिकाऊ कागद. शिवाय श्री महाराजांचे दर्शनीय व संग्राह्य तीनरंगी चित्र. श्री ब्रह्मानंद महाराज, श्री आनंदसागर महाराज–श्रीक्षेत्र गोंदवले येथील श्रीरामाच्या मूर्तीचे फोटो.

## प्रसिद्धीनंतर किंमत १० रुपये
## सवलतीची किंमत ७-५० रुपये

★ ठराविक प्रति नोंदवून होतांच ही सवलत बंद होईल.

**प्रति मर्यादित.**

पुणें, मुंबई, नागपूर, नासिक, सांगली, कोल्हापूर, सोलापूर येथील ग्राहकांना टपालखर्च येणार नाही. त्यांना त्यांचे गांवीच ग्रंथ मिळण्याची व्यवस्था होईल. रक्कम आमचेकडे आगाऊ पाठवून नाव नोंदवावे.

यशवंत प्रकाशन,

सदाशिव पेठ हौदाजवळ, पुणे २.

## आपण आपला अंक कोठून घेणार ?

स्थानिक विक्रेत्यांकडून घेतला तरी हरकत नाही.
पण वर्गणीदार होण्याचे ठरवत असाल तर
या आकर्षक सवलतीचा आपण विचार करू शकता.

'माणूस' साप्ताहिकाची दिवाळी अंकासहित
वार्षिक वर्गणी आहे रुपये वीस.

# १००

पाच वर्षांची वर्गणी होते रुपये शंभर. आपण पाच वर्षांची शंभर रुपये वर्गणी 'माणूस'कडे एकदम भरली तर सहा वर्षे-- एक वर्ष अधिक

माणूस साप्ताहिकाचे अंक आपल्याला घरपोच मिळतील.
म्हणजेच वर्गणीत वीस टक्के सवलत मिळून आपली
वीस रुपये बचत होईल.
आपण मनात आणले तर ही

## माणूस पंचवार्षिक ग्राहक योजना

यशस्वी करणे आपल्याला मुळीच अवघड नाही.
स्वावलंबनाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून,
अधिक अन्नासाठी, अधिक पाण्यासाठी—
'माणूस'ने सव्वा लाखाचे हे प्रस्थान ठेवले आहे.
आपणही या प्रस्थानयात्रेत सहभागी होऊ शकता.
हा प्रजासूय यज्ञ सिद्धीस नेऊ शकता.



रामायणातल्या
त्या छोटया खारीइतका
पुण्य संचय करू शकता.

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**